Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

नवयुग वाचनमाला
पुस्तक सहावें

मराठी साहित्य-परिचय

भाग दुसरा

668
6ख

संपादक
[illegible] खानोलकर

Karnatak Publishing House, Bombay

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

नवयुग वाचनमाला
पुस्तक सहावें

मराठी साहित्य-परिचय

भाग दुसरा

66क
66व

संपादक
[illegible] व खानोलकर

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Karnatak Publishing House, Bombay

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

❀ ओ३म् ❀

पुस्तक-संख्या 66 फ/6 ख

पंजिका-संख्या 20210

पुस्तक पर सर्व प्रकार की निशानियां लगाना वर्जित है। कोई महाशय १५ दिन से अधिक देर तक पुस्तक अपने पास नहीं रख सकते। अधिक देर तक रखने के लिये पुनः आज्ञा प्राप्त करनी चाहिये।

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

CHECKED 1973
Initial ....

स्टाक प्रमाणीकरण १९८४-१९८५

LIBRARY,
GURUKULA KANGRI.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

नवयुग वाचनमाला : पुस्तक सहावें

मराठी साहित्यपरिचय

भाग दुसरा

संपादक

प्रो. श्रीधर बाळकृष्ण रानडे,
बी. ए., एम्. एस्सी.

गंगाधर देवराव खानोलकर

LIBRARY, GURUKULA KANGRI

66 म
6 खा

२०२९०
V. 1. 2001

[सर्व हक्क स्वाधीन]

KARNATAK PUBLISHING HOUSE,
BOMBAY 2

1st Edition November 1935, Reprinted April 1936, December 1936, February 1938, January 1939, January 1940, March 1942.

Price 11 Annas
किंमत ११ आणे

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

प्रकाशकाचे दोन शब्द

भाषाविषय शिकविण्याच्या धोरणांत व पद्धतींत अलीकडे महत्त्वाचे फरक घडून आले आहेत. भाषा शिकावयाची म्हणजे केवळ तिच्यांतील कठीण असा शब्दसंग्रह शिकावयाचा नाहीं, किंवा त्या भाषेचे द्वारें केवळ उपयुक्त ज्ञान मिळवावयाचें नाहीं, तर तिच्यांतील सुंदर व नानाविध अशा वाङ्मयाचा मुलांना परिचय करून द्याव-याचा, हाच भाषाशिक्षणाचा प्रधान हेतु अलीकडे मानण्यांत येऊं लागला आहे. या धोरणाला अनुसरून आम्हीं प्रकाशित केलेल्या या 'नवयुगवाचनमाले'ची रचना केलेली आहे. मराठी चौथ्या इयत्तेपर्यंतचीं–'बालवाचन' धरून–पांच पुस्तकें महा-राष्ट्रांतील प्रसिद्ध शिक्षणतज्ज्ञ श्री. अत्रे व श्री. घाटे यांनीं तयार केलीं. या प्राथमिक पुस्तकांचे भाषाज्ञान व वाङ्मयाभिरुचि हे मुख्य हेतु असल्यामुळें त्यांतील बरेच धडे मुद्दाम तयार करावे लागले. 'नवयुगवाचनमाले'चीं प्रस्तुत पुढील तीन पुस्तकें 'साहित्यपरिचय' या नांवानें प्रो. रानडे व श्री. खानोलकर या साहित्यिकद्वयांनीं तयार केलीं आहेत.

'साहित्यपरिचय' हें नांव प्रस्तुत पुस्तकांस मुद्दाम योजिलें आहे. कारण वरच्या वर्गांत मराठींतील उत्कृष्ट साहित्याचा व विशेषतः त्यांतील विविध प्रकारांचा विद्या-र्थ्यांना परिचय करून देणें हा हेतु आहे. जरी श्री. घाटे व अत्रे यांना पहिल्या चार पुस्तकांनंतर, पुढील पुस्तकांचें, कार्यबाहुल्यामुळें संपादन करतां आलें नाहीं तरी त्यांची या कार्याला पूर्ण सहानुभूति होती व त्यांनीं वेळोवेळीं उपयुक्त अशा सूचना करून मार्गदर्शनहि केलें आहे.

महाराष्ट्राकडून ज्याप्रमाणें पहिल्या चार पुस्तकांचें आनंदपूर्वक स्वागत झालें, त्याचप्रमाणें या तीन पुस्तकांचेंहि होईल अशी आम्हांला आशा आहे.

१ नोव्हेंबर १९३५,
कर्नाटक पब्लिशिंग
हाउस, मुंबई (२)

मं. ना. कुळकर्णी

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

शिक्षकांशीं दोन शब्द

'साहित्यपरिचय' ही पुस्तकमाला 'नवयुगवाचनमाले'ची पुढची पायरी आहे. मानसशास्त्राप्रमाणें मुलांच्या अकराव्या वर्षी मनाची एक अवस्था संपते व दुसरीस प्रारंभ होतो. अकराव्या वर्षापर्यंत मुलांना वाङ्मयाचा 'साहित्य' या नात्यानें परिचय करून द्यावयाचा नसतो. वाङ्मयाचे वेगवेगळे प्रकार त्यांच्यापुढें मांडावयाचे नसतात. या प्राथमिक अवस्थेंत मुलें वर्तमानकालांत गुंग झालेलीं असतात. त्यांना लोककथा, लोकगीतें आवडतात. राक्षसांच्या-यक्षांच्या गोष्टी ऐकाव्याशा वाटतात. धावत्या चालीच्या कविता म्हणाव्याशा वाटतात. वाचण्याचा मजकूर बेताचा १।-१॥ पानें पुरेल एवढाच असावा लागतो. यामुळें 'नवयुगवाचनमाले'च्या पहिल्या चार पुस्तकांच्या संपादकांना बरेचसे धडे स्वतः लिहावे लागले किंवा लिहवून घ्यावे लागले.

अकराव्या वर्षानंतर जीं मुलें मराठी पांचवी, सहावी, सातवी, या इयत्तांत शिकतात किंवा इंग्रजी शाळांत पहिल्या तीन इयत्तांत शिक्षण घेतात, त्यांचीं मनें प्राथमिक अवस्थेंतील मुलांच्या मनांइतकीं चंचल व अपरिपक्व नसतात किंवा हायस्कूलमध्यें शिकणाऱ्या १४ ते १६ वर्षांच्या मुलांच्या मनाइतकीं पक्व, जाणतीं व चिकित्सकहि (analytical) नसतात.

'साहित्यपरिचया'ची रचना या अशा मधल्या स्थितीस पोषक अशी केली आहे. या तीन पुस्तकांत मराठी साहित्याचा मुलांना प्राथमिक ओझरता परिचय करून देण्याचा आमचा हेतु आहे. शब्दचित्र, नाट्यछटा, लघुकथा, नाट्यसंवाद, आकाशनाट्य लघुनिबंध, वर्णनात्मक व विवेचनात्मक निबंध या सर्व प्रकारांचा आम्ही या पुस्तकांत परामर्ष घेतला आहे. परंतु मुलांचें लक्ष त्या त्या वाङ्मयप्रकाराच्या तंत्राकडे न वेधितां त्या वाङ्मयप्रकारामुळें त्या लेखांत मौज कशी उत्पन्न झाली आहे इकडे तें वेधिलें आहे. तंत्राचा विचार थोड्याबहुत प्रमाणावर 'साहित्यपरिचया'च्या पुढच्या सहा पुस्तकांत ('गद्यवैभव' व 'महाराष्ट्र-रसवंती' यांत) केला आहे. यावरून हें दिसून येईल कीं नवयुगवाचनमालेंतील आरंभींच्या पुस्तकांपासून 'गद्यवैभव' व 'महाराष्ट्र-रसवंती' यांच्या शेवटच्या पुस्तकांपर्यंत मुलांचें भाषाज्ञान, आकलनशक्ति, अनुभव, परिस्थिति व अवस्थांतरें यांचा योग्य विचार करूनच रचना केली आहे.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

नाट्यछटांचेंच उदाहरण घ्या. आरंभींच्या नाट्यछटा व पुढील पुस्तकांत आलेल्या नाट्यछटा यांत भाषा, विचार व मांडणी यांचा एक प्रकारचा क्रम दिसून येईल.

लेखांची निवड करितांना दोन प्रकारचीं धोरणें ठेविलीं आहेत. तो लेख त्या वाङ्मयप्रकारामध्यें उत्तम दर्जाचा असावा व तो त्या वयाच्या मुलांना झेपेल असा असावा. या कसोटीमुळें कांहीं प्रसिद्ध लेखकांचे लेख या पुस्तकमालेंत दिसणार नाहींत तर उलट कांहीं अगदीं अपरिचित लेखकांनीं त्यांची उणीव यशस्वी रीतीनें भरून काढलेली दिसून येईल. जुन्या कविता निवडल्या आहेत त्या त्यांच्या संस्कृत-प्राचुर्याच्या व कठीणपणाच्या परिमाणांवरून निवडल्या नसून, विषयवैचित्र्य, प्रसाद व भाषाशैली इत्यादि वाङ्मयगुणांमुळें निवडल्या आहेत. कविता शिकावयाची ती स्वतःचा शब्दसंग्रह वाढविण्याकरितां नव्हे, हें मत आतां सर्वमान्य झालें आहे.

आम्हीं लेखकांचीं चरित्रें दिलेलीं नाहींत. लेखकांच्या जीवनाचा त्यांच्या वाङ्मया-वर परिणाम घडत असतो हें आम्ही जाणून आहों; परंतु या दृष्टीनें वाङ्मयाचा अभ्यास कॉलेजांत गेल्यावरच करावयाचा असतो. तो अभ्यास करण्याचें हें वय नव्हे. शिवाय लेखकांच्या जन्ममृत्यूंच्या तारखा, त्यांच्या शिक्षणाची व नोकरीची जुजबी माहिती आणि त्यांनीं लिहिलेल्या पुस्तकांचीं नांवें या तुटपुंज्या सामुग्रीचा निवडलेल्या लेखाच्या अभ्यासावर कितीसा प्रकाश पडणार आहे ?

मुलांना प्रचलित वाङ्मयाचा परिचय करून देण्याकडे शिक्षणतज्ज्ञांचा अलीकडे कल आहे. यामुळेंच इंग्लंडमधील शाळांत "Poems of To-day" "Essays of To-day" अशीं पाठ्यपुस्तकें चालू आहेत. ॲडिसन, स्विफ्ट, मेकॉले यांच्यापेक्षां लिंड्, लूकस्, चेस्टरटन, गार्डिनर यांचा नव्या पिढीला परिचय करून देणें तिकडे अधिक अवश्य वाटतें. आम्ही जुन्या विभूतींची व जुन्या वाङ्मयप्रकारांची हेळसांड न करितां अभिनव व प्रचलित वाङ्मयप्रकारांचा मुलांना परिचय करून दिला आहे. उदाहरणार्थ, गद्यकाव्य, आकाशनाट्य हे प्रकार अगदींच नवे आहेत. चित्रपरिचय हाहि आमचा उपक्रम अगदीं नवा आहे. आमची अशी समजूत आहे कीं सुंदर चित्रांकडे कोणत्या दृष्टीनें पाहावयाचें याचें योग्य मार्गदर्शन याच वयांत नीट केल्यास चित्रकलेबद्दल मुलांच्या मनांत शास्त्रशुद्ध अभिरुचि उत्पन्न होईल व चित्रकलेची आमच्या समाजांत सध्यां जी अवहेलना चालली आहे तशी पुढच्या पिढीकडून ती होणार नाहीं. शिवाय कलेंतील सौंदर्य स्वतःच्या भाषेंत सांगतां येऊं लागलें तर

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

मुलांना वाङ्मयप्रकारांतील रहस्य जास्त सुलभपणें कळेल आणि त्यांचें मन सुसंस्कृतहि होईल.

नुसत्या सुंदर कविता किंवा गद्य उतारे मुलांसमोर ठेवून भागत नाहीं; त्यांचा आस्वाद कसा घ्यावयाचा हें मुलांना शिकविलें पाहिजे. नुसतें 'किती छान कविता,' 'किती छान कल्पना' असें बोलून मुलांना त्यांतील 'छानपणा' कळत नाहीं. लेखांच्या वाङ्मयगुणांचें पृथक्करण केलें पाहिजे; अलंकार, ध्वनि, नादमाधुर्य, विनोद-विचारगांभीर्य, कल्पनावैचित्र्य, वृत्तविशेष यांची त्यांना जाणीव करून दिली पाहिजे; अवतरणें (Quotations), श्रुतयोजना (Allusion) यांचा विचार केला पाहिजे; आणि तुलनात्मक विवेचन केलें पाहिजे. याशिवाय सूक्ष्म अभ्यास व सौंदर्यदर्शन यासाठींहि प्रश्न दिले पाहिजेत. आम्ही प्रत्येक धड्याच्या शेवटीं याप्रकारच्या परिचयाची व अभ्यासाची व्यवस्था केली आहे. शिक्षकांना त्यांच्या अध्यापन-कार्यांत याचा चांगला उपयोग होईल अशी आशा आहे. जातां जातां आणखी एका गोष्टीचा येथें निर्देश करावासा वाटतो. अलीकडे कांहीं कवींच्या लोकप्रिय कवितांच्या ध्वनिमुद्रिका (रेकॉर्डस्) तयार झाल्या आहेत. प्रस्तुत पुस्तकांतील 'गुलामाचें गाऱ्हाणें' ह्या कवितेच्या, त्याचप्रमाणें 'तुकाराम,' 'चिंगी महिन्याची झाली नाहीं तोंच' यांच्या 'हिज् मास्टर्स व्हॉइस' कंपनीनें ध्वनिमुद्रिका तयार केल्या आहेत. हे उतारे शिकविण्याचे आधीं वर्गांत ग्रामोफोनवर या ध्वनिमुद्रिका लाविल्यास योग्य वातावरण उत्पन्न होऊन, शिक्षकास ते ते उतारे शिकविणें फारच सुलभ जाईल, व विद्यार्थ्यांनाहि खरा रसास्वाद घेतां येईल.

इंग्रजीसारख्या परक्या भाषेसाठीं आमच्या शिक्षणसंस्थांत **अवांतर वाचनाची** सोय केलेली असते; परंतु मातृभाषेच्या शिक्षणाकरितां केवळ शंभर दीडशें पानांचें एक पुस्तक किंवा त्यांचा निवडक भागच आम्हांला वर्षभर पुरेसा वाटतो. वास्तविक एवढ्या लहानशा पुस्तकांत कितीसे उतारे येणार आहेत? अशा पुस्तकांत कितीतरी लेखकांना वगळावें लागणारच.

तेव्हां आमची शिक्षकांना अशी अगत्याची सूचना आहे कीं त्यांनीं 'साहित्य-परिचय' या पाठ्यपुस्तकाशिवाय मुलांकडून अवांतर वाचनहि करून घ्यावें. या पुस्तकांतील कवितांशिवाय आमच्या 'महाराष्ट्र–रसवंती'च्या तीन भागांतून पुष्कळ सुंदर कविता त्यांना निवडतां येतील. शिवाय एखादी सुबोध कादंबरी, नाटक किंवा

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

निबंधसंग्रह यांचेंहि वाचन करून घेतां येईल. या अवांतर वाचनांत तपशिलाकडे पाहावयाचें नाहीं, स्थूल अभ्यास करावयाचा एवढें धोरण ठेवलें म्हणजे झालें.

विद्यार्थ्यांसाठीं लिहिलेल्या या मालेंतील लेखांत कांहीं फरक करावे लागले याबद्दल लेखक आम्हांला क्षमा करतील अशी आशा आहे. तसेंच ज्यांनीं हे उतारे घेण्यास परवानगी दिली त्यांचेहि आम्ही अत्यंत आभारी आहोंत. त्याचप्रमाणें खास या तीन भागांकरितां ज्यांनीं लेख लिहून दिले ते आमचे स्नेही श्री. वि. स. खांडेकर, प्राचीन कवींच्या कविता निवडण्याला आम्हांस मदत करणारे महाराष्ट्र–भाषाभूषण जगन्नाथ रघुनाथ आजगांवकर, पुस्तकांची चित्रांचे द्वारा उच्च दर्जाची सजावट करून देणारे चित्रकार श्री. विनायक मसोजी, श्री. धोपेश्वरकर व श्री. नी. म. केळकर यांचे तर आभार मानावे तेवढे थोडेच.

'नवयुगवाचनमाले'च्या पहिल्या चार पुस्तकांचें आणि 'महाराष्ट्र-रसवंती'चें ज्याप्रमाणें शिक्षकबंधूंनीं प्रेमपूर्वक स्वागत केलें, त्याप्रमाणेंच या पुस्तकांचेंहि ते करतील, अशी आम्हांला उमेद आहे.

ता. १ नोव्हेंबर १९३५
मुंबई

श्री. बा. रानडे
गं. दे. खानोलकर

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

अनुक्रमणिका

—:०:—

			पृष्ठ
१ हिंदवंदना	(कविता)	चंद्रशेखर	१
२ अप्पलपोटा यक्ष			४
३ संशयरत्नमाला	(कविता)	मोरोपंत	१२
४ अज्ञानाचा आनंद	(लघुनिबंध)	अनंत काणेकर	१५
५ न्यायदक्ष माधवराव पेशवे	(जुनें गद्य)	सोहनी	१९
६ जळजळ	(कविता)	ह. स. गोखले	२४
७ लागली एकदाची तसबीर	(नाट्यसंवाद)	सौ. शालिनीबाई रानडे	२६
८ उषा	(स्वभावचित्र)	तळवलकर	३३
९ शांति	(चित्रपरिचय)	रानडे	३७
१० आईची आठवण	(कविता)	माधव जूलियन्	३८
११ मुंबईतील तात्यापंतोजीची शाळा		दादोबा पांडुरंग	४०
१२ भीष्मप्रतिज्ञापूर्ति	(कविता)	वामन पंडित	४५
१३ गरिबाची अधेली		रा. भि. जोशी	४९
१४ अन्योक्ति	(कविता)	कृष्णशास्त्री चिपळूणकर	५५
१५ शिपाई खेंकडा व समुद्रफूल		ज. नी. कर्वे	५९
१६ गंगेपासून होणारे ऐहिक उपयोग	(कविता)	चिंतामणीपेठकर	६४
१७ चिंगी महिन्याची झाली नाहीं तोंच	(नाट्यछटा)	दिवाकर	६७
१८ घन तमीं शुक्र बघ राज्य करी	(कविता)	तांबे	६९
१९ वीर मृत्युंजय	(मूर्तिपरिचय)	रानडे	७१
२० देव न मानणारा देवमाणूस		खांडेकर	७२
२१ निज नीज माझ्या बाळा	(कविता)	दत्त	७९
२२ सवदा अंगावर आला !		विनीत	८२

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

			पृष्ठ
२३ गोफण मारणारास	(कविता)	भवानीशंकर पंडित	९६
२४ एका दिवसाची दैनंदिनी			९८
२५ श्रीकृष्णजन्मकालवर्णन	(कविता)	कृष्णदयार्णव	१०६
२६ विष्णुशास्त्री चिपळूणकर		वि. कों. ओक	१०७
२७ झोंपेंत हंसणाऱ्या सुधेस	(कविता)	सौ. मनोरमाबाई रानडे	११२
२८ मी नाहीं जा!	(मूर्तिपरिचय)	रानडे	११३
२९ पिल्या ठोठाव	(नाट्यसंवाद)	केळकर	११४
३० गुलामाचें गाऱ्हाणें	(कविता)	यशवंत	१२०
३१ व्हिक्टोरियावाला	(शब्दचित्र)	कुमार रघुवीर	१२१
३२ तो पशूहि न धरी खंत	(कविता)	अज्ञातवासी	१३१
३३ रबर	(गोष्ट)	मधुसूदन रानडे	१३२
३४ पांडुतात्यांची झोंप	(विनोदी लेख)	श्री. कृ. कोल्हटकर	१३७
३५ खेड्यांतील घराकडे	(कविता)	वा. भा. पाठक	१४१
३६ कांहीं जुनें कथाप्रकार		खानोलकर	१४४
३७ तृणाची थोरवी	(लघुनिबंध)	पां. स. साने	१४८
३८ विरोल्यानें काय शिकविलें		प्रो. वा. ब. पटवर्धन	१५२
३९ सारंगीवाला	(कविता)	गिरीश	१६०
४० रेनकोटाचीं साहसें	(विनोदी)	कॅप्टन लिमये	१६२
४१ काव्यगायन	(व्यंगचित्रपरिचय)	खानोलकर	१७३
४२ आई—!	(कविता)	विठ्ठलराव घाटे	१७५

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

१

हिंदवंदना

जिच्यावरि वितान हें गगन इंद्रनीलापरी
जिच्या तळपतो शिरीं हिमगिरी किरीटापरि,
जिच्यावरि नद्या, झरे, नहि जवाहिरें गोमटीं,
जिच्या घन वनस्पती, परि न पैठणी पोपटी.

जिचें पदकपीठ हें, जन म्हणोत लंका रिते,
सुवर्णकलशापरी, पदतलें अलंकारितें;
अशा सुकलशावरी, विपुलमुक्तरत्नासनीं,
जिला विधि विराजवी, किमपि धन्य तो या जनीं !

जिला जलधिरूप हा वरुण अर्घ्यपाद्यें करी,
जिलाहि अभिषेकितो वरुनि मंत्रघोषें हरी,
जिला सजविते उषा, अरुण मंगलें दे महा,
जिला रवि निवेदितो बहुविधान्न–नैवेद्य हा;

पलाश फुलल्यामुळें सकळ रंगतां जंगलें,
रसाल–फल–तोरणें डुलुनि राहातां मंगलें,
वनीं झुलुनि राहतां ध्वनि सरंध्र वंशांतलें,
जिला मधु निवेदिती मधुपयक्ष कोशांतलें;

जिच्या खुलति केशरी फुलमळे ललाटास ते,
गुलाब–सुविकास, तें स्मित जिचें मला भासतें,
जिचीं अंमृतमंडलें मृगमदें सुगंधी किती !
किती भरतबालकें ! जननि वत्सला धन्य ती !

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

अनेक वनदेवता करिति वायनें, श्रीफळें,
समर्पिति उपायनें, बहु विडे, फळें पोफळें;
जिच्यावरुनि चामरें मिरवितात गंगावनीं,
जिला मलयवात हे करिति विंझणे चंदनी;
फुलें वरुनि वर्षती सुरतरूच गंधर्व कीं!
मयूर—नट नाचती अभिनयें लता—नर्तकीं,
जिला रमविती महाकवि—विहंग संगीतकीं,
जिचें हृदय होतसे ध्वनितरंग—रंगीत कीं!

*　　*　　*　　*

तुझे गिरि, तुझ्या शिला, बहुपरी तुझ्या वालुका,
तुझें खनिज, सन्मणी, रस तुझे, तुझ्या मृत्तिका,
महार्णव तुझा, तुझे विविध धाकुटे सागर,
तयांतुनि कितेक तो दिसति मुक्त—वैरागर.
मुखें, नद, नद्या तुझ्या, धबधबे तुझे कालवे,
झरे अमृत पाझरे! रजतरूप ओढे नवे,
सरें, कमलपल्वलें, विपुल कूप वापी किती,
रुची गुणहि भिन्न ते; प्रकृति भिन्न तैशा कृति.
अनेक गवतें तुझीं, विविध कंदमूलें तुझीं,
तुझे तरु तुझ्या लता, गुणनिधान पत्रें तुझीं,
अनेक—गुणगंधिनी तव सुरम्य रंगी फुलें,
किती रसगुणाढ्य तीं तव अनेक रंगी फलें!
अमोल गुणवंत तीं असति भिन्न बीजें किती!
अनेकविध धान्य तें तव वदूं वदान्ये! किती!

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

अगाध गुणवर्णनीं भरुनि राहिल्या संहिता !
हितार्थ अमुच्या किती असति देवि ! भारांकिता !

*   *   *   *

तुझीं निबिड काननें, नभ जिथें दिसे ना दिसे,
भयाण दिनरूपही, रजनिरूप तेथें कसें ?
विशाल कुरणें तुझीं, कळप, ज्यांत खिल्लार तें
चरोनि गलघंटिका विचरतां टणत्कारितें.

*   *   *   *

निरामय, निवांत तीं तरुततींत खेडीं तुझीं,
अनेक—रचनागुणान्वित अनेक गांवें तुझीं.

*   *   *   *

कुणांत धनधान्यता तरि कुणांत वाग्देवता,
कलाकुशलता वसे तरि कुणांत लावण्यता.
निसर्गरमणीयता, तरि कुणांत आरोग्यता,
तुझ्या बहुविध स्थलीं बहुविधा अशी योग्यता.

*   *   *   *

तुझ्या उदरिं जन्मलों, मज नसो पुन्हां जन्मणें,
परं च असलें, तरी जननि हिंद हो ! मी म्हणें.
फिरोनि 'उदयोऽस्तु ते' म्हणुनि हिंद ! ही वंदना;
अशेष तव नंदना करि कृतार्थ बंदीजना.

चंद्रशेखर

परिचय

प्रसिद्ध राजकवि चंद्रशेखर यांची हिंदभूमीस वंदनपर अशी ही कविता आहे. भाषा संस्कृतप्रचुर असूनहि सोपी व प्रासादिक आहे. एखाद्या तुटपुंज्या

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

कवीच्या कल्पनांची व शब्दांची पुंजी वर्णन करितांना लवकरच संपते. याच्या उलट चंद्रशेखरांच्या वाणीचा प्रवाह अस्खलित चालतो. हिंदभूमीच्या वैभवाचें वर्णन करूं लागतांच तिचे गिरी, नद्या, पल्वलें, मृत्तिका—कितीतरी गोष्टी चंद्रशेखरांना सुचतात.

अभ्यास

१. चंद्रशेखरांच्या कवितेंत रसाळ शब्दरचना आणि अनुप्रास हे दोन विशेष आहेत. यांचीं उदाहरणें कवितेंतून शोधून काढा.
२. वदान्य, गलघंटिका, निरामय यांचे अर्थ द्या.
३. 'संहिता' म्हणजे स्तवनपर काव्यांचा संग्रह. 'परं च असलें' इत्यादि = परंतु परत जन्म घेणें प्राप्त असेल तर हिंदच जननी होवो असें मी म्हणेन. 'अशेष' = पूर्णपणें.

२

अप्पलपोटा यक्ष

संध्याकाळीं शाळा सुटली म्हणजे मुलांनीं घरीं येतांना यक्षाच्या बागेंत जावें आणि तेथें खेळावें असा मुलांचा दररोजचा क्रम होता.

यक्षाची बाग भली मोठी आणि छानदार होती. तिच्यांत मऊमऊ असें हिरवेंचार गवत उगवलेलें होतें. त्या गवतांत मधून मधून नक्षत्रासारखीं सुंदर फुलें होतीं; आणि त्या बागेंत सुंदर बारा झाडें होतीं. वसंतऋतु आला म्हणजे या झाडांवर गुलाबी आणि मोतीया रंगाचीं नाजूक फुलें येत आणि पावसाळ्यांत नामी फळांनीं तीं झाडें वांकून जात. पक्ष्यांनीं बागेंत यावें, या झाडांवर बसावें आणि गोड गाणीं म्हणावीं. ते इतकीं गोड गाणीं गात कीं, तीं ऐकत असतां मुलें आपले खेळ विसरून जात. आणखी तीं म्हणत: " इथें आपली सगळी मौजच मौज ! वाहवा ! वाहवा ! "

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

एके दिवशीं यक्ष घरीं आला. त्याचा एक यक्ष मित्र दुसऱ्या गांवीं रहात असे. त्याला भेटण्यासाठीं तो गेला होता. तिकडे तो सात वर्षें होता. सात वर्षें भरल्यावर मित्राबरोबर त्यास ज्या काय गोष्टी बोलावयाच्या होत्या त्या बोलून संपल्या—कारण त्याचें बोलणें बेताचें होतें !—आणि परत घरीं येण्याचा त्यानें निश्चय केला. घरीं आल्यावर मुलें बागेंत खेळतांना त्याच्या दृष्टीस पडलीं.

यक्ष मोठ्या कर्कश आवाजांत म्हणाला, "काय रे पोरांनो! काय चालविलें आहे तुम्ही येथें ?" त्याबरोबर मुलें पळून गेलीं.

"माझा बाग म्हणजे माझा एकट्याचा बाग आहे." यक्ष आपल्या मनांत म्हणाला, "प्रत्येकाला ही गोष्ट कळली पाहिजे. माझ्याशिवाय दुसऱ्या कोणालाहि या बागेंत खेळावयास मिळणार नाहीं." असें म्हणून त्यानें आपल्या बागेसभोंवतीं उंच तट बांधला आणि बाहेर एक पाटी लाविली.

हुकुमाशिवाय आंत येणारांवर
खटला केला जाईल.

तो मोठा अप्पलपोटा यक्ष होता.

यक्षानें असें केल्यामुळें बिचाऱ्या मुलांना खेळायला कोठेंहि जागा नाहींशी झाली. तीं रस्त्यावर खेळायला गेलीं, पण सगळ्या रस्त्यावर खूप धूळ आणि दगड असल्यामुळें तो त्यांच्या मनास आला नाहीं. शाळा सुटली कीं मागच्यासारखें रोज त्यांनीं त्या उंच तटाकडे यावें आणि आंतील सुंदर बागेच्या गोष्टी करीत तटाभोंवतीं फीर फीर फिरावें. त्यांनीं एकमेकांस म्हणावें, "आंत कित्ति कित्तीतरी मौज होती ?"

कांहीं दिवसांनीं **वसंत**ऋतु आला. जिकडे तिकडे कोंवळा मोहोर, कोंवळी पालवी, आणि चिमणे पक्षी दिसूं लागले. त्या अप्पलपोट्या यक्षाच्या

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

बागेंत मात्र अजून शिशिरऋतु—थंडीचे दिवस—होते. बागेंत मुलें नसल्या-मुळें पक्षीहि बागेंत येऊन गाईनातसे झाले होते; आणि झाडांवर नवी पालवी आली नव्हती. एकदां एका सुंदर फुलानें गवतांतून वर मान केली, पण यक्षानें लाविलेली पाटी त्याच्या दृष्टीस पडतांच मुलांची त्याला फार कींव आली, आणि तत्काळ आपलें तोंड मातींत खुपसून तें झोंपीं गेलें. **वसंत** आला नाहीं हें पाहून **बर्फ** आणि **हिमतुषार** यांना मात्र मोठा हर्ष झाला. ते म्हणाले, "**वसंत** या बागेला यंदां विसरला. आतां वर्षभर आपण इथें राहून मजा करूं." **बर्फा**नें आपल्या पांढऱ्या वस्त्रानें गवतावर पांघरूण घातलें आणि **हिमतुषारांनीं** सगळ्या झाडांना रुपेरी रंग दिला. नंतर त्यांनीं **उत्तर-वाऱ्या**ला आपल्या संगतीं येऊन राहण्यासाठीं आमंत्रण केलें. वारा आला आणि सारा दिवस बागेंत मोठमोठ्यानें गर्जना करूं लागला. सगळीं धुराडीं, खिडक्या, दारें त्यानें फोडून टाकिलीं. तो म्हणाला, "हें ठिकाण मोठें छान आहे बोवा. आपण **गार**बाईलाहि थोडे दिवस इकडे बोलावूं." त्याप्रमाणें **गारे**ची स्वारी आली. रोज एक प्रहरभर तिनें घरच्या छपरावर नाचावें असा क्रम सुरू केला. शेवटीं सगळें छप्पर मोडून गेलें, तशी ती मग बागेंत नाचूं उडूं लागली. तिचा पोषाख करड्या रंगाचा होता, आणि तिच्या तोंडांतून बर्फासारख्या थंडगार वाफा निघत असत.

एके दिवशीं तो अप्पलपोटा यक्ष आपल्या बागेकडे पहात खिडकीजवळ बसला होता. तो म्हणाला, "यंदां **वसंता**ला यावयास इतका उशीर कां लागावा बरें? आतां तरी ही हवा एकदांची निघून जावो."

पण **वसंत** कांहीं आला नाहीं, आणि **उन्हाळा** पण आला नाहीं. सगळ्या बागांना **पावसाळ्या**नें उत्तम रसभरित फळें दिलीं पण यक्षाच्या बागेस त्यानें कांहींसुद्धां दिलें नाहीं. तो म्हणाला, "हा यक्ष मोठा अप्पलपोटा आहे." सगळ्यांनींच असें म्हटल्यामुळें यक्षाच्या बागेंत वर्षभर **हिंवाळाच**

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

राहिला, आणि त्याच्याबरोबर **उत्तर-वारा, गार, हिमतुषार, बर्फ** ही सर्व मंडळी राहून झाडावर यथेच्छ नाचूं लागली.

एके दिवशीं सकाळीं यक्ष नुक्ता जागा होत आहे, इतक्यांत त्याला गोड गाण्याची एक लकेर ऐकूं आली. तें गाणें त्याला इतकें कांहीं गोड वाटलें कीं, राजाच्या दरबारांतील गवई वाटेनें गेला असावा असा त्यानें अदमास केला. पण वास्तविक एक चिमणा चंडोल त्याच्या खिडकीजवळ बसून गात होता. यक्षानें आपल्या बागेंत कैक दिवसांत पक्ष्याचें गाणें ऐकिलें नसल्यामुळें त्या चंडोलाचें गाणें त्याला अत्यंत गोड वाटलें. इतक्यांत **गार** नाचावयाची थांबली, आणि **उत्तर-वाराहि** गरजण्याचा बंद झाला, आणि खिडकीच्या जाळींतून मधुर सुवास आंत येऊं लागला. तें पाहून यक्ष म्हणाला, "शेवटीं **वसंत** आला असावा असें दिसतें." असें म्हणून तो बिछान्यावरून उडी मारून उठला आणि बाहेर पाहूं लागला. त्यानें काय पाहिलें?

त्यानें एक मोठा अद्भुत देखावा पाहिला. भिंतींत लहानशी वाट पाडून मुलें आंत आलीं असून झाडांच्या फांद्यांवर तीं बसलीं आहेत. जें जें झाड त्याच्या दृष्टीस पडलें, त्या त्या झाडावर एक चिमुकलें मूल! मुलें परत आपल्याला भेटलेलीं पाहून सगळ्या झाडांना इतका आनंद झाला होता कीं, सगळ्यांनीं कोवळी पालवी धारण केली होती. आणि त्या कोमल-पल्लवरूपी चवऱ्या तीं मुलांच्या मस्तकावर ढाळीत होतीं. पक्षी मोठ्या आनंदानें इकडून तिकडे भराऱ्या मारीत होते आणि पुलें हिरव्या गवतांतून आपलीं तोंडें वर करून हांसत होतीं. सगळा देखावा मोठा नामी होता. फक्त एका कोंपऱ्यांत मात्र **हिंवाळा** होता. तो कोंपरा बागेच्या एका लांबच्या टोकास होता. आणि त्या ठिकाणीं एक चिमुकला मुलगा उभा होता. तो इतका लहान होता कीं, त्याचे

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

हात झाडाच्या फांद्यांस पोंहचत नव्हते त्यामुळें तो एकसारखा रडत त्या झाडाभोंवतीं धांवत होता. बिचाऱ्या झाडावर अद्याप **बर्फ** आणि **हिम** पसरलेलें होतें आणि **उत्तर-वारा** त्याच्या मस्तकावर अद्याप सूं सूं करीत वाहत होता. झाड म्हणालें, "ये माझ्या चिमण्या आणि पटकन् माझ्यावर चढ." असें म्हणून त्यानें आपल्या फांद्या खालीं वाकवितां आल्या तितक्या वांकविल्या; पण मुलगा पडला अगदींच चिमुकला !

यक्ष हा सगळा प्रकार पहात होता. तो पाहून त्याच्या हृदयाला पाझर फुटला. तो म्हणाला, "अरेरे ! केवढा मी अप्पलपोट्या ! माझ्या बागेंत **वसंत** कां आला नाहीं, हें आतां माझ्या लक्षांत आलें. आपण आतां त्या झाडापाशीं जाऊन त्या बिचाऱ्या मुलाला झाडावर ठेवून देऊं आणि मग सगळा तट पाडून टाकूं, म्हणजे मग मुलें निरंतर माझ्या बागेंत येऊन खेळतील." कृतकर्माबद्दल यक्षास मोठा पश्चात्ताप झाला.

नंतर यक्ष खालीं गेला. हळूच पुढला दरवाजा उघडून तो बागेंत गेला, पण त्याला पहाण्याबरोबर सगळीं मुलें भिऊन पळून गेलीं; आणि बागेंत पुनः हिंवाळ्याचें राज्य सुरू झालें. फक्त तो चिमकुला मुलगा मात्र पळून गेला नाहीं. कारण त्याचे डोळे अश्रूंनीं इतके भरून गेले होते कीं, यक्ष येतो आहे हें त्याला दिसलेंच नाहीं. तें पाहून यक्ष पाऊल न वाजवितां हळूच त्याच्याजवळ गेला, त्याला त्यानें अगदीं नाजूक रीतीनें आपल्या हातांनीं वर उचललें आणि झाडावर ठेऊन दिलें. तत्काळ त्या झाडास पालवी फुटली, आणि पक्षी त्याच्यावर येऊन बसले, आणि गाऊं लागले; त्या चिमुकल्या मुलानें आपले चिमुकले हात पसरून यक्षाच्या गळ्यास मिठी मारली आणि त्याचें चुंबन घेतलें. बाकीच्या मुलांनीं जेव्हां ही गोष्ट पाहिली तेव्हां तींहि धांवत परत आलीं आणि त्यांच्याबरोबर **वसंत**हि आला. यक्ष म्हणाला, "बाळांनो, आजपासून हा बाग तुमचाच आहे." नंतर

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

त्यानें एक मोठी पहार घेतली आणि सगळा तट पाडून टाकला. दुपारीं लोक जेव्हां बाजाराला जाऊं लागले तेव्हां त्यांना त्या अत्यंत सुंदर बागेंत मुलांबरोबर यक्ष खेळत असलेला दृष्टीस पडला. हें दृश्य त्यांना अगदीं नवें होतें.

सगळा दिवस मुलें बागेंत खेळलीं आणि संध्याकाळ झाला, तशीं तीं यक्षाला 'जातों' म्हणून सांगावयास आलीं.

यक्ष म्हणाला, "काय रे मुलांनो, तुमचा तो छोटा संवगडी तुमच्याबरोबर कुठें दिसत नाहीं तो?—मी झाडावर उचलून ठेवला, तो कुठें आहे?" यक्षाची प्रीती सगळ्यांत त्या मुलावर होती. कारण त्यानें यक्षास चुंबन दिलें होतें.

मुलें म्हणालीं, "आम्हांला माहित नाहीं तो कुठें गेला बोवा!" यक्ष म्हणाला, "त्याला तुम्ही जरूर भेटून उद्यां येथें यायला सांगा." मुलें म्हणालीं "तो कुठें राहतो आम्हांला काय ठाऊक? आम्ही त्याला त्यापूर्वीं कधीं पाहिलेंहि नव्हतें." तें ऐकून यक्षास वाईट वाटलें.

रोज संध्याकाळीं शाळा सुटली कीं, मुलें यक्षाच्या बागेंत येत आणि यक्षाबरोबर खेळत असत. पण यक्षाचें ज्याच्यावर प्रेम बसलें होतें तो लहान मुलगा कांहीं पुन्हां दृष्टीस पडला नाहीं, सर्व मुलांवर यक्ष मोठी ममता करी तरी त्या लहान मुलाची त्यास वारंवार आठवण होत असे आणि त्याची तो नेहमीं चौकशी करी. तो म्हणे, तो मुलगा पुनः माझ्या केव्हां हो दृष्टीस पडेल?"

अशा रीतीनें अनेक वर्षें गेलीं. यक्ष म्हातारा झाला. पूर्वींची शक्ति अंगांत राहिली नाहीं. अलीकडे मुलांबरोबर खेळण्याची शक्तीहि त्याचे अंगीं राहिली नाहीं. आरामखुर्चीवर तो स्वस्थपणें पडून काळ घालवूं लागला.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

त्या ठिकाणीं बसून मुलांचे खेळ त्यानें पहावे आणि आपल्या बागेची शोभा पाहून हर्ष मानावा. त्यानें म्हणावें, "माझ्या बागेंत पुष्कळ सुंदर फुलें आहेत, पण मुलें हीं सर्व फुलांत अत्यंत सुंदर फुलें होत."

हिंवाळ्यांत एके दिवशीं सकाळीं तो अंगावर कपडे चढवीत असतां सहज त्याची नजर खिडकीबाहेर गेली. **हिंवाळ्या**चा आतां त्याला कंटाळा वाटत नव्हता. कारण सध्यां **वसंत**ऋतु झोंपलेला असून फुलें विश्रांती घेत आहेत हें त्यास कळत होतें.

यक्ष आश्चर्यानें आपले डोळे चोळूं लागला आणि पुनः पुन्हां निरखून पाहूं लागला. अहाहा! कितीतरी आल्हादकारक देखावा तो! बागेच्या दूरच्या कोंपऱ्यांतील एका झाडावर सुंदर पांढरा मोहोर फुललेला आहे, त्याच्या सर्व फांद्या सोनेरी दिसत आहेत आणि रुपेरी फळें त्यांवरून खालीं लोंबत आहेत; आणि त्या झाडाखालीं यक्षाचा तो लाडका चिमकुला मुलगा उभा आहे!

यक्ष अत्यंत हर्षभरित होऊन धांवत खालीं बागेंत गेला आणि गवतावरून जलदीनें चालत जाऊन त्या मुलाजवळ जाऊन उभा राहिला. मुलाच्या अगदीं जवळ जातांच त्याचा चेहरा रागानें लाल झाला. तो म्हणाला, "तुझ्या अंगाला कोणी हात लावला सांग पाहूं?" कारण त्या मुलाच्या तळहातांवर खिळे टोंचल्याच्या दोन खुणा होत्या आणि तशाच दोन खुणा पायांवर दिसत होत्या.

यक्ष म्हणाला, "तुला खिळे टोंचून जखम करणारा असा कोण दुष्ट आहे सांग म्हणजे माझ्या मोठ्या तलवारीनें मी त्याला मारतों."

"छे छे!" मुलानें शांतपणें उत्तर दिलें, "असें करूं नको, ह्या जखमा प्रीतीच्या आहेत."

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

"तूं आहेस तरी कोण ?" यक्षानें विचारलें. यक्ष आश्चर्यानें स्तंभित झाला. त्यानें भक्तिभावानें त्या मुलास नमस्कार केला. मुलगा यक्षाकडे पाहून हंसला आणि त्याला म्हणाला, "मला तूं एकवेळ आपल्या बागेंत खेळूं दिलेंस. आज तूं माझ्याबरोबर माझ्या बागेंत–नंदनवनांत–चल."

ते दिवशीं संध्याकाळीं नित्याप्रमाणें मुलें बागेंत खेळावयास येतात तों झाडाखालीं मरून पडलेला यक्ष त्यांच्या दृष्टीस पडला. त्याच्यावर शुभ्र फुलांच्या पाकळ्यांचें पांघरूण घातलेलें होतें.

करमणूक

परिचय

ऑस्कर वाइल्ड या इंग्रजी ग्रंथकाराच्या 'The Seifish Giant' या नामांकित अद्भुत कथेचें हें भाषांतर आहे. या कथेंत अद्भुतरसाचा अवलंब कांहीं सुंदर तत्त्वांच्या चित्रणासाठीं केला आहे. यक्ष म्हणजे माणसांना उपद्रव न करणारा पण भला मोठा जाडजूड प्राणी कल्पिला आहे. या गोष्टींतला चिमणा मुलगा म्हणजे भगवान् **येशू ख्रिस्त** होय. त्याला मुलें फार आवडत. "मुलांना माझ्याजवळ येऊं द्या," असें त्याचें वचन प्रसिद्ध आहे. ख्रिस्ताला धर्मवेड्या लोकांनीं पायांना व हातांना खिळे ठोकून सुळीं दिलें होतें. जगांतील दुखी, अशक्त, अजाण व पापी लोकांवरील प्रेमामुळें ख्रिस्तानें हें मरण आनंदानें पत्करलें. मराठी बायबलामधून ख्रिस्ताची ही कथा जरूर वाचा. आतां तुम्हाला, "या जखमा प्रीतीच्या आहेत" या मुलाच्या उत्तराचें रहस्य कळेल.

गोष्टींत वर्णिलेला हिंवाळा इंग्लंडसारख्या थंड देशांतला आहे. थंड देशांत या दिवसांत बर्फ, हिम व उत्तरदिशेकडून येणारे थंड वारे यांचेंच राज्य असतें.

अभ्यास

१. चिमणा मुलगा जर भगवान् ख्रिस्त मानला, तर यक्षाला तुम्ही काय म्हणाल? आणखी यक्षाचा बाग म्हणजे काय? जरा विचार करा.

२. "या जखमा प्रीतीच्या आहेत" म्हणजे काय?

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

३. चिमणा मुलगा ख्रिस्त होता हें लेखकानें कसकसें व्यक्त केलें आहे तें दाखवा.
४. गोष्टींत "नक्षत्रांसारखीं सुंदर फुलें होतीं" असें म्हटलें आहे. ढग, वीज, दहिंवर, लाटा यांना अशाच उपमा सुचवा.
५. आपल्याकडे किती ऋतु आहेत? नांवें सांगा प्रत्येक ऋतूंत विशेष काय फरक घडतात ते सांगा.
६. बागेबाहेर उभीं राहिलेलीं मुलें यक्षाविषयीं आपसांत काय बोललीं असतील याचा विचार करून त्याचा एक संवाद लिहा.

३

संशयरत्नमाला

उठतां बहु त्वरेनें 'कोठें जातां' असें तुम्हां देवी ॥
पुसती झाली जाणों, पुसतां ज्ञाता पुढें न पद ठेवी ॥ १ ॥
किंवा नारद आला आलापीत स्वकीय सच्चरितें ॥
प्रेमळ गीत तुम्हांला हरि हरिणापरिस बहुत वश करितें ॥ २ ॥
कीं माझें दुर्दैव प्रभुच्या मार्गांत आडवें पडलें ॥
शरणागतभयशमना यास्तव येणें तुझें नसे घडलें ॥ ३ ॥
किंवा मजहुनि दुसरा कोणी बहु दीन दास आढळला ॥
तच्छुभदैवसमीरें त्यावरी करुणाघन प्रभू वळला ॥ ४ ॥
प्रायः सुमुहूर्ताचा शोध करायासि लागला वेळ ॥
होय महत् कार्य परी प्रभुचा तों नित्य सहज हा खेळ ॥ ५ ॥
किंवा तुज एकाकी पाहुनि खळ दैत्य आडवे आले ॥
फुटतां सागर सिकतासेतूचें काय त्यापुढें चाले ॥ ६ ॥

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

किंवा तुज गुंतविलें भजकीं, परि ते दयार्द्र या रंकीं ॥
उद्धरित्यासि न सज्जन गुंतविती गाय कष्टतां पंकीं ॥ ७ ॥

किंवा चुकतें कांहीं स्तवनीं तेणेंचि मागुता बससी ॥
तरि हें मन्मूर्खत्व प्रभु तूं दोषज्ञही तसा नससी ॥ ८ ॥

कीं न श्रवणीं गेली ही माझी हाक, हा कसा तर्क ॥
कशि गुरुजनीं सतीची शिवला ज्या कुमुदिनीस असदर्क ॥ ९ ॥

अथवा स्वस्थचि असती कीं घेतो नाम रक्षणीं शूर ॥
हें सत्य परि प्रबळही बळ दुर्बळ जरी रणीं धणी दूर ॥ १० ॥

कीं भीतो भ्रांत वृथा मृगजळमग्नासि काय तारावें ॥
सत्यचि हें परि शिशुचें भय जाया बागुलासि मारावें ॥ ११ ॥

कीं कांहीं व्रतनियमीं बोलों चालों नये असें झालें ॥
तरि दीनरक्षणाहुनि अधिकफळव्रत कधीं मना आलें ॥ १२ ॥

कीं हाक ऐकतांचि प्रभुला हा रक्षणार्हसें वाटे ॥
वाटे या दुःशीलग्रीष्मीं तव नव दयानदी आटे ॥ १३ ॥

किंवा पुराणपुरुषा संप्रति बहु भागलासि या कामीं ॥
तुज नीज लागली तों सजलों मारावयासि हांका मी ॥ १४ ॥

किंवा बरी परीक्षा केल्यावांचूनि न प्रसाद करां ॥
तरि वरि तसाच आंतहि उगाळितां कोळसा प्रयास करा ॥१५॥

कीं धाडिलें पुढें निजनाम करो सर्व सिद्धता आधीं ॥
ऐसें प्रभो म्हणावें तरि तुमचीं चरणसारसें साधीं ॥ १६ ॥

कीं आर्जविला नामप्रतिनिधि हा अमृत उधळितो स्वैर ॥
न पुसे, न भी, न ऐके यास्तव दोघांत लागलें वैर ॥ १७ ॥

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

कीं संप्रति अभय दिलें कलिला चालवया बरें राज्य ॥
परि कोण प्राणि सदय शिंपील बळें दवानळीं आज्य ॥ १८ ॥

किंवा म्हणसि समर्थोऽहं कर्तुमकर्तुमन्यथाकर्तुं ॥
दीनावनाविणें क्षण देईल दयिता दया कशी वर्तुं ॥ १९ ॥

कीं अक्षक्रीडेनें हरिलें मन सर्व कार्य जी चुकवी ॥
तरि बद्धमूळ एकचि भजदवनव्यसन वर्णिती सुकवी ॥ २० ॥

कीं वैकुंठीं पुष्कळ भक्त, तिळ स्थळ नसे नसावेंची ॥
वसवा पुरें, पुरे कां म्हणतां, धनवंत कण कसा वेंची ॥ २१ ॥

कीं बहु काळ विसरला फारचि संकोचला सखा लाजे ॥
येत असेल हळु हळु म्हणुनचि एकही न पादुका वाजे ॥ २२ ॥

कीं नाम स्पर्शमणि स्पर्शों परि काय करिल खापर मी ॥
सदयहि घालील कसा दुर्दैवाला सुखी सखा परमीं ॥ २३ ॥

कीं प्रथम मदपराधें तारूं ना म्हणुनि वाहिल्या आणा ॥
प्रभुजी पुरे प्रतिज्ञा, भारतरणवृत्त तें मनीं आणा ॥ २४ ॥

कीं याचकांसि देतां सरले चारीहि मुक्तिधनराशी ॥
भक्तिच मज द्या, द्यावें देवाला अमृत, योग्य न नराशीं ॥ २५ ॥

कीं मागें गुप्त उभा अससि प्रेमें उभारुनी बाहे ॥
तरि काय बाळकाचे तूं सादर बोल ऐकशी बा हे ॥ २६ ॥

मोरोपंत

परिचय

भक्त संकटांत सांपडून देवाचा धांवा करीत आहे. बराच वेळ झाला तरी देव धावून येत नाहीं, तेव्हां मनांत नाना प्रकारचे संशय येतात. एकएक संशय म्हणजे मोरोपंतांच्या कल्पनेची एकएक भरारी होय. प्रत्येक आर्येंत

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

एकएक 'संशय' गोंविला आहे म्हणून या प्रसिद्ध कवितेस 'संशयरत्नमाला' म्हटलें आहे.

अभ्यास

१. दुसऱ्या आर्येंत **आला आला**पीत, व **हरि हरि**णापरिस हे अनुप्रास साधले आहेत. प्रास, अनुप्रास व यमक यांची माहिती शिक्षकाकडून घ्या.

२. सिकतासेतु = वाळूचा पूल. मागुता = परत. असदर्क = दुष्टांतला दुष्ट अर्थात् येथें हा शब्द दुःशासनास उद्देशून वापरला आहे. सतीची = द्रौपदीची. आज्य = तूप. कर्तुमकर्तुमन्यथाकर्तुं = (कांहींहि) करण्यास समर्थ, (कांहींहि) केलेलें केलें नाहीं असें करण्यास समर्थ, आणि कांहीं केलेलें असेल त्याऐवजीं वेगळें करण्यास समर्थ. व्यसन = संकट. पुरें = शहरें.

३. पुरे प्रतिज्ञा = देवा तुमच्या प्रतिज्ञेची गोष्ट काढूं नका. ठाऊक आहे मला; भारतीययुद्धांपूर्वीहि अशीच प्रतिज्ञा करून बसलां होतां पण मग ती मोडलीतच कीं नाहीं ?

४. तुम्हांला यांतील कोणते 'संशय' स्वाभाविक व सुंदर वाटतात ? कोणते 'संशय' केवळ कल्पनेच्या भराऱ्या आहेत ?

४

"अज्ञानाचा आनंद"

ज्ञानाची महती गाणाऱ्यांना मला एकच गोष्ट सांगावयाची आहे कीं, "बाबांनो, केव्हां केव्हां ज्ञानापेक्षां अज्ञानांतच खरी गम्मत असते !"

मला या गोष्टीचा पुष्कळ वेळां अनुभव आला आहे. एकदां मी तीन रुपयांना एक टोपी विकत घेतली, आणि खूप स्वस्तांत चांगली टोपी मिळाली म्हणून मी अगदीं आनंदांतच होतों. इतक्यांत हातांत एक पुडकें घेऊन आमचा एक मित्र तेथें आला. तेव्हां मोठ्या ऐटीनें माझी नवी टोपी दाखवीत मी त्याला म्हणालों, "तीन रुपयांना कशी फक्कड टोपी घेतली आहे महाराज ! पाहा तर खरी !"

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

" खरोखरच का तीन रुपये दिलेस तूं हिला ? " तो म्हणाला.

" म्हणजे ? तीन रुपयांना मिळायला बसली आहे वाटतं असली टोपी ? "

" अरे बाबा, ही बघ आतां मी दोन रुपयांना घेतली अगदीं हुबेहुब तसलीच टोपी ! " हातांतलें पुडकें सोडून त्यांतली टोपी दाखवीत तो म्हणाला, " हें बघ बिल पाहिजे तर ! "

माझा चेहरा पाहाण्यासारखा झाला. मी रागानें त्याच्या अंगावर ओरडलों, " मिळाली असेल तुला दोन रुपयांना, पण मला सांगून काय मिळवलंस ? माझ्या आनंदावर विरजण घालून तुला कांहीं मिळालं का ? "

स्वतःच्या झालेल्या फसवणुकीच्या बाबतींत शुद्ध अज्ञानाच्या गोड आनंदांत मी होतों, पण त्यानें विनाकारण मला ज्ञानाची जोड करून देऊन दुःखीकष्टी केलें. पुन्हां जेव्हां जेव्हां मी त्या टोपीकडे पाहात असें तेव्हां तेव्हां मला दुःखाचा कढ येऊन फुकट गेलेल्या रुपयाची आठवण होत असे. खरोखर माझे आजपर्यंत असे किती तरी रुपये किती तरी वेळां गेले असतील; पण दुःख होतें तें रुपये गेल्यामुळें नव्हे, तर ते गेल्याचें ज्ञान झाल्यावर ! ते गेलेले पत्करले, पण ते गेल्याचें ज्ञान नको. मला वाटतें अथेल्लोनें अशाच प्रकारचे उद्गार काढले आहेत; " चोरी झाली तर हरकत नाहीं, पण ज्याची चोरी झाली असेल त्याला हें कळूं तरी नये ! " खरें आहे. करावयाचें काय आहे असलें ज्ञान ? त्यापेक्षां अज्ञानच बरें.

कटु अनुभवांचें किंवा दुःखदायक गोष्टींचें मनुष्याला संपूर्ण ज्ञान असावें, असें एका प्रख्यात कादंबरीकाराचें मत आहे. कादंबरीकारानें अनेक सुंदर कादंबऱ्या लिहिल्या आहेत, आणि प्रत्येक कादंबरींत त्यानें मानवी

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

जीवनाची अत्यंत दुःखद आणि शोककारी बाजू रंगविली आहे. त्याचें लिखाण वाचल्यावर मनुष्य निराश, असहाय होतो. या कादंबरीकाराला कुणीसें एकदां विचारलें, " मनुष्याच्या आयुष्यांतले हे काळेकुट्ट प्रसंगच तूं सदासर्वकाळ कां चित्रित करतोस ?" तेव्हां तो म्हणाला, " माणसांना या भयंकर प्रसंगांचें पूर्ण ज्ञान झालेलें असलें, म्हणजे तसे प्रसंग आयुष्यांत आले असतां त्यांना तोंड द्यावयाचा खंबीरपणा त्यांना येतो. त्यांचीं मनें तयार झालेलीं असतात. "

या बड्या लेखकाला एक गोष्ट सांगावीशी मला वाटते. एक अति शहाणा माझ्या माहितीचा आहे. तो पुढें कधींकाळीं आपण उंचावरून खालीं पडलों तर डोकें फुटून प्राण जाईल म्हणून दररोज तास दोन तास स्वतःचें डोकें भिंतीवर आपटून घेत असतो ! बहुतेक तो या कादंबरीकाराचा प्रामाणिक अनुयायी असावा !

अज्ञान कधीं कधीं किती पथ्यावर पडतें, यासंबंधीं एक मजेदार गोष्ट आहे. दोन मित्र होते. त्यांपैकीं एक खूब लठ्ठ, खडबडीत आणि ओबड-धोबड होता. त्याचा मित्र एक दिवस त्याला म्हणाला, " हिप्पॉपॉटेमस् आहेस तूं गड्या !"

" खरंच ?" त्यानें विचारलें. त्याला वाटलें ' हिप्पॉपॉटेमस् ' या इंग्रजी शब्दाचा अर्थ कांहींतरी ' बडा विद्वान् ' वगैरे असावा !

त्या दिवसापासून तो लठ्ठ गृहस्थ आपल्या मित्रावर बेहद्द खूष होता. पुढें सातआठ वर्षांनीं तो एक प्राणिसंग्रहालय पहावयास गेला असतांना संग्रहालयाच्या एका भागांत त्याला एक अजस्र, ओबडधोबड प्राणी दिसला. हा प्राणी असावा तरी कोण म्हणून तो जों बाहेरची पाटी पहातो, तों तीवर ' हिप्पॉपॉटेमस् ' अशीं अक्षरें लिहिलेलीं त्याला दिसलीं !

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

"असं काय!" तो संतापानें लाल होऊन उद्गारला आणि तेथून तो तडक निघाला तो आपल्या मित्राच्या घरीं गेला.

"बदमाश!" आपल्या मित्राला पाहून तो ओरडला! "आज मी प्राणिसंग्रहालयांत 'हिप्पॉपॉटेमस्' म्हणजे काय आहे तें पाहिलं! आजपासून तुझी माझी मैत्री खलास!" काय ज्ञानाचा उपयोग?

बरें 'ज्ञान' 'ज्ञान' म्हणतात तें तरी कुठें त्रिकालाबाधित आहे? कालचें ज्ञान तें आजचें अज्ञान ठरतें. न्यूटन्‌चा गुरुत्वाकर्षणाचा जगद्विख्यात सिद्धान्तच घ्या ना! कालपरवांपर्यंत त्याच्या पलीकडे कांहीं सत्य असेल असें आम्हांला वाटतसुद्धां नव्हतें. आणि मी आतां ऐकतों कीं आइन्स्टाइननें तो सिद्धान्त फोल ठरविला आहे म्हणून! पूर्वींचे शास्त्रज्ञ म्हणत कीं पृथ्वी स्थिर आहे, आणि सूर्य तिच्याभोंवतीं फिरतो आहे. आमचे आजचे शास्त्रज्ञ सांगतात, कीं सूर्य स्थिर आहे, आणि पृथ्वीच फिरते आहे. आणखी माझी खात्री आहे कीं, माझे नातू नाहींतर पणतू मला सांगतील कीं, "आजोबा, पृथ्वीहि फिरत नाहीं, आणि सूर्यहि फिरत नाहीं. आपण माणसेंच आडवींतिडवीं फिरतों आहोंत!"

अनंत काणेकर

अभ्यास

१. हरि नारायण आपट्यांच्या चरित्राच्या लेखावर लिहितांना लेखाच्या सुरवातीबद्दल तुम्हांला सांगितलें होतें. आतां हा लेख घ्या. हा एक निबंध आहे, पण सुरवात कशी गमतीची, नाट्यपद्धतीची व परिणामकारक आहे तें पहा; 'सुरवात वाचून' तुमची उत्सुकता वाढते कीं नाहीं? नाहींतर अज्ञानाची व्याख्या, त्याचे नफे तोटे अशी रुक्ष सुरवात केली असती तर आरंभींच कंटाळा आला असता. निबंध लिहितांना हें ध्यानांत ठेवा.

२. केवळ शोककारी कादंबऱ्या लिहिण्याचा कादंबरीकाराचा हेतु अयोग्य होता हें सिद्ध करा.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

३ खुणा केलेल्या वाक्यांचे अर्थ सांगा.

४. "कालचें ज्ञान तें आजचें अज्ञान" या सिद्धांताचीं कांहीं उदाहरणें द्या. आजचें कोणतें ज्ञान उद्यां अज्ञान ठरेल असें तुम्हांस वाटतें? विचार करा.

५. अज्ञान असणें यांत आनंद आहे ही एक बाजू लेखकानें तुमच्यापुढें मांडली. या प्रश्नाला दुसरीहि बाजू आहे. ती मांडा.

५

न्यायदक्ष माधवराव पेशवे

पेशवे यांचे वंशांत रावसाहेबांसारखा कोणी पुरुष झाला नाहीं. यामुळें परराज्यांतील फिर्यादी पुण्यास येत असत. हैद्राबादेस नबाब ह्यांचे दिवाण रुखमतदौला होते ते आपणांस हवेली बांधावयास लागले, तेव्हां त्यांचे

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

शेजारीं एक गरीब ब्राह्मणाची जागा होती, ती जागा रुखमतदौला यानें जबरदस्तीनें घेतली. त्या ब्राह्मणाची दाद त्या दरबारांत लागली नाहीं म्हणून तो ब्राह्मण तेथून उठून पुण्यास फिर्यादीकरितां निघाला. रुखमतदौला यास ब्राह्मण बोलूं लागला कीं, "ह्या जागेचा कोणी अधिकारी असला तर तेथें मी दाद लावीन, आणि आपली जागा घेईन; नाहीं तर तुम्हांस दिली आहे." असें बोलून निघाला तो नीट पुण्यास आला. त्या दिवशीं चतुर्थी होती. श्रीमंतांची स्वारी थेउरास गणपतीचे दर्शनास निघाली. तेव्हां ब्राह्मण रस्त्यांत उभा राहून "फिर्याद!" म्हणून ओरडला. त्यावेळेस खांसा स्वारी घोड्यावर बसले होते. फिर्याद ऐकून घोडा उभा करून ब्राह्मणास अलीकडे बोलावून सर्व वर्तमान विचारिलें. त्यावेळेस तो मजकूर ऐकून घेऊन ब्राह्मणांस आज्ञा झाली कीं, तुम्हीं पुण्यास या." असें ऐकून ब्राह्मण म्हणतो, "माझा वाड्यांत प्रवेश होऊन माझी व सरकारची गांठ कशी पडेल?" हें ऐकून सरकारची आज्ञा हुजरे व खिजमतदार यांस झाली कीं, "ब्राह्मण वाड्यांत आला म्हणजे त्याजला घेऊन मजकडे आणावें." अशी आज्ञा समक्ष होतांच ब्राह्मण पुण्यास आला. स्वारी गणपतीस जाऊन, देवदर्शन घेऊन, सायंकाळीं माघारी वाड्यांत येऊन दाखल झाली. दुसरे दिवशीं ब्राह्मण वाड्यांत आला, तेव्हां खिजमतदार यांणीं नेऊन सरकारची गांठ घातली. त्यावेळेस ब्राह्मणास पहातांच लागलेच नबाब्राकडील वकील धोंडोपंत यांस बोलावून आणून समक्ष आज्ञा झाली कीं, ह्या ब्राह्मणाची जागा तुमचे दिवाण जबरदस्तीनें घेतात, ह्याविषयीं तुम्हीं नबाबांस पत्रें लिहून भटजींची जागा भटजींस देववावी, हें चांगलें." हा मजकूर ऐकून वकिलानें विनंति केली कीं, "पत्र लिहून जाब आणवितों." त्यावेळेस श्रीमंतांनीं विचारलें कीं, "किती दिवसांत जाब येईल?" तेव्हां वकील ह्यांनीं कबूल केलें कीं, "आठ दिवसांत जाब येईल." असें

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

६६ग/६(ख। २०२९०
Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

ऐकून श्रीमंतांनीं भटजींस सांगितलें कीं, "आठ दहा दिवस तुम्हीं स्वस्थ असावें." ह्याप्रमाणें झाल्यानंतर, दहा दिवस भरतांच ब्राह्मण फिरून वाड्यांत येऊन उभा राहिला. त्या ब्राह्मणास पाहून धोंडोरामपंत ह्यांस बोलावून आणून विचारलें, "त्या ब्राह्मणाचा जाबसाल काय आला?" त्या समयीं वकील बोलले कीं, "अजून जाब आला नाहीं." तेव्हां श्रीमंत म्हणतात, "ह्याचा जाबसाल कवीं येणार?" फिरून करार त्यांनीं आठ दहा दिवसांचा केला. तेव्हां भटजींस, "स्वस्थ असा" अशी आज्ञा झाली. असे दोनतीन करार ठरले. दुसरी चतुर्थी आली, त्यासमयीं श्रीमंतांची स्वारी थेउरास निघाली तेव्हां तो ब्राह्मण मौजे कवडी येथें जाऊन उभा राहिला. तों स्वारी त्या ठिकाणीं येतांच ब्राह्मण "फिर्याद!" म्हणून ओरडला. तेव्हां सरकारची स्वारी उभी राहून ब्राह्मणास जवळ बोलावून मजकूर विचारिला. तेव्हां ब्राह्मण बोलला "आज महिना जाहला वाट पाहिली, आतां ब्राह्मण्य बुडालें म्हणून वाट फुटेल तिकडे जातों." हें श्रीमंतांनीं ऐकून ब्राह्मणास सांगितलें कीं, "तुम्ही येथेंच स्वस्थ बसा. मी देवदर्शन करून माघारा आल्यानंतर तुमचा बंदोबस्त होईल. कांहीं चिंता करूं नये." असें म्हणून स्वारी देवदर्शन घेऊन, माघारी येऊन तेथें उभे राहून निळकंठराव रामचंद्र पागे यांस आज्ञा झाली, "तुम्हीं येथून आतां मोंगलाई मुलखांत चलावें. जेथून मोंगलाई मुलूख लागेल तेथपासून पुनः दिवे लावण्याचा कौल देत असें करावें. आम्ही पुण्यास गेल्यानंतर तुम्हांकडे फौज सरंजाम पाठवून देतों." याप्रमाणें आज्ञा करून श्रीमंतांची स्वारी पुण्यास येऊन, लागलीच फौज निळकंठराव रामचंद्र यांजकडे १०।१५ हजार रवाना केली. डेरेदांडे, तोफखाना वगैरे झाडून सरंजाम पाठविला. खेरीज सरंजामी यांस पत्रें पाठविलीं कीं, "निळकंठराव रामचंद्र यांस मोंगलाई मुलखांत रवाना केले आहेत, त्यांसमागमें तुम्ही आपापली फौज

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar
LIBRARY GURUKULA KANGRI

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

घेऊन पंढरपुराचे मुक्कामीं त्यांस जाऊन मिळावें." अशीं ताकीदपत्रें सर्वांस सरकारचीं गेलीं. त्याप्रमाणें निळकंठराव पंढरपुरास दाखल होतात तों झाडून सरंजामी तेथें येऊन मिळाले. पन्नास हजार फौजेचा जमाव झाला. सोलापूर पार होतांच मोंगलाई मुलखामध्यें फौज गेली. तेथें मुलखांत फौजेचा उपद्रव झाला. लूट भारी होऊं लागली. असे लुटीत, मारीत बेदरचे आलीकडे चाळीस पन्नास कोस गेले. त्या समयीं हैदराबादेस नबाब निजामअल्लीखां यांस वर्तमान मुलखाचे बोभाट गेल्यामुळें समजलें. तेव्हां नबाब ह्यांनीं पुण्यांस पत्रें आपले वकिलाकडे पाठविलीं कीं, "राव पंत-प्रधान त्यांचा आमचा बिघाड नसतां आमचे मुलखांत त्यांची फौज येऊन उपद्रव दिला, ह्याचें कारण काय असेल तें तुम्हीं त्यांस विचारून लिहून पाठवावें." अशीं पत्रें येतांच वकिलांनीं सारा मजकूर पूर्वीपासून झाला होता तो लिहून पाठविला. त्यावेळेस नबाबांनीं तो मजकूर समजून, श्रीमंतां-कडील वकील होते त्यांस बोलावून आणून सांगितलें कीं, "ब्राह्मणाचे जाग्यासाठीं इतकी धूम केली ह्याचा विचार काय?" तेव्हां सरकारचे वकीलांनीं नबाबास अर्ज केला कीं, "त्याविषयीं दोन चार वेळां आपले वकीलांनीं मजकूर लिहून पाठविला, परंतु तीं पत्रें मध्येंच दाबिलीं; आपणांस मजकूर जाहिर केला नाहीं." रुखमतदौला दिवाण यांस नबाबानीं विचारतांच त्यांनीं मजकूर सारा सांगितला. तेव्हां नबाब यांची मर्जी दौला याजवर रोष झाली. मग श्रीमंतांकडील वकील यांस नबाब यांनीं सांगितलें कीं, "तुम्हीं आपले खावंदांस लिहा, त्या भटजीचा बंदोबस्त आम्ही करून देतों." याप्रमाणें नबाबांचें बोलणें ऐकून सरकारच्या वकीलांनीं पत्रें पुण्यांस लिहिलीं. तीं पत्रें सरकारांत पाहून त्यांचीं उत्तरें तत्क्षणींच डाकेंत रवाना केलीं. "ब्राह्मणाची जागा ब्राह्मणास द्यावी, फिरोन त्यांचे सरका-रांतून या ब्राह्मणाला कोणे एके गोष्टीचा उपसर्ग न लागे असें करून

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

द्यावें. आज आमचे हिमायतीनें जागा ब्राह्मणानें घेतली. येविशीं त्याचे मनांत कीं, 'मला कोणे गोष्टीचा उपसर्ग येऊं नये,' काळ आमचा कमजोर आला असतांहि ब्राह्मणास उपद्रव लागूं नये, असें नबाब यांजपासून कुराण उचलून घ्यावें; व फौज आमची गेली आहे त्याचा खर्च ते आपले संतोषानें काय देतील तो घ्यावा म्हणजे फौज माघारी बोलावून घेऊं." अशीं पत्रें. गोविंदराव काळे वकील यांनीं तो मजकूर नबाबांस समजाविला. त्यांनीं गोष्ट कबूल केली. आणि नबाब यांनीं त्याप्रमाणें कुराण उचलून दिलें. मग पांच लक्ष रुपये स्वारीखर्चाचे दिले ते घेऊन, फौज माघारी आली. ब्राह्मण यांस भागानगरास नबाब यांनीं नेऊन त्याची जागा त्याचे हवालीं केली.

कृष्णाजी विनायक सोहनी

अभ्यास

ही रावसाहेब माधवराव पेशवे यांच्याविषयींची गोष्ट **सोहनी**कृत पेशव्यांच्या बखरींतून घेतली आहे. ही भाषा थोडीबहुत जुनी वाटली तरी बरीचशी आपण बोलतों लिहितों तशी वाटते. फार्शी शब्दांचा भरणा बराच आहे, पण अठराव्या शतकाच्या पूर्वार्धांतील मराठी भाषेइतका नाहीं. रचनेंत जुनेपणा कोठें कोठें आहे तें पहा. सुरवात 'पेशवे यांचे वंशांत' अशी आहे. हल्लीं आपण 'पेशव्यांच्या वंशांत' असें लिहूं. व्याकरणदृष्ट्या हा फरक स्पष्ट करा.

१. 'आज्ञा झाली' असें 'आज्ञा केली'च्या ऐवजीं कां म्हटलें आहे ?

२. जाब = उत्तर. जाबसाल = खुलासा, निकाल. सरंजाम = लढाईची सामुग्री. सरंजामदार = जहागीर किंवा तैनात यांचा उपभोग घेऊन त्याबद्दल फौज ठेवून सरकार-चाकरी करणारे मराठेशाहींतील सरदार. दिवे लावण्याचे कौल = शत्रूचा मुलूख जाळून लुटून इतका फस्त करावयाचा कीं दिवा लावावयास कोणी शिल्लक–माणूस किंवा घर–राहूं नये. म्हणूनच मुलूख बेचिराक (चिराक = दिवा, बे = शिवाय, दिव्यांचा अभाव) करणें ही म्हण प्रचारांत आली. कौल देणें म्हणजे शरण आलेल्यास अभिवचन देऊन तह करणें. परत दिवे लावण्याचा कौल म्हणजे मोंगलाई मुलूख असा जाळून-

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

पोळून टाका कीं तिकडील रयतेला शरण येऊन मुलूख परत वसविण्याची परवानगी मागण्याचा प्रसंग यावा.

पुरवणीवाचन

पेशव्यांची बखर; चिटणीस व सभासदकृत शिवाजी महाराजांविषयींच्या बखरी.

६

जळजळ

[चाल—**पडला अभिमन्यू०**]

हिमालय अमुचा—अमुचा उंच जगीं
अधोगत आम्ही हतभागी !
समृद्धी गंगा—गंगा वाहतसे
आपदा आम्हां जाळितसे !
सुधारावृष्टी—वृष्टी भूपृष्ठीं
उपाशी नित्य सात कोटी !
सुपिक भूमाता—माता निज हातें
भरवूं न शके बाळांतें !
जगाची चैन—चैन सर्व पुरते
अन्नाला वस्त्र कमी पडतें !
जेथला तरुण—तरुण हीन दीन
तयाचा काय जगीं मान !
सुदुर्बल असुनी—असुनी तीस कोट
जसा तो छिन्न भिन्न कोट !

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

असावें जें जें—जें भूषण वहिलें
सकल तें दूषणमय झालें !
त्यामुळें जळतें—जळतें हृदयांत
अश्रु अनिवार लोचनांत !

ह. स. गोखले

परिचय

तुम्ही याच पुस्तकांत विठ्ठलराव घाटे यांची "नवलाख दिवे" ही कविता अगोदर वाचा. आतां ही वाचा. पहिल्या कवितेंत हिमालय, गंगा वगैरे वैभव पाहून कवीचें हृदय प्रसन्न होतें. या कवितेंत तींच वैभवें पाहून ह. स. गोखल्यांच्या हृदयांत जळतें. हीं सर्व वैभवें आमचीं आहेत, पण आम्ही कसे नालायक–दुर्बल–निःसत्व हा विरोध मनाला जाणवतो.

कवितेच्या चालींतच एक प्रकारचा कळवळा—आर्तता आहे. भाषा ओबड-धोबड पण सडेतोड आहे व प्रत्येक शब्दांत आवेग आणि तळमळ भरली आहे.

अभ्यास

१. पावसाची वृष्टि भूपृष्ठीं होते मग सात कोटी लोक उपाशी कां राहतात ? घीशक्कर कां खात नाहींत ?
२. जगाची चैन आमच्या कापसाच्या सुंदर वस्त्रानें भागते, पण आम्हांला धड वस्त्र ल्यायला मिळत नाहीं हें कां ?

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

७

लागली एकादाची तसबीर

[पांडूतात्यांच्या घरांतील एक खोली. तक्क्याला टेंकून तात्या आरामशीर बसले असून डाव्या हाताच्या तळव्यावर तंबाखू चुरीत तोंडानें एकोणीसाव्या शतकांत चोरून नाटकाला जाऊन ऐकिलेलें 'अजुनि खुळा हा नाद पुरेसा' ह्याच चरण घोळून घोळून म्हणत आहेत. अंगांत सदरा व जवळ उपरणें, पागोटें, बहुरंगी कळकट चंची, घागऱ्यांचा अडकित्ता, पिकल्या पानांची अर्धवट गुंडाळलेली मेणकापडाची सुरळी व तांबडा रंग आणलेली चिंधी–पानांकरितां लागणारी–चुनाळें व थोड्या अंतरावर पिकदाणी इ० मुखविलासाचीं उपकरणीं पसरलेलीं. वेळ सूर्यास्तापूर्वीची. डाव्या हाताकडील दाराआड सोवळ्यांत असलेल्या काकू.]

काकू : म्हटलं, बबीनं सजवून धाडलेली ती लक्ष्मीची तसबीर कुठं लावाऽची तेवढं सांगाऽचं होतं ! म्हंजे गंगाधर नीं नानू—

तात्या : हेः, गंग्या, नान्या लावणार ती ? टोपी अडकवायची अक्कल नाहीं एकाला ! द्या पाठवून ती हिकडे. आऽऽत्तां लावून देतों. आहे काय न् नाहीं काय ! एवढ्याशा कामाला दोघंजणं कशाला हवींत ?

(काकू जातात. तयार केलेली फक्की बोटानें ठोकीत गोळा करून तात्या बकन् तोंडांत भरतात व पूर्वोक्त पद घोळीत पानसुपारीचें सामान आवरूं लागतात. सदू, पांडूतात्यांच्या 'अपत्यं पुमान्' पैकीं नंबर तीन, जडशी लक्ष्मीची तसवीर–भडक कपड्यांनीं कशीतरी सजविलेली–घेऊन येतो).

तात्या : आणलीस ? ठेव हितें उभी करून. (सदू ठेवतो) आऽ-ऽश्शी. जा हत्याराचें खोकं घऊन ये.

सदू : मला मंडईत जायचंय तात्या. बंड्याला सांगूं ?

तात्या : चाकराला पडचाकर करतोऽय लेकाचा. हं, जा, लवकर लावून दे त्याला. (सदू जातो. तात्या पिकदाणीचा उपयोग करून ती बाजूला

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

सारतात. चंची बांधून उपरण्याबरोबर एकीकडे करितात. दोन्ही हातांत खोकें घेऊन बंड्या, अपत्य नंबर ४, प्रवेश करितो.) खिळे काढ पाहूं दोन चार मोठेसे. ही तचबीर टांगाऽची आहे.

बंडू : यांत तर एकहि खिळा दिसत नाहीं, तात्या.

तात्या : बेश झालं! आतां खिळ्यापासनं तयारी! तरी बरं, रस्त्यांत सांपडलेले खिळे मी खोक्यांत आणून टाकीत असतों. जा समोर मिस्तरी काम करताहेत तिथून आण पांचसहा. (तो दोन तीन पावलें जातो तोंच) बंड्या, अमळ मोठेच घऊन ये, हो. (पुन्हां पिकदाणी वापरून) गंग्या रे गंग्या, (गंग्या आंतून 'ओ' देतो.) बाहेर ये पाहूं.

गंग्या : काय तात्या!

तात्या : ती तचबीर टांगायची आहे ना! ये पाहूं जरा हतोडी काढ खोक्यांतून. पेणसल आण एक.

गंग्या : (खोक्यांत खडबड करीत) दिसत नाहीं याच्यांत हतोडी. हां! आठवलं. रामरावाच्या घरीं असेल. परवां गंप्यानं दिली होती त्यांना तबला ठोकायला. घेऊन येतों. (जातो)

तात्या : काय शिंची कटकट आहे! एवढ्याशा भिकारड्या कामाला इतका वेळ. एवढीं पोरं आहेत, पण कांहीं नीट ठेवतील, जपतील तर शपथ! नान्या, अरे नॉन्याऽअ?

बाबू : (प्रवेशून) नानू पाठशाळेंत गेलाहे! तात्या काय पाहिजे?

तात्या : क्याय पायजे टाळ्या. कान फुटले काय साऱ्यांचे तुमचे? केव्हांचा हाक मारतोय् मी. एकालाहि लवकर ऐकूं येईना, कुठं गेला होतास रे?

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

बाबू : मोरूला बोरू तासून देत होतों मी.

तात्या : बराय ! जा एक पेणसल घेऊन ये नी किशीला म्हणावें माडीवरली घडवंची लावून दे विठाईबरोबर. तूं नी मोरू हितें या मदतीला. (खिळे घेऊन बंडू व हतोडीसह गंग्या येतात. ते त्या त्या वस्तू ठेवून जावयाच्या बेतांत असतात तों) चाललांत कुठें ? हलूं नका. जरा यांचा पाय टिकायचा नाहीं घरांत. अंमळ थोडकी मदत कराल तर काय झिजाल ? (बाबू पेन्सिल घेऊन येतो.)

बाबू : ही आणली पेणसल. (त्यांच्या समोर टाकतो.)

तात्या : अरे हो, पण आदळून जायचंय कुठें धाड मारायला. अस्सा हितें उभा राहा नी मागेन तेव्हां हातांत दे. समजलास ! मोऱ्या, सुत्तळ घऊन ये थोडी.

मोरू : पण तात्या तसबिरीला बांधलेली आहे कीं !

तात्या : लहान मुलांनीं पंचैती करूं नव्हेऽऽऽ ! सागितलंऽऽ, केलंऽऽ ! मोजमाप घ्यायला हवं ना ? खिळे वाकडे का मारायचे ?

मोरू : दादाचा फूट आणूं का ?

तात्या : नको तो पूट. सुत्तळ आण. माडीवरच्या दारामागल्या कोनाड्यांत शोध जा. (मोरू जातो. उंचसें स्टूल घेऊन विठाई मोलकरीण व बरोबर किशी येते.) हें कशाला आणलंऽऽ ?

किशी : घडवंचीचा पाय मोडलाय् म्हणून आई म्हणाली ' जा टूल घेऊन !'

मोरू : (धांवत येत.) सुत्तळ नाहीं सांपडली म्हणून माझ्या दप्तराचा तुटलेला बंदच आणला, तात्या !

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

तात्या : हात् लेका ! किती चावलाहेस ! (इकडे तिकडे चांचपीत) माझी आरशी दिसते कां रे पोरों ?

(मुलें इतस्ततः शोधीत असतां किशी आंत जाऊन घेऊन येते.)

किशी : ही पहा सांपडली. पोथीवर होती.

तात्या : (उठून आळस टाकतात, जांभई देतांना तोंडापुढें चुटक्या वाजवितात. नंतर आरशी–एक काडी तुटल्यामुळें–दोऱ्यानें कानावर बांधतात) बंडो, तें टूल घे पाहूं, छताखालीं (त्यानें ठेवलेलें न पढून) अरे हितें नव्हे, हें अस्सें ठेवाऽऽचें ! (स्टुलावर चढून) बाब्या, दे पेणसल नी दोरी. (बाब्या देतो. ती घेतांना वांकल्यामुळें स्टूल हालतें. खेंकसून) टूल डकमकताय तें दिसत नाहीं का लेकों. धरून ठेवा पाहूं दोन्ही बाजूंनीं. (बंडू व बाबू स्टूल धरून उभे राहातात. तात्या वेड्यावांकड्या माना करीत डावे बाजूस एक खूण करितात. तिच्याकडे निरखून पहात) ऊं फार वर झाली. (दुसरी करितात.) ठीक. आतां दुसऱ्या बाजूची ! पाहूं रे तचबीर ! (गंग्या तसबीर जवळ आणतो. ती उलटी करून माप घेतल्यावर दांतांनीं बाकीचा बंद कापून टाकितात.) इतकें अंतर सोऽऽडणें ! (उजवे बाजूस खूण करितात.) छेः खालींच दिसत्येय. (दुसरी करितात.) ही उंच झाली जरा. (तिसरी करितात.) अंतर जास्त झालं (चौथी करून दोरीनें मापून) छान ! बराब्बर ! आण रे खिळा (गंप्या उंच उडी मारून खिळा देतो, तो खालीं पडतो.) काय रे, हात मोडले वाटतं. खिळासुद्धां नीट देतां येईना ! (पडलेला खिळा गंप्या शोधतो) का ? हरवला ! आतां काय दिवसभर उभा राहूं अस्सा, खिळा सांपडस्तंवर ? चल, दे दुसरा. (गंपू दुसरा खिळा देतो तो घेऊन) अरेच्या ! डाव्या बाजूची पहिली फुलीची खूण कुठाय ? दिसेना ! बाब्या, गंग्या बघा रे कोणी दिसताहेशी ?

गंग्या : ही पाहा तात्या, हिकडे.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

येशा : ही एक खालीं दिसते आहे.

तात्या : (खेंकसून) दहाजण दहा खुणा दाखवाल. अरे, ढेंकणांच्या खुणा त्या! मीच सोधून काढतों. (खिळा तोंडांत धरून गळ्याभोंवतालच्या मापाच्या दोरीनें खुणा मापीत) छेः, नाहीं जमत. (कानावरील पेन्सिलीनें पुन्हां खुणा व मोजणी) हां, आण रे हतोडी. (मुलें हतोडी शोधतात) आं! नाहीं सांपडत? करा गोंधळ लेकों! कुचकामी पोरें! एवढंसं काम! आतां काय हातानं ठोकूं खिळे? (हातोडी सांपडलेली एकजण हातीं देतो. तिनें खिळा ठोकतात तों घाव बोटावर बसतो व हातोडी दांड्यांतून सुटून खालीं एका मुलाच्या पायाजवळ पडते. तो घाबरून किंचळतो) कार्ट्यां, झालंय काय एवढं केंकटायला? माझीं बोटं चेंचलीं तीं! (बोटें दावीत) ओय्! ओय्! बघतां काय वेंधळ्यासारखे! आणा, द्या ती हतोडी. (कसे बसे घाव घालीत कुठल्या तरी दोन खुणांवर खिळे मारून) हं, कर वर ती तसबीर. ही आत्तां लावून टाकलीच! आहे काय न् नाहीं काय! (दोन मुलें तसबीर वर करितात. ती घेतांना निसटून एका बाजूनें चवकटींतून कांच निखळते. तात्यांच्या हाताला कांच किंचित् लागून बोट कापतें. बोट धरून खालीं उतरून बैठकीवर–चंची उपरण्यावर–जाऊन बसतात.) बोहऱ्यानें बेट्यानं कशी बसवलीन् आहेन् चौकट! पैसेखाऊ! नसती पीडा उपटली! आतां बोट बांधावयास हवं चिंधीनं! (१–२ मुलें घरांत चिंधीसाठीं जाणार तोंच) अरे असं धंद्रटासारखें काय करतां तें! माझ्या चंचींतून काढा. का? चंची गावेना एवढी तुम्हांला? (धोतरानें बोट दाबीत) आतां एथंच होती ना! आळशी लेकाचे. नीट पाहायाला नको डोळे उघडून. आतां मलाच उठलें पाहिजे. हरे रामा! (उठून बघतात तो चंची अंगाखालीं) अरे! हें कसं झालं? अरे, ही पाहा गावली मला! उपरण्याखालीं होती. (चंचींतून चिंधी काढून फाडून बोटास गुंडाळतांना) बाच्या, तसबिरीच्या चौकटीवरची चूक ठोकून टाक

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

पाहूं नीट. (बाब्या तसें करतो. तात्या 'हरे राम' करीत पुन्हां स्टुलावर चढतात. तसबीर देतांना बाब्या लांबलचक श्वास टाकतो.) शिणलास एवढ्यांत ? झालय् काय दमायला ! एवढंसं काम !

काकू : (दाराआडून) सैंपाक निवून चाललाय्. मुलांना भुका दिखील लागल्या असतील. उद्यां तसबीर ला—

तात्या : (उसळून) आतां 'उद्यां' कशाला हवाय् ! हत्ती गेला न् शेंपूट राह्यलंय. झालंच आतां ! काय पोरांना उपास पडलेत पण. हं ! हं ! ! जाऊं नका. ही लागलीच तचबीर. बघून जा. (पूर्वोक्त पद गुणगुणत तसबीर लावतात.)

काकू : (बाहेरून येऊन) मघापासनं ऐकत्येंय् कसं कावणं चाललंय तें लेंकरांवर, मदत करायला लागलीं बापडीं तर.

तात्या : चांऽऽगली मदत केली बरं ! खिळा आहे तर हतोडी नाहीं. हतोडी दिली तर खिळा मिळेना वेळेवर. धनूद्रट पोरें एकजात !

काकू : आतां पुन्हां इकडे असं कांहीं काम कराऽऽचं असेल तेव्हां पोरांना घेऊन दोन दिवस माहेरींच जावं झालं !

तात्या : उठल्यासुटल्या ठेवलाय् काय माहेरीं ! तुम्ही बायका म्हणजे राईचा पर्वत करणाऱ्या. असलीं कामं तर आवडतात आम्हांला. पण संन्याशाच्या लग्नासारखी तर सारी अवस्था घरांत ! हं पहा आतां कशी झक्कास लागलीय् ती. (खालीं उतरून पडल्या आवाजांत) अं ? अंमळ वांकडी दिसत्येय् कां काय ?

काकू : जरा कां ? चांऽगली कललीय उजवीकडे.

(बाहेरून हांका–तात्या, अहो तात्या अऽऽ)

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

तात्या : आलों हो आलों, धोंडोपंत. काय म्हणतां, कललीय, उजवे बाजूस ? ऊं: फाऽऽर नाहीं कांहीं. आतां करूं उद्यां नीट. नाहींतर गंग्याला सांगा. धोंडोपंत बाहेर आलेत. उशीर झाला मला. गेलं पाहिजे. (चंची, उपरणें बगलेंत मारून पागोटें चढवीत दरवाजापर्यंत जातात.)

काकू : गंगाधर, लाव ती तसबीर खालच्या खुंटीला. भिंतीचे पापुद्रे देखील सुटलेले दिसताहेत. सारा पसारा आवरून लवकर चला बाबांनो जेवाऽला. विठाईला पाठवतें केर काढून साफ कराऽला.

(पांडुतात्या मागें नजर टाकून बाहेर जाऊन दार धाडकन् आपटतात. गंगाधर खुंटीला तसबीर लावतो. इतर मुलें पसारा आवरतात.)

सौ. शालिनीबाई रानडे

परिचय

जेरोम के. जेरोम या प्रसिद्ध विनोदी लेखकाच्या 'Uncle Podger hangs a picture' या मूळ विनोदी गोष्टीवरून हा एक गमतीदार संवाद तयार केला आहे. इंग्रजी गोष्ट जरी तुम्ही वाचलेली नसली तरी आपल्या इकडील परिस्थितीला योग्य असे किती फेरफार तिचें नाट्यीकरण करितांना करावे लागले असतील ते तुम्हांला कळण्यासारखे आहेत. या संवादांतील भाषा देशावर जाऊन राहिलेल्या कोकणस्थ कुटुंबाची आहे. उदाहरणार्थ, लावाऽची, सांगाऽची, हितें, गावणें, घऊन इ०

या संवादांत भाषणाइतकेंच पात्राकडून होणाऱ्या कृतीचेंहि महत्त्व आहे.

अभ्यास

१. पांडुतात्यांच्या स्वभावाचें वर्णन कसें कराल? या लेखांतील म्हणी व वाक्प्रचार निवडून त्यांचे अर्थ द्या.
२. यांतील कोणते प्रसंग वाचून तुम्हांला जास्त हंसू येतें ?
३. घडवंची = अंथरुणें वगैरे ठेवावयाचें लांब स्टूल.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

८

उषा

सकाळीं १० ची वेळ होती. त्या दिवशीं शनिवार असावा. शाळेंतून सुटलेलीं बालकें खेळत खिदळत घराकडे चाललीं होतीं. माझे सन्मान्य स्नेही मोटारींतून बसून कचेरीला जाण्याच्या गडबडींत होते. त्यांच्या बंगल्याचे दारांत मी त्यांच्याशीं बोलत राहिलों होतों. इतक्यांत घोळक्यांतून एक लहानगी रम्य बालिका धावत धावत माझ्या स्नेह्याकडे येऊं लागली. पळण्याच्या गतीमुळें तिचा पांढरा शुभ्र झगा फुगीर होऊन हवेंत फडफडूं लागला. तिचे रेशमासारखे केस भुरभुर उडूं लागले. फेसाळलेल्या लाटांवर आरूढ होऊन एखादी सुंदर जलकन्यकाच (mermaid) आपणाकडे येत आहे असा मला भास झाला. ती क्षणार्धांत जवळ आली आणि माझ्या स्नेह्यांचा हात धरून मोठ्या मोहकपणानें त्यांच्याकडे पाहात "दादा" एवढेच शब्द तिनें मंजुळ स्वरांत उच्चारले. अगोदरच रमणीय असलेले तिचे डोळे अधिक सुरेख दिसूं लागले. पित्याला पाहून झालेला आनंद तिला शब्दांत व्यक्त करतां येणें शक्य नव्हतें. मोहकपणा, आनंद, उल्हास इ० भावनांनीं तिच्या चेहऱ्यावर सौंदर्याची आकर्षक प्रभा पसरली होती. वडिलांनीं तिला कौतुकानें थोडें जवळ घेतलें. आणि लागलीच ते मोटारींत चढले. मोटार दृष्टिआड होतांच ही जलकन्यका बंगल्यांत निघून गेली.

या उषेसारख्या अप्रतिम बालिकेचें नांव 'उषा'च आहे. वरील प्रसंगांत वर्णन केलेली उषेची मोहकता व भावनाशीलता ही दुर्मिळ नाहीं, तर तें तिच्या व्यक्तित्वाचा ठळक विशेषच आहे हें पुढें मला दिसून आलें. ती हसूं लागली म्हणजे तिच्या लहानशा जिवणींतून कुंदकळ्यांसारखे दांत

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

आणि तांबड्या गुलाबासारख्या हिरड्या अत्यंत मोहक दिसतात. तिचा चेहरा भावनापूर्ण परंतु शांत आहे. आपल्या सौंदर्याचा योग्य तो अभिमान तिला असावा असें दिसतें. कारण वेषभूषेची आवड तिच्यांत विशेष दिसून येते. दररोज नवा झगा पाहिजे. बाहेर कुठेंहि ती गेली तरी तऱ्हेदार कापडावर तिची सूक्ष्म नजर असते आणि एखादें अगदीं वेगळ्या धर्तीचें कापड दिसलें कीं तशा कापडाचा झगा आपणाला हवा असा तिचा आग्रह असतो.

सौंदर्याबरोबर आपल्या इतरहि गुणांची जाणीव उषेला आहे. त्यांचें प्रदर्शन अतिशय खुबीदारपणानें करावयाची तिची हातोटी फारच थोड्या मुलांत आढळते. एखादा पाहुणा आला, कीं साधारणपणें त्याच्या मनाचा ठाव घेण्याचा प्रयत्न करावयाचा यांत उषेचा हातखंडा आहे. आपणाला येत असलेलीं इंग्रजी मराठी गाणीं ती गुणगुणेल, एखादें पुस्तक आणून आपल्याशींच वाचूं लागेल. मात्र असें करतांना आपल्या वेधक हालचालींचा पाहुण्यावर किती परिणाम होत आहे हें मधून मधून पाहण्यास ती चुकणार नाहीं. आपल्या कलात्मतेविषयींची पाहुण्याची उत्कंठा तीव्र करावयाची हें तिचें मोठें कौशल्य आहे आणि तिच्या या कलेवर न भुलणारा पाहुणा विरळाच. एकदां पाहुण्याची ओळख झाली म्हणजे मग आमच्या उषाताई आपली सारी दौलत (बाहुल्या, खेळणीं, बाहुल्यांच्या साड्या व झगे, पुस्तकें) त्याला दाखवितील, आपल्या मैत्रीणींचीं नांवें सांगतील, आणि आपल्या मास्तरीणबाईची माहितीहि देतील !

उषेला वाचण्याचा नाद विशेष. एखादें मनोरंजक पुस्तक वाचायला मिळालें म्हणजे तर काय तिची समाधीच लागते. मग भोंवतालीं गडबड असली तरी उषेचें लक्ष ढळणार नाहीं. चादर अंगावर घेऊन व पलंगावर आडवें होऊन वाचनांत तल्लीन होणें यासारखा आनंद तिला कशांत वाटत

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

नाहीं. एकदां ती दिवाणखान्यांत श्रीकृष्णकथेचें पुस्तक वाचत बसली असतां एक बाई बसायला म्हणून आली. बाई भली गडबड करणारी होती. उषेच्या आईशीं ती बोलत बसली. उषेच्या कपाळाला आंठ्या पडल्या. परंतु तिचें लक्ष पुस्तकावरून यत्किंचितहि निघालें नाहीं. पुढें चहा आला. आईनें विचारलें, "उषा, केक पाहिजे?" उषेनें मानेनें होकार दिला. तिच्या हातांत केक देण्यांत आली. उषेनें ती खाण्यास सुरवात केली. वाचनांत मात्र खंड नव्हता. एक संपून दुसरीहि केक संपली, पण उषेची वाचनसमाधि भंग पावली नाहीं. आलेली पाहुणी हें कौतुकानें पाहात होती. अखेर पुस्तक संपलें तेव्हां उषेनें हास्यमुद्रेनें आईकडे व त्या पाहुणीकडे पाहिलें.

वाचन आणि खेळ यांखेरीज उषेचा तिसरा प्रिय विषय म्हणजे बाहुलीचा संसार. आईनें दिलेल्या फडताळांत उषेनें हा संसार मांडला आहे. फडताळाला तीन कप्पे आहेत ते बाहुलीच्या बंगल्याचे तीन मजले. तळमजल्यावर चिमुकलीं स्वयंपाकाचीं भांडीं, बंब, गंगाळ, चूल, विळी इ. सामान नीटनीटकें मांडून ठेवलेलें. पहिल्या मजल्यावर एका बाजूस बाहुलीचें देवघर आणि दुसऱ्या बाजूस चहा पिण्याची खोली. या खोलींत टेबल, खुर्च्या, कपबशा मांडलेल्या असतात. दुसऱ्या मजल्यावर बाहुलीचें व तिच्या बाळाचें शयनगृह. रिकामा वेळ सांपडला कीं उषा या संसाराची साफसफाई करून व्यवस्था लावण्यांत दंग असते.

सुंदर आणि हुशार, संसाराची चाहती आणि शिक्षणाची शोकीन, मानी आणि खेळकर अशी ही उषा आहे. उषेच्या मातापितरांचा प्रेमळपणा व आतिथ्यशीलता यामुळें त्यांच्या घराकडे सदैव पाउलें वळावयाचींच. परंतु तिकडे जातांना प्रथम मनांत जो गोड विचार येतो तो उषेसंबंधींचा. घंटा ऐकतांच आंतून पावलांचा आवाज आला कीं असें वाटतें कीं दार

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

उघडतांच उषेची सुंदर मूर्ति आतां दिसेल. रे० टिळकांनीं उगीच का म्हटलें आहे—

‘ छायेखालीं तुझ्या विसावा जरी पावलों वृक्षवरा
तरी फुलांचा लोभ खरा.’

गोपीनाथ तळवलकर

अभ्यास

‘आनंदाचे’ संपादक श्री. गोपीनाथ तळवलकर यांनीं स्वतःच्या पाहाण्यांत आलेल्या व विशेष गुण असलेल्या कांहीं मुलांचीं स्वभावचित्रें काढलीं आहेत. त्यांतील हा एक मासला आहे.

१. ‘उषे’चे कोणते विशेष स्वभावधर्म लेखकानें निवडले आहेत ते सांगा बरें !

२. या स्वभावचित्राची भाषा किती सुंदर व मोहक आहे. उपमा व उत्प्रेक्षा किती गोड आहेत. उषेला ‘जलकन्यके’ची किती सूचक उपमा दिली आहे ? कां बरें ? कारण सांगा.

३. खुणा केलेल्या वाक्यांचा अर्थ सांगा.

४. व्यक्तित्व (individuality), भावनाशीलता, वेषभूषा, कलात्मता, आतिथ्यशीलता या शब्दांचा शिक्षकाच्या मदतीनें खुलासा करा.



CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

शांति

(फोटो)

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

९

शांति

या फोटोकडे पाहातांच मन प्रसन्न होतें. रात्रीच्या मंद, अंधुक प्रकाशांत फोटो काढणें कठीण तर खरेंच, पण वेळ व स्थळ निवडण्यांत फोटोग्राफरनें आपलें सारें कौशल्य दाखविलें आहे. देखाव्यांतील जमीन, पाणी व आकाश यांचें प्रमाण पाहा. जवळचा जमिनीचा पट्टा, मंदमंद लाटांनीं हळू हळू भरून जात असलेला वाळूचा किनारा, पलीकडील खडक व त्यांतच उजव्या बाजूनें शिरत असलेलें पाणी, दूरवर समुद्र व आकाश जोडणारें क्षितिज, ढगाळलेलें आकाश आणि त्यांत सफेत ढगाचें विरळ वस्त्र पांघरलेला चंद्र; सारेंच प्रमाणशीर आहे. या दृश्यांत समुद्राचें रौद्र-स्वरूप किंवा वैभव यांवर भर नाहीं, भूमीच्या विस्तारास महत्त्व नाहीं, आकाशाचें अनंतत्त्व ठसावयाचें नाहीं. तिन्ही मूळतत्त्वांना सारखेंच महत्त्व आहे. बालकवीनें वर्णन केलेलें 'स्वर्भूमीलन' येथें दिसून येतें. ढगामुळें किंचित् मळूल झालेली गगनश्री, धरणीवरील शांतिप्रधान वातावरण व आपली आर्तता यांच्या मधुर मीलनानें आपणांस प्रसन्नता वाटते. असें नेहमीं असावें व दिसावें ही असंभवनीय अपुरी राहाणारी इच्छा, आपण फोटोकडे सारखे पाहात बसून पुरी करतों.

चित्रांतील जमिनीचे पट्टे समांतर तर पाण्याचे समूह दोन कोपऱ्यांत. या सर्वांना तोलून धरणारें आभाळ व आपलें चित्त आकर्षण करणारा चंद्र. प्रथम पांढऱ्या ढगाच्या पट्ट्यानें आपलें लक्ष चंद्राकडे जातें. तेथून त्याच्या मागोमाग पाण्यांतील प्रतिबिंबांत शिरतें आणि मंद लाटांबरोबर हेला-वून शांत होतें. जमिनीवरील अंधुक झुडुपें व स्वप्नांत गुंगलेल्या निश्चल नौका यांमुळें मनुष्याला फोटोबद्दल जास्त आपलेपणा वाटतो. लाटांचें

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

स्वरूप व चंद्राची जागा यावरून भरती येऊं लागली आहे हें तुम्हांला समजलेंच असेल.

सामान्य लोकांना वाटतें कीं, ज्या चित्रांत माणसें, जनावरें, किंवा घरें आहेत तेंच चांगलें. पण सृष्टींतील भिन्न ऋतूंतील, दिवसाच्या भिन्न प्रहरांतील, व भिन्न स्थळांचीं मनोरम चित्रें किती सुंदर असतात पाहा. अशीं चित्रें किंवा फोटो पाहून त्यांतील मर्म ओळखून आनंद अनुभवण्यास शिका.

श्री. बा. रानडे

१०

आईची आठवण

(गज्जल)

प्रेमस्वरूप आई । वात्सल्यसिंधु आई !
बोलावुं तूज आतां मी कोणत्या उपायीं ?

तूं माय, लेंकरूं मी, तूं गाय, वासरूं मी
ताटातुटी जहाली आतां कसें करूं मी ?

गेली दुरी यशोदा टाकूनि येथ कान्हा,
अन् राहिला कधींचा तान्हा तिचा भुका ना ?

तान्ह्यास दूर ठेवी—पान्हा तरीहि वाहे—
जाया सती शिरे जी आगींत, शांत राहे;

नैष्ठुर्य त्या सतीचें तूं दाविलेंस मातें,
अक्षय्य हृत्प्रभूचें सामीप्य साधण्यातें.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

नाहीं जगांत झाली आबाळ या जिवाची,
तूझी उणीव चित्तीं आई, तरीहि जाची.

चित्तीं तुझी स्मरेना कांहींच रूपरेखा.
आई हवी म्हणूनी सोडी न जीव हेका.

विद्याधनप्रतिष्ठा लाभे अतां मला हीं,
आईविणें परी मी हा पोरकाच राहीं.

सारें मिळे परंतू आई पुन्हां न भेटे,
तेणें चिताच चित्तीं माझ्या अखंड पेटे.

आई, तुझ्या वियोगें ब्रह्मांड आठवे गे !
कैलास सोडुनी ये उल्केसमान वेगें.

किंवा विदेह आत्मा तूझा फिरे सभोंतीं,
अव्यक्त अश्रुधारा कीं तीर्थरूप ओती !

ही भूक पोरक्याची होई न शांत आई,
पाहूनियां दुज्यांचें वात्सल्य लोचनांहीं.

वाटे इथूनि जावें, तूझ्यापुढें निजावें,
नेत्रीं तुझ्या हंसावें, चित्तीं तुझ्या ठसावें !

वक्षीं तुझ्या परी हें केव्हां स्थिरेल डोकें,
देईल शांतवाया हृत्स्पंद मंद झोके ?

घे जन्म तूं फिरूनी, येईन मीहि पोटीं,
खोटी ठरो न देवा, ही एक आस मोठी !

माधव जूलियन्

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

अभ्यास

किती गोड कविता आहे पाहा! तिच्यांत वात्सल्य व करुण हे दोन रस ओतप्रोत भरले आहेत. शिवाय ही कविता आम्हांला आवडण्याचें कारण म्हणजे तिच्यांतील आई व तिचा मुलगा हे विवक्षित आहेत. मातृवियोगावर, पुत्रवियोगावर किंवा मातृप्रेम, अपत्यप्रेम इत्यादि विषयांवर अनेक कविता असतात व त्यांतील कांहीं सुंदरहि असतात; परंतु त्यांपैकीं बऱ्याच कविता हवेंत तरंगत असतात. म्हणजे कोणतीहि आई, किंवा कोणतेंहि मूल यांना त्या लागू पडण्यासारख्या असतात. विशिष्ट व्यक्तीचें विशिष्ट परिस्थितींतील चित्र त्या आपल्या डोळ्यांसमोर उभें करीत नाहींत. त्या दृष्टीनें ही कविता वाचा व खालील प्रश्नांचीं उत्तरें द्या.

१. कविता म्हणणारा मुलगा साधारण किती वयाचा आहे?
२. त्याची सध्यांची परिस्थिति कशी आहे?
३. आई वारल्यावर फार दिवस झाले का थोडे? आई वारली तेव्हां तो काय वयाचा असेल?
४. आईची आठवण मुलाला कां होते? तो दुःखकष्टांत आहे काय?
५. या कवितेंतील कोणत्या सुंदर कल्पना तुम्हांला आवडतात? कोणकोणत्या ओळींत वात्सल्य व करुण रस व्यक्त झाले आहेत?

'आई' या विषयावरील दुसऱ्या कवींच्या कविता ताडून पाहा.

११

मुंबईतील तात्यापंतोजींची शाळा!

लहानपणीं शाळा आणि पंतोजी यांचें फार भय असतें, आणि हा शाळेंत जाण्याचा त्रास आणि पंतोजीचें भय पुष्कळ वर्षें मनांत असतें असें मला वाटतें. मला तर हें भय मी बारा वर्षांचा होई तेथपर्यंत सारखें होतें. त्यांत अत्यंत कोमल वयांत म्हणजे सुमारें पांचांपासून आठ वर्षांपर्यंत तर पंतोजी म्हटला म्हणजे मोठा भयंकर दिसे. त्याची ती मुद्रा, त्याच्या

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

हातांत छडी, आणि त्या छडीनें तो दुसऱ्या पोरांस मारतांना पाहिलें म्हणजे तो लहान मुलांस काळासारखा दिसे. लहान मुलांस तोंडानें एक दोन अंकांची बेरीज, वजाबाकी, आणि गुणाकार सांगणें फार कठीण पडतें. मी लहानपणीं ज्या शाळेंत होतों त्या शाळेच्या पंतोजींस अशी कधीं कधीं वरल्या मुलांकडून हिसाबाची झडती घेण्याची हुक्की येत असे. अथवा कोणी मंडळी शाळेंत बसावयास येई तेव्हांच अशी हुक्की पंतोजींस येत असे. तो एकाद्या मुलास मध्येंच बोलावून हातांत धरून इकडच्या तिकडे फिरवी आणि असा फिरवितांना त्या मुलास २ आणि ५ ? ५ आणि ९ ? ८ आणि १० ? पांच दाहीं ? सहा पंचें ? सातीं आठीं ? असें फटाफट विचारी. आणि तें पोर चुकलें म्हणजे त्याच्या पाठीवर छडी मारी. मग पोर रडून म्हणे, "नाहीं नाहीं पंतोजी. चुकलों, ही वेळ माफ करा." असें जेव्हां मी दुरून बसून पाहीं, आणि मला तर यामध्यें कांहींच समजत नसे, तेव्हां मला मोठें भय वाटे. मला वाटे कीं जर आतां मजवर पाळी आली, तर मी हिसाब कसा सांगावा, आणि मला त्या छडीचा मार खावा लागेल. म्हणोन पंतोजीनें लहान मुलांस भय वाटेल असें कांहीं करूं नये; कारण तितक्या लहान वयांत मुलांस पंतोजीचा हेतू तर कांहीं समजत नाहीं, परंतु उलटें त्या भयानें त्यांच्या कोमल मनास आणि शरीरास इजा मात्र होते. पंतोजीनें लहान मुलांशीं फार ममतेनें बोलावें, आणि खेळत खेळत त्यांस शिकवावें. म्हणजे त्यांस मोठा आनंद वाटतो, व त्यांस तो पंतोजी आवडतो.

लहानपणीं माझ्या तीन वर्षांच्या वयापासून तर सहा वर्षांच्या वयापर्यंत सुमारें दोन तीन वर्षांच्या आंत मला चार शाळा झाल्या. पहिल्यानें आम्ही **शेतवळींत** रहात होतों. तेथें त्याच आळींत बाळकृष्ण शेणव्याचें घर होतें. त्याच्या ओटीवर एक कोंकणांतून आलेला शेणवी पंतोजी होता. त्याच्या

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

शाळेंत मी गेलों. तेव्हां मी सुमारें तीन वर्षांचा असावा. त्या शाळेंत सुमारें दोन तीन महिने मी गेलों असेन, आणि तेथें काय शिकलों याची मला कांहींच आठवण नाहीं. मला वाटतें मी उगीच धूळपाटी घेऊन बसत होतों. पुढें तो पंतोजी कोणीकडे निघून गेला, आणि ती शाळा नाहींशी झाली; तेव्हां आसपास दुसरी जवळ शाळा नसल्यामुळें माझी आत रेणुकाबाई इनें मला आपल्या घरीं नेलें, तेथें मी तिच्याजवळ काळबादेवीच्या रस्त्यावर चोंहोघरच्या शेजारीं पहिल्या हणमंतगल्लींत दीना बापटाच्या मोठ्या घराच्या ओटीवर एक शाळा होती, त्या शाळेंत गेलों. तेथें लिंगु नांवाचा पंतोजी होता, असें मला आठवतें. त्यानें मला १० अंक आणि मुळाक्षरें व एक बाराखडी शिकविली. तो बाराखड्या शिकवितांना असें मोठ्यानें मुलांना रागावून सांगत असे :

क काना दिले का, -हस्व्यान कि, दीर्घ्यान की, -हस्व्यान कु, दीर्घ्यान कू, एकमात्रा के, दुमात्रा कै, काना मात्रा को, दुमात्रा काना कौ, माथा दिले कं, देवा दिले कः

हें मी तोंडपाठ म्हणे पण यांत मला कांहींच समजत नसे. या शाळेवर मी थोडेच महिने गेलों असेन. पुढें सन १८१९ सांत आमच्या आत्येचा नवरा बाळाजी माधव वारला. तेव्हां मी तिच्याच घरीं होतों. तो दोनप्रहरीं वारला. मला वाटतें तें पहिलेंच मरण माझ्या बाळपणीं मीं ऐकलें. माझी आत रडावयास लागली. त्यावेळीं मला कोणी सांगितलें कीं नाना देवाच्या घरीं गेला. लहानपणीं मी लहान मुलांच्या तोंडानें ऐकिलें होतें कीं यमदूत येतात आणि ते माणसास टोंचतात म्हणजे माणूस मरतें. तेंच माझ्या मनांत आलें कीं, यांस यमदूतांनीं टोंचिलें असेल म्हणून तो मेला. घरच्या मनुष्यांनीं मला आपल्या घरीं पाठविलें. तेव्हांपासून पुढें ती शाळा मी सोडली. मग मला गिरगावांत जगन्नाथ

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

टकल्या याच्या वाडींत ओटीवर दामोदर पंतोजींची शाळा होती, तेथें मला घातलें. मी त्या शाळेंत सकाळीं दोनप्रहरीं गड्याच्या खांद्यावर बसून जात असें. तेथें सुमारें दीड दोन वर्षें गेलों असेन. पुढें माझ्या पाठीवरचा धाकटा भाऊ भास्करहि मजबरोबर जाऊं लागला. आम्ही दोघेहि गड्याच्या खांद्यावर बसून जात असों. या शाळेंत मी सर्व धुळाक्षर व पाढे, सवायकी, दिडकी, निमकी, पाऊणकी शिकलों व खरड्यावर आलों; तेव्हां माझ्या बापानें शाळेवर येऊन पंतोजींस कांहीं बक्षिस दिलें; आणि शाळेवर येणाऱ्या मुलांस मिठाई वाटली. पूर्वीं या गांवठी शाळांवर अष्टमी, पौर्णिमा आणि अमावास्या मिळून महिन्यांत चार सुट्या असत. सुटीच्या आदल्या दिवशीं पंतोजीस टिपरीभर तांदूळ व एक पैसा दर मुलानें द्यावा अशी चाल असे. संध्याकाळीं खडूनें आपआपल्या पाट्या माजवाव्या म्हणजे लिपाव्या, मग त्या वाळल्यावर त्यांजवर कोणी धूळ घालून सरस्वती काढावी, आणि तिजवर गुलाब व फुलें घालून तिची पूजा करावी. मग परवाजा बोलून घरीं जावें. एक दिवसाचें मला स्मरण आहे कीं, अशी सरस्वती काढून पूजा करीत असतां आमच्या शाळेवर दोन इंग्रज आले होते. त्यांस पंतोजी पाद्रीसाहेब म्हणूं लागले. त्यांनीं मुलांस विचारलें कीं, हें तुम्ही काय करतां ? मुलांनीं सांगितलें कीं आम्ही सरस्वतीची पूजा करितों. मग ते साहेब दोघे एकमेकांशीं कांहीं बोलून हांसून निघोन गेले. पुढें ते साहेब केव्हां केव्हां आमच्या शाळेंत येत असत व केव्हां केव्हां आमची शाळा बंगल्याला बोलावीत असत.

दादोबा पांडुरंग

परिचय

दादोबा पांडुरंग तर्खडकर हे मराठी भाषेचे पहिले व्याकरणकार. त्यांचें 'लघुव्याकरण' ५०।७५ वर्षें आपल्या मराठी शाळांत चालू होतें. दादोबांनीं आत्मचरित्र लिहून ठेवलें आहे. त्यांचा जन्म मुंबईस 'शेतवळी' (हल्लींची

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

'खेतवाडी') इ. स. १८१४ त म्हणजे पेशवाई बुडाली त्याचे आधीं दोन वर्षें झाला. दादोबांनीं आत्मचरित्रांत आपण कसे शिकलों, आपले शिक्षक व शाळा कशा होत्या, प्रवास व नोकऱ्या कोठें कोठें केल्या त्यांचें फार सुंदर वर्णन दिलें आहे. त्यांतूनच वरील उतारा घेतला आहे. या आत्मचरित्रावरून मुंबईची शें-पाउणशें वर्षांपूर्वीं कशी सामाजिक परिस्थिति होती हें चांगलें समजतें.

अभ्यास

१. दादोबांची मराठी भाषा थोडीशी जुनी वाटते. उदा० 'हिसाबाची झडती' 'हिसाब सांगणें,' 'पंतोजी' 'दिना बापट,' 'चोहोंघराच्या शेजारीं;' 'मजबरोबर,' 'पाटी माजवणें' इ. हल्लीं तुम्ही या ऐवजीं काय लिहाल ?

२. धूळपाटी म्हणजे काय ? पाटी माजवणें म्हणजे ? आमच्या लहानपणीं पाटीवर दसऱ्या-पाडव्याला दादोबांप्रमाणें 'सरस्वती' काढावी लागायची.

३. दादोबांना लहानपणीं ज्याचा कांहीं अर्थ समजत नाहीं असें पुष्कळ पाठ करावें लागे. त्या मानानें तुमची स्थिति पुष्कळ बरी. तुमचा अनुभव सांगा.

४. लहानपणीं तुम्हांला शाळेंत घातलें तेव्हां तुम्हांला काय वाटलें, तुम्ही शाळेंत कसे गेलांत, शाळेची इमारत, शिक्षक, वर्ग, वर्गांतील मुलें, पहिल्या दिवशींचा पाठ, यांतील जें कांहीं तुम्हांला आठवत असेल तें लिहून काढा.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

१२

भीष्मप्रतिज्ञापूर्ति

श्लोक

श्रोत्रयुग्म परिपूत कराया ।
सावधान जनमेजय राया ॥
जो परेशरत धन्य अहो तो ।
गोष्पदोपम तया भव होतो ॥ १ ॥

" प्रतिज्ञा जे केली यदुकुळवरें ' युद्ध न करीं ।
धरीं ना शस्त्रातें कदनसमयीं मी निजकरीं ' ॥
घडेना हे मिथ्या जरि तरि न मी भागवत रे " ।
प्रतिज्ञेतें भीष्में मनिं अवधिलें या दृढतरें ॥ २ ॥

पिता शंतनू माय ज्याची नदी जे ।
स्वयें शुद्ध ऐशास सन्मान दीजे ॥
तसा गर्व तोही हरावा मनाचा ।
मनाचा असा भाव त्या वामनाचा ॥ ३ ॥

भीष्माकडे रव भयानक दुंदुभीचा ।
होतां वदे तनय आनकदुंदुभीचा ॥
' दुश्चिन्ह आजि गमतें मज सव्यसाची ।
जाती शिवा अशिव हे अपसव्य साची ' ॥ ४ ॥
गर्वोक्ति फाल्गुन वदे ' जगदेकराया ' ।
आहे असा कवण तो झगडा कराया ? ॥
ज्यां काळखंज वधिले अतुलप्रतापी ।
पौलोमही असुर गोसुरविप्रतापी' ॥ ५ ॥

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

पितामह वदे तया ' प्रबळ तूं पृथानंदना ! ।
रमेश रथिं सारथी चतुर वागवी स्यंदना ॥
स्वयें गतवयस्क मी, सरस वीर तूं रे नवा ।
भिडें रणधुरंधरा ! जय घडो सुखें वा न वा ' ॥ ६ ॥

पारीक्षिता ! मग शरासन पांडवानें ।
ओढूनियां हुतवहापित खांडवानें ॥
तो भीष्मदेह खचिला शरतांडवानें ।
ज्याच्या क्रिये सकळ पद्मभवांड वाने ॥ ७ ॥

गांगेय कोपा चढला कसा रे ? ।
ज्या मानिती हाचि कृतांत सारे ॥
गर्जोनिया सिंहरवें जयातें ।
पाहे जणों मारिल आज यातें ॥ ८ ॥

' त्वां काय कर्म करिजे लघुलेंकरानें ? ' ।
बोलोनिया मग धनू धरिलें करानें ॥
तें व्यापिलें सकळ सैन्य महाशरांनीं ।
भीष्में, जसा पतित होय हुताश रानीं ॥ ९ ॥

तो स्तोम येतां बहु सायकांचा ।
झालाचि पार्थ—व्यवसाय काचा ॥
काचावला वीर पुढें धसेना ।
झाली नृपा ! सर्व भयांध सेना ॥ १० ॥

पुष्पवर्ण नटला पळसाचा ।
पार्थ सावध नसे पळ साचा ॥

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

पाहिलें जंव निदान तयाचें।
तों दिसे वदन आनत याचें॥ ११॥

प्रतोद मग ठेविला उतरला रथाधःस्थळीं।
म्हणे, 'प्रबळ भीष्म हा जय घडे न या दुर्बळीं॥
करीं कमळनेत्र तो प्रथित चक्र तें स्वीकरी।
प्रमोद यमनंदना बहु तया यशस्वी करी॥ १२॥

असा येतां देखे रथनिकट तो श्यामल हरी।
नृपा! गांगेयाच्या हृदयिं भरल्या प्रेमलहरी॥
शरातें चापातें त्यजुनि वदला गद्गद रवें।
जगन्नाथें केलें मज सकळ लोकांत बरवें॥ १३॥

ये रथावरि झणीं यदुराया।
खड्ग देइन विकोश कराया॥
तोडिं मस्तक पडो चरणीं या।
धन्य होइन सदाचरणीं या॥ १४॥

मारावें मजला असेंच असलें चित्तीं तुझ्या केशवा।
तै मातें मग कोण रक्षिल पहा विश्वेश नाकेश वा!॥
हा मुख्यार्थ जनार्दना! मज गमे भक्तप्रतिज्ञा खरी।
कीजे, सर्व जनांत होईल मृषा हे आपुली वैखरी॥ १५॥

हें भीष्मवाक्य परिसोनि जगन्निवासें।
केलें विलोकन मृदुस्मित पीतवासें॥
वेगें फिरोनि चढला मग तो रथातें।
पार्थाचिया पुरविणार मनोरथातें॥ १६॥

वामनपंडित

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

परिचय

वामनपंडितांनीं काशीस संस्कृत भाषेचें अध्ययन करून, मराठी भाषेचा अभिमान धरून कवित्व मात्र मराठी भाषेंतून केलें. संस्कृत भाषेंतील उत्तमोत्तम धर्मग्रंथ व काव्यें यांचें मराठीकरण करण्याचा प्रयत्न करून, ज्ञानेश्वर, मुक्तेश्वर, एकनाथ, श्रीधर, महिपती, मोरोपंत यांनीं गीता, पुराणें यांचा मराठी भाषेंत अनुवाद केला, त्याचप्रमाणें वामनपंडितांनीं संस्कृत-काव्यांतील मौजा मराठी वाचकांना समजावून दिल्या. यांची भाषा संस्कृत-प्रचुर, प्रौढ व अलंकारिक आहे. या कवितेंत संधि, समास, उपमा, उत्प्रेक्षा, यमक, अनुप्रास यांची तुम्हांला मनमुराद मेजवानी मिळेल.

अनुप्रास=चरणांत त्याच त्याच अक्षरांची पुनरावृत्ति.

यमक=चरणाच्या शेवटचीं एक किंवा अनेक अक्षरें दुसऱ्या चरणाच्या शेवटीं, भिन्न अर्थानें योजणें.

युद्धांत शस्त्र धरणार नाहीं ही कृष्णाची प्रतिज्ञा; कृष्णाला हातीं शस्त्र धरण्यास लावीन ही भीष्माची प्रतिज्ञा; भीष्मानें आपली प्रतिज्ञा पूर्ण कशी केली हा कवितेचा विषय; तो विषय रंगवितांना व त्यास रसाळ करतांना पंडितांनीं अलंकाराची कशी मदत घेतली आहे तें पहा. ही कविता तुम्हांला इतकी आवडेल कीं ती आपोआपच तोंडपाठ होईल.

अभ्यास

१. कवितेंतील गोष्ट सोप्या भाषेंत लिहा.

२. अवथिलें, परेशरत, अपसव्य, धसेना, विक्रोश यांचे अर्थ सांगा.

३. या कवितेंतील कोणतीं यमकें तुम्हांला सहजसुंदर वाटतात ?

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

१३

गरिबाची अधेली

वऱ्हाडांतला मे महिना. दुपारची वेळ. रखरखीत ऊन्ह पडलेलें होतें. वाऱ्याची फुंकर सुद्धां नव्हती. कुठेंहि सावलीचें नांव नव्हतें.

कमरेला फाटक्या धोतराचा मळकट तुकडा. डोक्याला पागोट्याच्या चिंध्या, खांद्यावर एक जाडजूड लाठी, काळ्या तोंडावर घाम वाळून मीठ झालेलें, असा **अवचित्या** तहसील-कचेरीच्या देवडींत शिरला, हुश करून तिथल्या सावलींत क्षणभर उभा राहिला, आणि मग हळू हळू आंत गेला.



रा. भि. जोशी

समोर, व्हरांड्याला लागून असलेल्या दालनांतल्या चार टेबलांपैकीं डावीकडल्या टेबलाशीं अंबादासपंत बसले होते. त्यांच्या चष्म्याच्या एका मोडलेल्या काडीच्या जागीं ऑफिसफाइलचा तांबडा पिंवळा दोरा बांधलेला होता. भिंगाला एक आडवी चीर गेली होती. ती टाळण्यासाठीं डोळ्यांना बराच वेडावांकडा ताण देऊन ते उकंडखेडच्या अवचित्याचें " अतिक्रमणाचें प्रकरण " वाचीत होते. वाचतांना मधेंच दप्तरांच्या फळीवरून समोरच्या टेबलाकडे दृष्टि टाकून ते म्हणाले.

" मिस्टर जोगळेकर, इथं साहेब म्हणतो—Auchitya should be ordered to remove the encroachment beyond the line

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

AB ('अ ब' या सीमेवर झालेलें अतिक्रमण काढून टाकण्यास अवचित्यास हुकूम द्यावा) म्हणजे AB च्या अलीकडे का पलीकडे हो ! तुम्ही नुकतेच मॅट्रिक झालां आहां म्हणून विचारतों."

आपला कांसवकवची चौकटीचा चष्मा सांवरण्याच्या मिषानें हसूं लपवीत जोगळेकर म्हणाला,

"पलीकडे."

"अस्सं आतां ठीक जमतंय हें." असें म्हणून त्यांनीं टेबलावरच्या आपल्या बेलफळांतून तपकीरीची एक मोठी चिमूट नाकपुडींत कोंबली, डाव्या हाताच्या तळव्यानें नाक पुसलें, आणि चष्मा नीट करून ते पुन्हां कामांत गर्क झाले. पण इतक्यांत त्यांच्या टेबलावर सावली पडली. तिच्या कारणाकडे लक्ष जाऊन तें घाणेरडें आणि दरिद्री आहे असें दिसतांच त्यांच्या अरुंद कपाळावर आंठ्या चढल्या, आणि त्यांचें सुरकुतलेलें चिंचोळें नाक अगदीं आवळलें गेलें. खुर्चीच्या मोडक्या पाठीवर रेलून, चष्म्याच्या रुपेरी कडांवरून त्यांनीं त्याच्याकडे दृष्टि टाकली.

"राम राम भाऊसाब. मी अवचित्या म्हार. उकंडखेडचा."

"आँ ? मग ? जरा लांब उभा रहा कीं ! अगदीं टेबलाशीं कशाला खेटतोस ? काय पाहिजे ?"

"माहा हुकमाचा कागद आला असन् त द्या भाऊसाब, मल्ये अपील करावं लागत्ये."

समोर पडलेल्या त्याच्या 'प्रकरणा'कडे पाहून अंबादासपंत म्हणाले,

"कागद काय माझ्या टेबलावर काढून ठेवलाय तुझ्या काकानं !" अवचित्या तसाच उभा होता.

"अरे बाबा, जा यावेळीं त्रास देऊं नको. असेल तुझा कागद तर येईल तुझ्याकडे."

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

" त्यायले त लई रोज लागतीन्. आतां देसान् त उपकार होतीन. "

" तुझा काय कुणी इथं नोकर आहे ? जा पुन्हां ये उद्यां बियां. आम्ही अशीं कामं करीत बसलों—"

" महा गांव लइ दूर आय भाऊ, यवढं गरीबाचं काम करसान् त लेकरं बघा दुवा देतेल. पाटील जमिनीवर पायबी टाकूं देईना. एवढी दया करा—"

" गांव लांब आहे तर काय छकडा पाठवूं तुला आणायला ? काम तुझं आहे का माझं ? ताबडतोबीनें कामं उगीच फुकट होत नसतात. आतां हें सरकारी काम बाजूला ठेवून तुझ्यासाठीं सगळ्या मिसला काढायच्या फुकट मेहनत—?"

" मी गरीब आय् भाऊसाब. माह्यापाशीं काय बी नाय् "

' पाहा हो सिद्धोपंत, काय लोंचट माणूस आहे ! 'कागद' 'कागद' करतो आहे पण एक छदाम कांहीं काढायचा नाहीं—"

" ए, चल काढ कांहीं तरी, नाहीं तर हो चालता. इथं नको उभा राहूं टेबलापाशीं. बघ चपराशाला सांगून हांकून देईन. "

" नूरुल्ला, जरा इधर आव,—"

" हें पहा जोगळेकर, असं विचित्र तोंड करून पाहायला नको माझ्याकडे. मला ठाऊक आहे तुम्हीं फार सोंवळे आहांत ते. आतांच शाळेंतून बाहेर पडलां आहां म्हणून आहे हें सगळं. तीस रुपये पगारावर दोन मुलांच्या मुंजी आणि चार मुलींचीं लग्नें करावयाची वेळ आली म्हणजे पाहूं किती सोंवळे राहातां तें—"

" हं, कायरे बुवा ? चटकन् काढ काय तें. मला नाहीं वेळ हुज्जत घालायला. अरे, तुम्हांला काय कमी आहे ? आतां तर महारांचंच राज्य व्हायचंय आमच्यावर. "

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

अवचित्या क्षणभर स्तब्ध राहिला, नंतर थोडासा चळवळला; आणि मग पागोट्याच्या एका चिंधीच्या टोंकाला एकच अधेली बांधलेली होती, ती काढून त्यानें कष्टी अंतःकरणानें लांबूनच पंतांच्या टेबलावर टाकली. ती अधेली टाकतांना त्याला फार जड गेलें. पण एवढ्यानें तरी काम होईल या एका आशेवरच त्यानें तसें केलें, आणि त्या आशेमुळेंच त्याचा चेहरा थोडासा खुलला.

पण लहान नाणें पाहातांच पंतांनीं डोळे मोठे केले आणि ते ओरडले,

"का माझ्यावर उपकार करतोस काय? मी कांहीं भीक नव्हतों मागत तुझ्यापाशीं. अरे हरामखोरांनो, काम तुमचं करायचं आणि आत्र आमच्यावर उपकार केल्याचा! अन् तें काय आहे आणखी त्या चिंधींत बांधलेलं? चल काढ, एक रुपया तरी पाहिजे."

या अनपेक्षित कडकडाटानें अवचित्या बावरला. त्यानें चिंधी सोडून दाखवीत म्हटलें,

"ही बघा तमाकू, मापाशीं आतां येक बी पैसा नाय भाऊ. मीठ-मिरचीला अन् माही पोरगी लई बेमार हाय तिले दवा घेन्यासाठीं ह्ये आट आने आणले व्हते त्ये ठ्यवले तुमच्या पायापाशीं, आतां यवढी दया करा भाऊ. माह्या पोरीच्या दव्यासाठीं मले पैसे द्या अन् न्हायलेले तुमी ठ्यवा. पोरगी तडफडतीया बगा मायबाप."

"तर! केवढी दया करतो आहेस माझ्यावर! म्हणे 'पोरगी बेमार आहे.' बायको मेली नाहीं का? लबाड, पैसे नव्हते तर आलास कशाला इथें? चल हो चालता."

आणि एका टिचकीनें त्यांनीं अधेली टेबलावरून उडविली. ओट्यावर एक टप्पा घेऊन ती नेमकी अंगणांतल्या गटारांत पडली.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

अवचित्याच्या चेहऱ्यावर संताप आणि असहाय्यता हीं एकत्र झालीं होतीं. पंतांकडे एक उद्विग्न कटाक्ष टाकून तो अंगणांत आला. गटारांत हात घाळून त्यानें त्या राडांत पुष्कळ चांचपून पाहिलें. अधेली हातीं लागली नाहीं. त्यानें मातींत हात कोरडे करून धोतराला पुसून स्वच्छ केले. आणि पंतांच्या टेबलापाशीं येऊन कांपऱ्या स्वरांत तो म्हणाला,

"रामराम भाऊसाब. गरीबाची अधेली माही बी नाय् अन् तुमची बी नाय् अशी केली. आतां माह्या पोरीला........"

आणि जड पावलांनीं तो कचेरीच्या बाहेर पडला.

पंत तुच्छतेनें हंसले. इतर म्हाताऱ्या कारकुनांनीं त्यांना दुजोरा दिला. समोर बसलेल्या तरुण जोगळेकराला मात्र तें सहन झालें नाहीं. तो म्हणाला,

"पंत, बरं नाहीं झालं हें !"

"एवढा कळवळा आला होता तर दिले कां नाहींस खिशांतले आठ आणे काढून ?"

"असते तर दिल्याखेरीज राहिलों नसतों."

अवचित्या उकंडखेडला पोंचला तों दिवे लागून गेले होते. झोंपडी-पासून पांच सात पावलांवर त्याची आकृति दिसतांच **कवळीनें** त्याला पहिला प्रश्न विचारला,

"आनली काय **मिरी**ची दवा ? पोरी क्यद्रूळची तळमळतीय." अवचित्या कांहीं बोलला नाहीं.

तापानें फणफणलेल्या आणि अस्वस्थतेनें हायपाय झाडणाऱ्या आपल्या तीन वर्षांच्या चिमण्या मिरीवर दृष्टि जातांच अवचित्याच्या अंतःकरणाचे

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

बांध फुटले, आणि एक जोराचा हृदयद्रावक हुंदका देऊन त्यानें आपलें तोंड गुडघ्यांत खुपसलें.

कवळीनें पुन्हां पुन्हां विचारलें तेव्हां तो अत्यंत उदासवाण्या चेहऱ्यानें उद्गारला, "आतां मिरीचं आऊक्ष अंबाबाईच्या हातीं. दव्याचे पैसे बामनापुढं व्यवले ते त्यायनं गटारांत टाकले. या कलयुगांत गरीबाची दुनया न्हाय्."

फाटक्या गोधडीवर तळमळत पडलेली त्याची लाडकी मिरा कण्हत होती आणि त्याचे भेसूर पडसाद त्याच्या हृदयांत सारखे उठत होते.

रा. भि. जोशी

अभ्यास

१. या गोष्टीला 'गरिबाची अधेली' असें कां नांव दिलें आहे ?

२. गोष्ट इतकी परिणामकारक होण्यास कथानकांतील कोणत्या प्रसंगाची मुख्यतः मदत झाली आहे ? इतर कारकून व जोगळेकर यांच्यांत काय फरक होता ? तो तसा कां होता ?

३. तहसील कचेरी म्हणजे मामलेदार कचेरी. अतिक्रमण = दुसऱ्याच्या हद्दींतील जमिनीचा उपयोग करणें. मिसला = प्रकरणें.

४. खुणा केलेल्या वाक्यांचें स्पष्टीकरण करा.

५. या गोष्टींत अवचित्या महाराच्या तोंडीं घातलेली भाषा वऱ्हाडी आहे. तिकडील खालच्या वर्गांतील लोक अशीच भाषा बोलतात.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

१४

अन्योक्ति

कोकिलान्योक्ति

येथें समस्त बहिरे बसताति लोक
कां भाषणें मधुर तूं करिशी अनेक.
हे मूर्ख यांस किमपीहि नसे विवेक,
वर्णावरून तुजला गणतील काक. १

बैसोनी, सखया पिका उगिच तूं मार्गप्रतीक्षा करी
जों आंबे फुलती, सुगंध सुटती, येई मधू जोंवरी,
तेव्हां सार्थकतेस येइल खरी ही गोड वाणी तुझी,
आतां ग्रीष्म असे, धुळी उडतसे, दे त्रास नेत्रास जी; २

या माळावरि वृक्ष एकहि नसे बाळा खुळ्या कोकिला,
येथें मंजुळ शब्द काढुनि गळा कां शोषिशी आपुला ?
जेथें बोल अमोल वाटति तुझे तो देश, बा वेगळा;
तेथें आम्र फुलोनि गंध विखरे चोंहींकडे आगळा. ३

वसंतसमयीं फुले, परिमळें दिशा व्यापि जो,
जयास अवलोकुनी सुरतरूहि चित्तीं थिजो,
तया सतत सेविती विहग आम्रवृक्षा किती;
परी पिकचि एकला मधुर वाणि लाधे कृती ४

मयूरान्योक्ति

पक्षी या मळयावरी विहरतां लक्षावधी दीसती,
केकी एकच धन्य त्यांत इतर, क्षुद्रांपरी भासती,

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

जो शब्दें अपुल्या क्षणांत पळवी सर्पां सदर्पां महां
जेणें चंदन सौख्यकारक जना होती; खरा थोर हा.
झाडें पेटुनि वाजती कडकडां; त्यांचा ध्वनी होतसे,
ज्वाला राहुनि राहुनी उठति या, विद्युल्लता ही नसे,
काळा धूर नभीं बहू पसरला, हा मेघ नोहे खरा,
वर्षाकाळ न हा, दवानल असे, मोरा, पळें रे घरा. २

रत्नांचा जणुं ताटवा झळकतो मोरा, पिसारा तुझा,
हर्षे नाचशि तैं गमे त्रिभुवनीं पक्षी न ऐसा दुजा,
मोठा सुंदर तूं खरा परि दया नाहींच भिल्लांस या,
हे घेतील तुझ्या जिवा, झडकरी सोडीं अरण्यास या. ३

शुकान्योक्ति

देखोनी नारळीचा तरु शुक भुलला एक त्याच्या फळाला,
साळीचें शेत मोठें झडकरि पिकलें सोडुनी तो निघाला,
त्यानें त्या नारळातें फिरुनि फिरुनियां फोडण्या यत्न केला,
आशेचाची न तेणें परि बळकटहो चंचुचा भंग झाला.

बकान्योक्ति

उभा राहे एके चरणिं धरणीतें धरुनियां,
तपश्चर्या वाटे करित जणु डोळे मिटुनियां,
बका ! ऐशा ढोंगें तव अमित मासेच ठकती,
परि ज्ञाते तूझें कपट लवलाहीं उमजती.

सिंहान्योक्ति

खाण्यांवाचुनि रोडला जरि, जरायोगें बहू वाळला,
रोगानें अति पीडिला, जरि मरायातेंहि कीं टेंकला,

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

उन्मत्तद्विपगंडभेदन करायाचीच इच्छा करी,
मानी क्षुद्र जनावरांपरि तृणा स्पर्शेच ना केसरी. १
मेघांच्या गर्जनेनें खवळुनि वरतीं सिंह पाही स्वभावें,
काका, त्वां भीति सारी त्यजुनि तरुवरी मांसखंडास खावें,
जो उन्मत्तां गजांच्या खरतरनखरीं फोडुनी मस्तकांतें.
धाला रक्ता पिऊनी, नच मृत पशुच्या इच्छितो तो कणांतें. २
भुंगे गुंजारवातें करिति शिरिं असे मत्त हत्तीहि जीतें,
डोळां देखोनि होते पळत भयभरें सोडुनीयां धृतीतें,
जेथें मुक्ताफळांचा खच बहु पडला, त्या **गुहे**माजि आतां,
सिंहाच्या क्षुद्र कोल्हे कलकल करिती मृत्युनें त्यास नेतां. ३
कृतीचीं आयाळें जडवुनि गळा पुष्ट करुनी,
बसे श्वा सिंहाच्या पदिं बहुत आवेश धरुनी,
तरी जो ऐकोनी भिउनि पळती मत्तहि करी;
कसा त्या नादातें क्षणभरहि तो पामर करी ? ४

गजान्योक्ति

कर्णीं लोंबति चामरें, चमकती माळा गळां साजिऱ्या,
वेली रंगविल्याहि शोभति शिरीं सोंडेवरी गोजिऱ्या,
ऐसा तो नटला तरी नृप**करी** पायीं बिडी वागवी,
कैशी त्यास मिळे स्वतंत्र वनिंच्या हत्तीपुढें थोरवी; १
ज्याची स्पर्धा कराया इतर गज कधीं शक्त नाहींच झाले,
सांगावें काय ? ज्याच्या मृगपतिहि भयें रान सोडून गेले,
तो पंकामाजि आजी गजवर फसला, युक्ति नाहीं निघाया,
अव्हेरीती, पहा हे कलकल करुनी क्षुद्र कोल्हे तयाला. २

कृष्णशास्त्री चिपळूणकर

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

अभ्यास

मागें तुम्हांला उपमा व उत्प्रेक्षा यांची माहिती दिली. प्रस्तुतची कविता अन्योक्तिपर आहे म्हणजे तिच्यांत 'अन्योक्ति' नांवाचा अलंकार साधला आहे. ज्या विषयाचें वर्णन करावयाचें आहे किंवा ज्याच्यासंबंधीं कांहीं सांगावयाचें आहे त्याला उद्देशून कांहीं न लिहितां त्या विषयाशीं साम्य असेल अशा दुसऱ्याच विषयाला किंवा वस्तूला उद्देशून लिहावयाचें त्याला **अन्योक्ति** असें म्हणतात. **अन्य** म्हणजे दुसऱ्या वेगळ्याच वस्तूला संबोधून केलेली उक्ति म्हणजे बोलणें; उदा०—पहिली अन्योक्ति कोकिळेला संबोधून आहे. कवि कोकिळेला "येथें सारे बहिरे जमले आहेत, उगाच कशाला गातेस" असें म्हणतो. वास्तविक हें सारें म्हणणें एखाद्या गुणी माणसाला—कवि, नाटककार इत्यादिकांस उद्देशून आहे.

मयूरान्योक्ति : ज्या श्लोकांत मोराला संबोधून लिहिलें आहे तें. मोर हा येथें अन्य म्हणजे वेगळी वस्तू आहे. त्याचप्रमाणें शुकान्योक्ति, बकान्योक्ति, सिंहान्योक्ति इ. 'अन्योक्ति' हा अलंकारप्रकार कां निघाला असेल बरें ?

१. सुरतरु = कल्पवृक्ष. कृती = धन्य असा. मलय = या नांवाचा पर्वत. केकी = मोर (व्युत्पत्ति सांगा). दावानल = वणवा. उन्मत्तद्विपगंड-भेदन = माजलेल्या हत्तींचीं गंडस्थळें फोडणें. धृति = धैर्य. श्वा = कुत्रा.

२. चावऱ्या कुत्र्यावर, रक्त शोषणाऱ्या ढेकणावर अन्योक्ति रचा.

३. या श्लोकांच्या वृत्तांची माहिती मिळवा.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

१५

शिपाई खेंकडा व समुद्रफूल



मनुष्याला एकटें राहणें अगदीं आवडत नाहीं. एकटें राहणें हा त्याचा स्वभावच नव्हे. चारचौघांत मिळून मिसळून वागावेंसें त्याला वाटतें व म्हणून तो नेहमीं आपल्याभोंवतीं स्नेही–सोबती गोळा करीत असतो. ज्यांना मित्र, स्नेही वगैरे नाहींत व ते जोडण्याची ज्यांना इच्छा नाहीं किंवा ज्यांना माणसांमध्यें मिळून मिसळून वागण्याची इच्छा नाहीं अशीं माणसें सांपडणार नाहींत असें नाहीं. अशीं माणसें देखील पुष्कळ असतात. परंतु त्यांना आपण कमी लेखतों व हिणविण्याकरितां ‘ एकलकोंडे ’ असें म्हणतों.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

ज्याप्रमाणें माणसांमध्यें स्नेह जोडण्याची प्रवृत्ति असते, त्याचप्रमाणें इतर प्राणीदेखील एकमेकांची मैत्री संपादन करितात. परंतु मनुष्यप्राण्यांमधील मैत्री व इतर प्राण्यांमधील मैत्री यांत थोडा फरक आहे. मनुष्य निव्वळ आपला फायदा व्हावा एवढ्याकरितां स्नेह जोडीत नाहीं. इतर प्राणी मात्र ज्या स्नेह्यापासून जास्तींत जास्त फायदा करून घेतां येईल असा सोबती शोधून काढून त्याचा स्नेह संपादन करितात; थोडक्यांत सांगावयाचें तर माणसांच्या मैत्रींत एकमेकांना एकमेकांपासून नेहमीं फायदा होईलच असें नाहीं, तर इतर प्राण्यांमध्यें एकमेकांना एकमेकांपासून बराच फायदा होणें शक्य असलें तरच स्नेह जुळतो. अशा तऱ्हेचा स्नेह जुळण्याकरितां दोन्ही प्राणी एकाच जातीचे पाहिजेत असें नाहीं. उलट दोन निरनिराळ्या जातींच्या प्राण्यांची मैत्री फार लवकर जुळून येते.

मनुष्येतर प्राण्यांमधील अशा मैत्रीचीं पुष्कळ मजेदार उदाहरणें देतां येतील. परंतु येथें असें एकच उदाहरण देत आहें. खेंकडा हा प्राणी सगळ्यांनीं पाहिलेलाच असेल. याच प्राण्याच्या कांहीं जाति समुद्रांत राहतात. त्यांपैकीं 'शिपाई खेंकडा' ही एक आहे. या प्राण्याचें पोट व शेपटीकडचा भाग अगदीं मऊ असतो. समुद्रांतले साधारण मोठे मासे हे याचे कट्टे शत्रु. हा खायला अतिशय चवदार लागतो म्हणून हे मासे याला मागच्या बाजूनें पकडून गट्ट करितात. म्हणून आपल्या अंगाच्या या भागाचें संरक्षण करण्याकरितां याची नेहमीं धडपड चाललेली असते. जमिनीवरून हळू हळू जाणाऱ्या किंवा नदीच्या पाण्यांत राहणाऱ्या गोगलगाईच्या पाठीवर जसें घर असतें, तसेंच घर समुद्रांत राहणाऱ्या पुष्कळ जातींच्या गोगलगाईच्या पाठीवर असतें. गोगलगाय मेली म्हणजे हें घर रिकामें पडतें. अशीं घरें काढून हे 'शिपाई खेंकडे' आपला पोटाचा व मागचा भाग त्यांत लपवितात व अशा तऱ्हेनें शत्रूपासून आपलें संरक्षण

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

करण्याची तजवीज करितात. पुष्कळ वेळां गोगलगाईच्या एकाच रिकाम्या घराबद्दल दोन खेंकडे अतिशय त्वेषानें भांडतात व एक दुसऱ्याचा पराभव करून तें घर सर करून त्यांत आपला शिरकाव करून घेतो. या कारणामुळेंच अशा जातीच्या खेंकड्याला 'शिपाई खेंकडा' म्हणतात.

कांहीं उनाड मुलांना जशी रस्त्यांतून वणवण करीत भटकण्याची संवय असते, त्याचप्रमाणें हे खेंकडे देखील नेहमीं भटकत असतात. परंतु यांचें भटकणें उनाड मुलांच्या भटकण्याप्रमाणें विनाकरण नसतें. एके जागीं स्वस्थ बसून राहिलें तर यांना पोटभर खायलाच मिळणार नाहीं, म्हणून त्यांना भटकणें भाग पडतें. समुद्रांत आणखी एका तऱ्हेचे प्राणी असतात, त्यांना 'समुद्र-फूल' म्हणतात. कारण ते फुलांसारखे दिसतात. या समुद्रफुलांची व शिपाई खेंकड्यांची फार लवकर गट्टी जमते. समुद्र-फुलाच्या तोंडाभोंवतीं पुष्कळसे लांब लांब धागे असतात. या धाग्यांवर जिकडे तिकडे अगदीं बारीक तंतु असतात. या तंतूंमध्यें एक तऱ्हेचा विषारी पदार्थ भरलेला असतो. एकादा मोठा मासा किंवा समुद्रांतला दुसरा प्राणी या समुद्रफुलाजवळ आला तर धाग्यावर असलेले हे असंख्य तंतु समुद्रफुल जोरानें बाहेर फेंकतें. हे तंतु माशाच्या अंगांत घुसतात व त्यांत असलेल्या विषानें तो मासा मरतो किंवा अर्धमेला होतो. अशा तऱ्हेनें समुद्रफुलाला शत्रूचें निवारण करितां येतें. समुद्रफुलाच्या या विषारी-पणामुळेंच मासे व दुसरे पुष्कळ प्राणी सहसा त्याच्या वाटेस जात नाहींत. समुद्रफुलें नेहमीं खडकांना अगर समुद्रांतील दुसऱ्या कांहीं वस्तूंना चिकटून राहातात. एका जागेवरून दुसऱ्या जागीं जाण्याची त्यांच्या अंगीं शक्ति नाहीं. त्यांना चालतां किंवा पोहतां येत नाहीं, असें पाहिजे तर आपण म्हणूं. एकाच जागेला चिकटून राहिल्यामुळें त्या ठिकाणीं खाण्या-सारखे जेवढे पदार्थ त्यांच्या आटोक्यांत येतील तेवढेच त्यांना खायला

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

मिळतात. एखादे वेळेस असे पदार्थ त्यांना मिळालेच नाहींत तर त्यांची उपासमार होते; कारण समुद्रांत ठिकठिकाणीं हिंडून त्यांना खाण्याचे पदार्थ मिळवितां येत नाहींत. अशा वेळीं एखाद्या सोबत्याचे मदतीनें त्यांना समुद्रांत इकडे तिकडे हिंडतां आलें तर पाहिजेच असतें. नाहींतर उपासमारीनें मरण हें ठेवलेलेंच !

शत्रूपासून बचाव करण्याकरितां 'शिपाई खेंकडा' जरी आपल्याकडून इतका बंदोबस्त करतो तरी त्याचे हे सारे प्रयत्न निष्फळ ठरतात. कारण, पुष्कळ वेळां समुद्रांतले मोठे मासे किंवा दुसरे प्राणी त्याला घरासकट खाऊन टाकतात. त्याच्या मोठ्या दोन आंकड्यांचा किंवा गोगलगाईच्या घरांत लपण्याचा कांहींच फायदा होत नाहीं. अशा वेळीं बचावाचें आणखी कांहीं साधन त्याला हवें असतें.

समुद्रफुलाला उपासमारीपासून वांचविणारा एखादा स्नेही हवा असतो, तर शिपाई खेंकड्याला शत्रूपासून बचाव करण्यांत मदत देणारा एखादा जिवलग मित्र जोडावयाचा असतो, अशा परिस्थितींत हे दोन प्राणी सांपडल्यावर त्यांची मैत्री जुळण्यास फारसा वेळ लागत नाहीं. शिपाई खेंकडा समुद्रांत खडकावरून हिंडतांना कांहीं समुद्रफुलांना गांठतो व त्यांच्याशीं गोड गोड बोलून त्यांना आपल्या घरीं राहायला बोलावतो. इतकेंच नव्हे, तर खडकाला चिकटलेल्या ज्या स्नेह्यांना तो राहावयाचें बोलावणें करतो, त्यांना आपल्या पुढच्या आंकड्यांनीं हळूच खडकापासून सोडवून आपण राहत असलेल्या गोगलगाईच्या घरावर नीट व्यवस्थितपणें चिकटवितो. पुष्कळ वेळां दोन मोठाल्या समुद्रफुलांना तो आपल्या दोन्ही आंकड्यांवरच राहायला जागा देतो. अशा तऱ्हेनें तो राहात असलेलें तें गोगलगाईचें घर व त्या घराचे बाहेर डोकावणारे त्याचे ते मोठाले आंकडे समुद्रफुलाच्या अंगाखालीं अगदीं झांकून जातात, व हा समुद्रफुलांचा

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

झुपका चालतो आहे कीं एखादा शिपाई खेंकडा चालतो आहे हें इतर प्राण्यांना कांहीं कळत नाहीं. मासे वगैरे प्राण्यांना बाहेरून सगळीं समुद्र-फुलेंच दिसत असल्यामुळें ते सहसा त्याच्या वाटेस जात नाहींत व एखादा प्राणी गेलाच तर तो समुद्रफुलाच्या त्या विषारी धाग्यांनीं अर्धमेला होतो आणि त्याला व इतरांना अशी अद्दल घडते कीं ते पुन्हां त्याच्या वाटेला जात नाहींत. समुद्रफुलांच्या स्नेहाचा शिपाई खेंकड्याला हा असा फायदा होतो. उलटपक्षीं, शिपाई खेंकडा समुद्रांत ठिकठिकाणीं हिंडत असल्यामुळें समुद्रफुलाला खायचे पदार्थ पुष्कळ मिळवितां येतात व त्याचें पोट भरतें. इतकेंच नव्हे, तर शिपाई खेंकडा स्वत:चें पोट भरण्याकरितां म्हणून जे पदार्थ मिळवितो, त्यांतला थोडासा वांटा तो आपल्या मित्रांना देखील देतो. अशा तऱ्हेनें हे स्नेही एकमेकांना मदत करून मोठ्या आनं-दानें एके ठिकाणीं राहतात.

ज. नी. कर्वे

परिचय

सृष्टीमध्यें इतके चमत्कार भरले आहेत कीं त्यांपैकीं कित्येक आपणांस सांगूनहि खरे वाटत नाहींत. या लेखांत समुद्रांतील दोन प्राण्यांचें–कार्यसाधु मित्रांचें–वर्णन दिलें आहे. शास्त्रीय विषय असून वर्णन कसें चटकदार आणि चटकन् समजेल अशा सोप्या भाषेंत केलें आहे. शास्त्रीयज्ञानाचीं आपल्या सभोंवतालच्या नैसर्गिक किंवा शोधक लोकांनीं बनविलेल्या कृत्रिम उपयोगी वस्तूंच्या माहितीचीं अशीं वर्णनें इंग्रजी भाषेंत अनेक आहेत. मुलांचें कुतूहल वाढून त्यांच्या निरीक्षणशक्तीचा विकास व्हावा व चौकसपणा येऊन तीं बहुश्रुत व्हावींत हा अशा 'सुलभविज्ञाना'चा (Popular Science) उद्देश असतो. शिपाई खेंकडे व समुद्रफुलें कोंकणकिनाऱ्यावर मुबलक सांपडतात.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

१६

गंगेपासून होणारे ऐहिक उपयोग

(वसंततिलका)

हे देवि ! ऐहिक सुखें मिळती जनांला,
जीं कां तुझ्याकडुनि, त्यांविषयीं तयांला,
गंगे ! विशुद्ध उपकार तुझे मनांत,
मानावयासचि खरोखर पाहिजेत ॥ १ ॥

हें उत्तरेकडिल भारतखंड सारें,
पोषेचि केवळ तुझ्या गुरुवारिभारें,
टाकूनि तो विषम पर्वतभूप्रदेश,
तूं पातल्यावरि, लगेच सपाट देश ॥ २ ॥

हा लागतां, तव जलप्रवह क्रमानें,
होतो प्रशांत उपयुक्तहि त्याच मानें,
पावून उद्गम हिमाद्रितटप्रदेशीं,
ज्या भेटती तुज असंख्य नद्या जवेशीं, ॥ ३ ॥

त्यांहीं तुझ्या तळवटांतिल देश सारा,
पावेचि हा जलसमृद्धि सदा अपारा,
वर्षाऋतूंत तुजला प्रतिवर्ष माते,
येतो न पूर, तव जो भिजवी तटातें ॥ ४ ॥

पान्हा फुटूनचि जणो हरुषें पयातें,
तूं देवि ! पाजिसि तया निजनंदनातें;

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

तें क्षीरपान घडतांचि पहा तयाची,
मुद्रा क्षणांत किति जाय फिरून साची ॥ ५ ॥

होऊनि सस्यफलपुष्पसमृद्धि माते !
तो लागतो टवटवीत दिसावयातें;
चोहींकडे तव थडींत अनेक धान्यें,
नाना फळें मधुर लोकरुचीस मान्यें ॥ ६ ॥

पुष्पेंहि नैकविध, रम्य, सुगंधशाली,
उत्पत्ति पावति अखंडित योग्य कालीं;
साऱ्याहि वर्षभरि, जन्हुनरेंद्रकन्ये !
त्वत्तीरवर्तिविषयांतुनि देवि ! धन्ये ! ॥ ७ ॥

वैपुल्य अस्खलित नांदतसे जनांला,
पोषून जें वितरितें बहु मंगलाला;
गंगे ! तुझ्या तळवटांतचि पूर्वकालीं,
राज्यें असंख्य बहु थोर बलाढ्य झालीं ॥ ८ ॥

भासे मला विमल भारतभूमिका हे,
त्वत्स्रोत हेंचि शुभ मंगलसूत्र वाहे;
तीरीं पुरें विलसती घन लागलेलीं,
मुक्ताफळेंचि जणुं त्यांतुनि ओंवियेलीं ॥ ९ ॥

व्यापार थोर बहु अस्खलित प्रसंगें,
या सर्वही तळवटांतुनि, देवि गंगे !
चाले तुझ्यावरुनि, यास्तव या प्रदेशीं,
तूं पावशी बहुत उन्नत योग्यतेशीं ॥ १० ॥

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

या रीतिचा रुचिर वस्तुसमूह जीतें,
संभूषवी बहु अशा तुझिया थडीतें,
पाहून, जन्हुतनये ! वदुं फार काय !
स्वर्लोकही मजसि होऊनि तुच्छ जाय ! ॥ ११ ॥

पांडुरंग व्यंकटेश चिंतामणीपेठकर

अभ्यास

संस्कृतशब्दप्रचुर असूनहि या गंगावर्णनपर जुन्या थाटाच्या कवितेंत प्रसाद आहे. प्रसाद म्हणजे काय हें शिक्षकाकडून नीट समजाऊन घ्या व प्रासादिक व प्रसादहीन काव्याचीं उदाहरणें त्यांच्याकडून ऐका. विद्याधर वामन भिड्यांची एखादी निवडक कविता या दृष्टीनें वाचा.

ही कविता तुम्हांला अत्यंत कठीण वाटेल. कठीण पण सुंदर कविता वाचण्याची तुम्हांला संवय झाली पाहिजे. तुमच्या बुद्धीला थोडाबहुत ताण बसला पाहिजे याच हेतूनें ही कविता निवडली आहे.

गुरुवारिभार = विपुल पाण्याचा भार. उद्गम = उगम. सस्य = गवत. थड = तीर (गंगाथडी, भीमथडी). नैकविध (न+एक+विध) एक प्रकारची नाहींत अशीं म्हणजे नाना प्रकारचीं. त्वत्तीरवर्तिविषय (त्वत्+तीरवर्ति+विषय) = तुझ्या तीराच्या जवळचा प्रदेश. मुक्ताफळें = मोतीं.

१. गंगेला जन्हु राजाची मुलगी कां म्हटलें आहे ? गंगेला मिळणाऱ्या नद्या कोणत्या ?

२. या काव्यांतील उपमा, उत्प्रेक्षा शोधून काढा. ‘तुझे डोळे कमलासारखे आहेत.” ही **उपमा** व ‘ तुझे डोळे जणूं कमलेंच आहेत,’ ही **उत्प्रेक्षा.**

३. नवव्या श्लोकांत कोणता अलंकार आहे ?

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

१७

चिंगी महिन्याची झाली नाहीं तोंच

"....काळी आहे का म्हणावें मी? कशी गोरी गोरी पान आहे! –हो हो! आतां आमच्या चिंगीला सरी करायची, बिंदल्या करायच्या, झालंच तर वाळे, सांखळ्या, सगळे सगळे दागिने करायचे ते!–कसा छान-दार मग परकर नेसायचा, पोलकें घालायचें, अन् ठुमकत ठुमकत शाळेंत जायचें, नाहीं बाई?-शहाणी होईल बबी माझी! मोठीं मोठीं बुकं वाचील! अन् मग महाराज छोनींचं आमच्या लगीन!—खरंच सोने, तुला नवरा काळा हवा कीं गोरा?–का....ळा!



दिवाकर

-नको ग बाई! छबीला माझ्या कसा नक्षत्रासारखा, अगदीं चित्रासारखा नवरा मिळेल हो!--अस्सें थाटाचें लगीन करीन कीं, ज्याचें नांव तें! आहांत कुठें? हजार रुपये हुंडा देईन, हजार! ताशे! वाजंत्री, चौघडा– हो, हो तर! बेंडबाज्यासुद्धां लावायचा! वरात पण वरात निघेल म्हणावें! नळे, चंद्रजोती, झाडें यांचा काय लकूलकाट होईल!–पण खरंच गडे चिंगे, तूं मग भांडायसवरायची नाहींस ना? जर का घरांत भांडलीस, तर पहा मग! माणसाला कसं मुठींत ठेवायला हवें बरं का? संसार पण संसार झाला पाहिजे! आणि हें बघ, आपलें आधींच सांगून ठेवतें, पहिलें तुझें बाळंतपण कीं नाहीं, इथें व्हायला हवें! पुढचीं करा हवीं तर खुशाल आपल्या घरीं!–मोठी दैवाची होईल चिंगी माझी!

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

पुष्कळ मुलं होतील माझ्या बबीला ! !—पण काय ग, तुला मुलगे झालेले आवडतील, का मुली ! मुली ! नको ग बाई, कारट्यांचा मेला तो जंजाळ !—एकापेक्षां एक, असे मुलगे होतील म्हणावें मुलगे !— तसेंच, गाडी—घोडे, कपडालत्ता, कश्शा कश्शाला म्हणून कांहीं कमी पडायचं नाहीं !—बरं बरं ! इतक्यांतच नको कांहीं चढून जायला ! मोठा दिमाख दाखवते आहे मला !—पाहा, पाहा ! फुगते आहे पाहा कशी !—पण कार्टे, बोलूं तर नकोस माझ्याशीं, कीं अस्सा हा गालगुच्चा...अग बाई ! हें ग काय ! कसें सोन्यासारखें बोलतें आहें, अन् तूं आपली....नाय नाय...उगी, उगी माझी बाय ती !...."

दिवाकर

परिचय

ही एक नाट्यछटा आहे. नाटकाच्या प्रवेशांत दोन किंवा अधिक पात्रांचा संवाद असतो; परंतु नाट्यछटेमध्यें एकच पात्र असतें. ते कधीं मनाशीं बोलतें तर कांहीं नाट्यछटांत तें इतरांशीं बोलतें. ऐकणारे या पात्राच्या प्रश्नांना उत्तरें देतात असें समजून हें पात्र पुढें बोलणें चालू ठेवतें. हीच नाट्यछटा घ्या. हिच्यांत बोलणारें पात्र एकच म्हणजे चिंगीची आई. चिंगी एक महिन्याची झाली नाहीं तोंच ही आई मनोराज्य करीत आहे; ती चिंगीशीं बोलते आहे म्हणण्यापेक्षां चिंगीबद्दल मनाशीं बोलते आहे हें म्हणणें जास्ती सयुक्तिक होईल.

अभ्यास

१. चिंगीनें कांहीं उत्तरें दिलीं आहेत किंवा शब्द उच्चारले आहेत असें समजून आई तिला उद्देशून कोठें कोठें बोलते तें दाखवा.
२. चिंगी गोरी आहे का काळी असें तुम्हाला वाटतें ?
३. खुणा केलेल्या शब्दांमुळें विनोद कसा उत्पन्न होतो तें सांगा.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

१८

घन तमीं शुक्र बघ राज्य करी !

(राग भैरवी)

घन तमीं शुक्र बघ राज्य करी !
रे खिन्न मना बघ जरा तरी ! ॥ धृ० ॥

ये बाहेरी अंडें फोडुनि
शुद्ध मोकळ्या वातावरणीं
कां गुदमरसी आंतच कुडुनी
रे मार भरारी जरा वरी ! घन० ॥ १ ॥

प्रसवे अवस सुवर्णा अरुणा !
उषा प्रसवते अनंत किरणा !
पहा कशी ही वाहे करुणा !
कां बागुल तूं रचितोस घरीं ? घन० ॥ २ ॥

फूल हंसे कांट्यांत बघ कसें !
काळ्या ढगिं बघ तेज रसरसे !
तीव्र हिमांतरिं वसंतहि हंसे
रे ! उघड नयन ! कळ पळे दुरी ! घन० ॥ ३ ॥

फूल गळे ! फळ गोड जाहलें
बीज नुरे ! डौलांत तरु डुले
तेल जळे ! बघ ज्योत पाजळे !
का मरणिं अमरता ही न खरी ? घन० ॥ ४ ॥

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

मना ! वृथा कां भीसी मरणा ?
दार सुखाचें तें ! हरि-करुणा !
आई ! पाही वाट रे मना !
पसरोनि बाहु कवळण्या उरीं ! घन० ॥ ५ ॥

भा. रा. तांबे

परिचय

पहिल्याच ओळींत कसें सुंदर चित्र आहे पाहा ! गडद काळोखी रात्र आणि त्यांत पडणारा तेजस्वी शुक्राचा प्रकाश ! मनांतल्या मनांत कुढणाऱ्या, निराश झालेल्या, आयुष्यास विटलेल्या माणसास कवि अनेक गोष्टी दाखवून 'दुःखा अंतीं सुख' असतें, नाशांतूनच नवीन उत्पन्न होतें असें सांगून उत्साह देतो आहे. एकेक कल्पना पाहा आणि त्यांतून अर्थ कसा निघतो तें शोधा.

मरणाला भिऊं नये असा उपदेश पुराणांत व गीतेंत सांपडतो. कवि म्हणतो, ही ईश्वराची कृपा आहे. हें प्रेमळ आईचें बोलावणें आहे.

अभ्यास

१. अवस, बागुल, हिम या शब्दांचे अर्थ सांगा.
२. पहिल्या कडव्यांत कोणता अलंकार योजिला आहे ? ही कल्पना दृष्टांत अलंकार योजून सांगा.
३. या कवितेंतील कोणती ओळ किंवा कल्पना तुम्हांला आवडते व ती कां ? या कवितेचें सार एका ओळींत आहे. ती ओळ शोधा.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri



(मूर्ति)　　वीर मृत्युंजय　　[श्री. वेंगारी]

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

१९

वीर मृत्युंजय

बाळपणांतच एखाद्या कलेंत उपजत निष्णात् असून नांवलौकिक मिळविलेल्या कलावंतांचीं कांहीं उदाहरणें तुमच्या कानीं पडलीं असतील. सिनेमानट मास्तर मोडक, गायक मनोहर बर्वे व शाळिग्राम भावंडें, यांच्याप्रमाणें बालवयांत मूर्तिकलेची आवड दाखवून अवघ्या अठराव्या वर्षीं, म्हैसूर-मुंबई येथील प्रदर्शनांत प्रशंसा मिळविलेल्या माधवराव रामचंद्र वेंगारी यांनीं केलेला हा वीर पुरुषाचा पुतळा पाहा. स्नायूवर नियंत्रण ठेवण्याचे प्रयोग करणारे व्यायामशिक्षक प्रो. सरकारी यांची हुबेहुब, जणूं काय जिवंत अशी प्रतिमा म्हणून कुणाला कौतुक वाटेल, तर निरोगी बांधेसूद शरीराचा उत्तम नमुना म्हणूनहि हा पुतळा प्रेक्षणीय मानला जाईल.



माधवराव रामचंद्र वेंगारी

आपण सुद्धां असें शरीर कमवावें असें नाहीं तुम्हांला वाटत ? हा मूर्तिमंत आरोग्यवीर रोगावर विजय मिळवून मृत्यूला पायाखालीं बळीप्रमाणें दाबत आहे, संकटरूपी शत्रूची तरवार मोडून तिची मूठ पायाशीं पडली

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

आहे. मान, दंड, मांड्या, पोटऱ्या किती रेखीव, प्रमाणशुद्ध, मांसल पण पिळदार दाखविल्या आहेत. उभें राहण्याची ऐट पहा ! बल, आत्मविश्वास आणि त्या बरोबरच मनाची शालीनता मुद्रेवर प्रतिबिंबित झालेली आहे. मुलांनीं आदर्श म्हणून पुढें ठेवण्यालायक पुतळा आहे हा.

श्री. बा. रानडे

२०

देव न मानणारा देवमाणूस

"आपल्या मुलाच्या मोठाल्या परीक्षा होत आहेत, आतां त्याला मोठाल्या पगाराची चाकरी लागेल व आपले पांग फिटतील, असे मोठाले मनोरथ आई तूं करीत असशील; पण मी आतांच तुला सांगून टाकतों कीं, विशेष संपत्तीची, विशेष सुखाची हांव न धरितां, मी फक्त पोटापुरत्या पैशावर संतोष मानून सर्व वेळ परहितार्थ खर्च करणार."

हा उतारा एखाद्या कादंबरींतला नाहीं. इ. स. १८७८ सालच्या खऱ्या-खुऱ्या पत्रांतला भाग आहे तो. वयाच्या बाविसाव्या वर्षीं बी. ए. झालेल्या एका तरुणानें आपल्या आईला हें पत्र लिहिलें होतें. त्यावेळीं पदवीधरांच्या पुढें बड्या बड्या नोकऱ्या हात जोडून उभ्या असत. पण या त्यागी तरुणानें हंसतमुखानें त्यांच्याकडे पाठ फिरविली. त्याच्यासमोर दोन मार्ग स्पष्ट दिसत होते. एक सरकारी नोकरीचा. त्याच्यावर मऊ पायघड्या पसरल्या होत्या. दुसरा समाजसेवेचा. खांचखळगे आणि कांटेकुटे यांनीं भरून गेला होता तो ! पण क्षणभरसुद्धां न कचरतां हा तरुण त्या दुसऱ्या मार्गानेंच चालूं लागला. या धीरपुरुषाचें नांव गोपाळ गणेश आगरकर.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

घरीं चालून येणारी मोठ्या पगाराची नोकरी लाथाडायला आगरकर घरचे श्रीमंत होते ? मुळींच नाहीं ! कऱ्हाडजवळचें टेंभू हें त्यांचें मूळ गांव. इंग्रजी तिसरीपर्यंतचें शिक्षण कसेंबसें कऱ्हाडांत झालें. कऱ्हाडला तरी पुढले वर्ग कुठें



गोपाळ गणेश आगरकर

होते ! दरिद्री गोपाळ वयाच्या तेराव्या वर्षी कऱ्हाडच्या मुन्सफ कोर्टांत उमेदवार झाला. पण शिक्षणाकरितां तळमळणारें त्याचें मन कांहीं केल्या गप्प बसेना. रत्नागिरीला कुणी आप्त होते. त्यांच्याकडे हा मुलगा पायपीट करीत

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

गेला. तिथेंहि निराशा झाली. पुन्हां कऱ्हाडला परत यावें लागलें. येऊन करायचें तरी काय ? पुढें समाजाच्या रोगांवर धन्वंतरीप्रमाणें औषधें देणारा हा मुलगा कंपाउंडर होऊन कऱ्हाडच्या दवाखान्यांत बाटल्या भरीत बसूं लागला.

परंतु माघार हा शब्दच आगरकरांच्या कोशांत नव्हता. त्यांचे एक मामा अकोल्याला होते. तिथें जाण्याची संधि त्यांना लवकरच मिळाली. अकोल्यालाहि अभ्यासाच्या मार्गांत अडचणी नव्हत्या असें नाहीं. पण पूर आलेल्या नदीचें भय कुणाला ! पोहतां न येणाराला. आगरकरांचा आत्मविश्वास यावेळीं किती वाढला होता हें खालील आख्यायिकेवरून दिसून येईल.

एकदां त्यांना शाळेंत येण्याला उशीर झाला. त्यावर त्यांचे शिक्षक टोंचून बोलले, "तुम्ही असेच मागें पडणार. तुमच्या हातून काय होणार आहे !' नागाला धक्का लागण्याचा अवकाश, तो लगेच फडा वर करतो. आगरकरांच्या स्वाभिमानानें त्या शिक्षकांना उत्तर दिलें 'आपल्यासारखा एम्.ए. होईन तरच नांवाचा आगरकर !' गोपाळरावांनीं आपला शब्द खरा केला. ते एम्. ए. झाले, पण त्यांनीं पदवी मिळविली ती पैशाकरितां अथवा प्रतिष्ठेकरितां नव्हती. तर ज्ञानाकरितां आणि लोकशिक्षणाकरितां होती.

पदवी पदरांत पडेपर्यंत त्यांनीं जे हाल भोगले त्यांची गणतीच करतां येणार नाहीं. कॉलेजांत कित्येक वेळां एका सदऱ्यावर त्यांना सर्व व्यवहार करावा लागे. रात्रीं जिकडे तिकडे सामसूम झालें कीं हा सदरा धुऊन वाळत टाकायचा, सकाळीं तो वाळला म्हणजे अंगांत घालायचा ! शिष्यवृत्ति, वर्तमानपत्रांतलें लेखन, वक्तृत्व व निबंध यांच्या चढाओढींत मिळविलेलीं

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

बक्षिसें इत्यादि मार्गांनीं त्यांनीं डेक्कन कॉलेजमधलीं तीन वर्षें पार पाडलीं. एम्. ए. च्या परीक्षेच्या वेळीं फी भरायलाच पैसे नव्हते; पण स्वारी मुळींच डगमगली नाहीं. आपली लेखणी कामधेनु आहे अशी त्यांची खात्री होती. फीपुरते पैसे मिळविण्याकरितां आगरकरांनीं एक नाटक लिहावयाला सुरुवात केली. नाटकलेखनाकरितां जाग्रणें होऊं लागलीं. ही गोष्ट त्यावेळचे डेक्कन कॉलेजांतील गणिताचे अध्यापक केरूनाना छत्रे यांना कळली. त्यांनीं गोपाळरावांची फी भरल्यामुळें, अपूर्ण असूनहि. त्या नाटकाचा शेवट गोड झाला.

बी. ए. होईपर्यंतच्या तीन वर्षांत गोपाळराव रात्रंदिवस दारिद्र्याशीं झुंजत होते. या द्वंद्वयुद्धांत त्यांनीं विजय मिळविला खरा! पण त्यांचा शत्रू जातां जातां त्यांना असा वार करून गेला कीं ती जखम पुन्हां कधींहि भरून आली नाहीं. कॉलेजांतील कष्टमय आयुष्यानें गोपाळरावांची शरीरसंपत्ति खालावलेली पाहातांच त्यांच्या आनुवंशिक दम्यानें उचल खाल्ली. या त्रासदायक रोगानें त्यांची जन्मभर पाठ पुरविली. पण पाठीला लागलेल्या त्रासांकडे अगर पुढें उभे राहणाऱ्या मोहांकडे ध्येयवाद्यांचें लक्ष असतें कुठें! त्यांची दृष्टि ध्येयाच्या ध्रुवावर खिळलेली असते. कॉलेजांत बाळ गंगाधर टिळक आगरकरांचे जीवश्च कंठश्च स्नेही झाले होते. या बाळगोपाळांनीं निबंधमालाकार चिपळूणकर यांच्या साहाय्यानें पुण्यांत स्वतंत्र हायस्कूल स्थापन करण्याचें ठरविलें. आणि न्यु इंग्लिश स्कूलचें निशाण ता. १ जानेवारी १८८० रोजीं उभारण्यांत आलें. या निशाणाखालीं गोळा होणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या भराभर वाढत गेली. अवघ्या तीस रुपयांवर तीस दिवसांचा चरितार्थ चालविणाऱ्या या विद्वानांच्या कार्याला लोकांकडून इतका पाठिंबा मिळाला कीं त्यांनीं १८८५ च्या आरंभीं फर्ग्युसन कॉलेजची स्थापना केली. डेक्कन

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

एज्युकेशन सोसायटीनें चालविलेल्या या कॉलेजची आजची वाढ पाहिली म्हणजे अफाट विस्तार पावलेल्या वटवृक्षाचीच आठवण होते. आगरकर १८९२–१८९५ या कालांत आपल्या कॉलेजचे प्रिन्सिपॉल होते. त्यांच्या आयुष्याची दोरी अकालीं तुटली नसती तर पुढेंहि अनेक वर्षें त्यांनीं हें मानाचें स्थान मंडित केलें असतें. त्यांच्या शिक्षणपद्धतीविषयीं श्री न. चिं. केळकर लिहितात "आगरकरांच्या वर्गांत मात्र विद्यार्थ्यांना घरीं बसल्यासारखें वाटे. त्यांचा चेहरा प्रशांत असून त्यांच्या तोंडावर हंसरेपणाची झांक असे; आणि मुद्दाम गांभीर्य आणण्याकरितां ते डोळे मिटीत आणि भुंवया वर चढवीत तेव्हांहि पण विद्यार्थी मनांत समजे कीं हा गंभीरपणाचा निव्वळ बहाणा आहे."

परंतु समाजाची जागृति व्हावयाला मुलांच्या शिक्षणाइतकेंच मोठ्या माणसांचें शिक्षणहि आवश्यक असतें. हें काम करण्याकरितां आगरकर व त्यांचे मित्र यांनीं १८८१ च्या आरंभीं दोन वर्तमानपत्रें काढलीं. एक इंग्रजींत व दुसरें मराठींत. पहिल्याचें नांव 'मराठा' व दुसऱ्याचें 'केसरी.' केसरीच्या दुसऱ्याच वर्षी एका लेखाबद्दल आगरकरांना १०१ दिवसांची शिक्षा झाली. 'मराठ्या'चे संपादक म्हणून टिळकहि तुरुंगांत त्यांचे सोबती होतेच. 'डोंगरीच्या तुरुंगांतील आमचे एकशें एक दिवस' या छोट्या पुस्तकांत आगरकरांचा विनोदी स्वभाव व त्यांची समाजसुधारणेची तळमळ यांचें मोठें सुंदर प्रतिबिंब पडलें आहे. केसरी निघाल्यापासून तंबाखू, पाऊस, ज्वालामुखी इत्यादि साध्या विषयांपासून स्त्रीदास्यविमोचन, स्वातंत्र्य वगैरे अत्यंत महत्त्वाच्या विषयांपर्यंत सर्वांवर आगरकरांची लेखणी चालत असे पण लवकरच तिची कुचंबणा होऊं लागली. एम्. ए. ला तत्त्वज्ञान व इतिहास हे आगरकरांचे विषय होते. त्याचवेळीं मिल्ल व स्पेन्सर यांच्या ग्रंथांचा त्यांनीं अभ्यास केला होता. व त्याचा परिणामहि त्यांच्या मनावर

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

झाला होता. " पूर्वजांनीं घालून दिलेल्या नियमांपैकीं जेवढे हितकारक असतील तेवढ्यांचेंच आम्ही पालन करणार व जे अपायकारक असतील ते टाकून देऊन त्यांचे जागीं आम्हांस निर्दोष वाटतील असे नवीन घालणार—" हें पडलें आगरकरांचें ब्रीदवाक्य. पण केसरी चालविणाऱ्या टिळक प्रभृति त्यांच्या मित्रांना तें मान्य नव्हतें. हळुहळू सामाजिक सुधारणेचा पुरस्कार करणारे लेख केसरींत फारसे येईतनासे झाले. एकाच पर्वतांतून निघणाऱ्या नद्यांचे मार्ग पुढें निरनिराळे होतातच कीं नाहीं! आगरकरांनींहि केसरीचा संबंध सोडून १८८८ त आपल्या सुधारणेच्या मतांचा प्रसार करण्याकरितां ' सुधारक ' नांवाचें वर्तमानपत्र काढलें.

शेक्सपीअरच्या हॅम्लेट नाटकाचें ' विकारविलसित ' या नांवानें आगरकरांनीं केलेलें रूपांतर प्रसिद्ध आहे. ' डोंगरीच्या तुरुंगांतील आमचे १०१ दिवस, ' ' वाक्यमीमांसा, ' ' विविध विषयसंग्रह ' हीं त्यांचीं इतर पुस्तकेंहि वाचनीय आहेत. पण त्यांनीं आपली तीव्र बुद्धि व विशाल अंतःकरण हीं पूर्णपणें कुठें ओतलीं असतील तर तीं सुधारकांतील निबंधांत. सुधारकाच्या द्वारें त्यांनीं प्रचंड वाग्यज्ञ आरंभिला आणि ' न भूतो न भविष्यति ' असें रूढीसत्र सुरू केलें. सतत सात वर्षें सर्व प्रकारच्या सामाजिक विषयांवर लिहून लोकांची विचारशक्ति जागृत करण्याचा आगरकरांनीं कसोशीनें प्रयत्न केला. त्यांची समाजसुधारणेची दृष्टि किती व्यापक होती हें त्यांच्या खालील उद्गारांवरून दिसून येईल.

" मनुष्याच्या बुद्धीला परमेश्वराचें यथार्थ ज्ञान होण्याचा संभव नाहीं हें मनांत बाळगून धर्मकल्पनांत किंवा धर्माचारांत जे फेरफार करावयाचे ते करीत गेलें पाहिजे. राजकीय स्वातंत्र्य असल्याशिवाय कोणत्याही देशांत अधिक सुखाची परमावधि व्हावयाची नाहीं; नीतिप्रसार, संपत्त्युत्पादन,

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

आरोग्यरक्षण वगैरे अनेक महत्त्वाच्या गोष्टी ज्ञानाधीन असल्यामुळें लोक-शिक्षणाचें काम जितक्या झपाट्यानें चालवेल तितक्या झपाट्यानें चालविलें पाहिजे; जातिभेद नाहींसा झाला पाहिजे; स्त्रियांची उन्नति करण्याबद्दल रात्रंदिवस झटलें पाहिजे. "

'सुधारका'पासून त्यांना पैशाचा लाभ कधींच झाला नाहीं. होळकर सरकारनें देऊं केलेली पांचशें रुपयांची नोकरी नाकारणाऱ्या त्यांच्यासारख्या मनुष्याला त्याची अपेक्षाहि नव्हती. त्यांचा देव आकाशांत, देवालयांत अगर घरच्या देव्हाऱ्यांत नव्हता, तो महाराष्ट्रांतल्या प्रत्येक दुर्दैवी मनुष्यांत त्यांना दिसत होता. लक्षावधि माणसांच्या हृदयांतील देव समाजाच्या उपेक्षे-मुळें, जुलमामुळें व आंधळेपणामुळें धाईधाई रडत होता. या अगणित अनाथांच्या हृदयमंदिरांतील ईश्वराची पूजा स्वतःचा जीव त्याच्यावरून ओंवाळून आगरकरांनीं केली. तेजस्वी लेखक, स्वार्थत्यागी समाज-सेवक, सत्याचा निस्सीम उपासक आणि समाजाला विचारस्वातंत्र्याचा दिव्य मंत्र सांगणारा महर्षी या सर्व नात्यांनीं त्यांची महाराष्ट्राला चिरकाल आठवण राहील. अशा थोर पुरुषाच्या चरित्राचें पुष्प कीर्तिदेवतेला बुद्ध, ल्यूथर, ज्ञानेश्वर, तुकाराम इत्यादिकांच्या मालिकेंतच गुंफावें लागेल यांत शंका नाहीं.

वि. स. खांडेकर

अभ्यास

प्रसिद्ध समाजसुधारक व तडफदार लेखक **आगरकर** यांचा हा चिमुकला परिचय **श्री. खांडेकर** यांनीं मुद्दाम या पुस्तकमालेसाठीं लिहिला आहे. खांडेकरांनीं या चरित्रात्मक निबंधाला सुरुवात कशी मजेदार केली आहे पाहा. आगरकरांच्या चरित्राचें रहस्य ज्यांत व्यक्त झालें आहे अशा त्यांच्या एका पत्राच्या उताऱ्यानें त्यांनीं लेखारंभ केला आहे. **खांडेकरांच्या** या लेखांत त्यांचें भाषाप्रभुत्व, शब्दचमत्कृति करण्याची त्यांची

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

हौस, सुंदर सुंदर कल्पना या तर व्यक्त होतातच, पण त्यांबरोबरच त्यांच्या मनाची तळमळ व आगरकरांच्या कार्याविषयीं त्यांना वाटणारा जिव्हाळाहि या लेखांत स्पष्ट दिसतो.

१. या लेखांतील चमत्कृतिमय कल्पना असलेलीं कांहीं स्थळें निवडा.

२. शब्दचमत्कृतीचीं कांहीं उदाहरणें शोधा.

३. अधोरेखित व नागमोडी खुणा केलेल्या वाक्यांचे अर्थ द्या.

४. आगरकर देव मानीत नव्हते. मग त्यांनीं आयुष्यभर कोणाची भक्ति व सेवा केली ? देव मानीत नसून त्यांना देवमाणूस कां म्हटलें ?

५. हा लेख नीट वाचून आगरकरांचे गुण निवडा व महत्त्वाच्या दृष्टीनें त्यांचा अनुक्रम साधा.

२१

निज नीज माझ्या बाळा

बा नीज गडे नीज गडे लडिवाळा !
निज नीज माझ्या बाळा ॥ ध्रु० ॥
रवि गेला रे सोडुनि आकाशाला,
धन जैसें दुर्भाग्याला.
अंधार वसे चोहिंकडे गगनांत,
गरिबाच्या जेंवि मनांत.
बघ थकुनि कसा निजला हा इहलोक
मम आशा जेंवि अनेक.
खडबड हे उंदिर करिती,
कण शोधायातें फिरती,
परि अंतीं निराश होती,

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

लवकरि हेही सोडितील सदनाला,
गणगोत जसें आपणाला. १

बहु दिवसांच्या जुन्या कुडाच्या भिंती,
कुजुनी त्यां भोंकें पडती.
त्यांमधुनी त्या दाखविती जगताला
दारिद्र्य आपुलें बाळा.
हें कळकीचें जीर्ण मोडकें दार
कर कर कर वाजे फार;
हें दुःखानें कण्हुनी कथी लोकांला
दारिद्र्य आपुलें बाळा.
वाहतो फटींतुनि वारा;
सुकवीतो अश्रूधारा;
तुज नीज म्हणे सुकुमारा !
हा सूर धरी माझ्या या गीताला
निज नीज माझ्या बाळा ! २

जोंवरतीं हें जीर्ण झोंपडें आपुलें
दैवानें नाहीं पडलें.
तोंवरतीं तूं झोंप घेत जा बाळा;
काळजी पुढें देवाला !
जोंवरतीं या कुडींत राहिल प्राण,
तोंवरि तुज संगोपीन;
तदनंतरची करूं नको तूं चिंता;
नारायण तुजला त्राता.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

दारिद्र्या चोरिल कोण ?
आकाशा पाडिल कोण ?
दिग्वसना फाडिल कोण ?
त्रैलोक्यपती आतां त्राता तुजला,
निज नीज माझ्या बाळा !
तुज जन्म दिला सार्थक नाहीं केलें,
तुज कांहि न मी ठेवीलें.
तुज कोणी नसे छाया तुज आकाश;
धन दारिद्र्याची रास;
या दाहि दिशा वस्त्र तुला सुकुमारा;
गृह निर्जन रानीं थारा;
तुज ज्ञान नसे अज्ञानाविण कांहीं;
भिक्षेविण धंदा नाहीं.
तरि सोडुं नको सत्याला,
धन अक्षय तेंच जिवाला;
भावें भज दीनदयाळा;
मग रक्षिल तो करुणागर तुजला.
निज नीज माझ्या बाळा ! ४

दत्त

परिचय

ही अत्यंत हृदयद्रावक कविता कवि दत्तांची आहे. आई या विषयावर आणखीहि कांहीं कविता आहेत, पण त्यांना दत्तांच्या या कवितेची सर येणार नाहीं. आईच्या तोंडीं अलंकारिक भाषा, अवघड कल्पना, वगैरे घालून त्या कविता अस्वाभाविक केल्या आहेत. उलट ही कविता पाहा. भाषा किती साधी व स्वाभाविक आहे. कविता ऐकतांना आपल्याला खरोखरीची आईच बोलत

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

आहे असें वाटतें. आईच्या निमित्तानें कवि आपलें पांडित्य दाखवीत आहे असें कधीं वाटत नाहीं. उपमाहि किती सहज व सुंदर आहेत. घरांतले उंदीरहि आतां खाण्यास कांहीं नाहीं, म्हणून निघून चालले, कोणासारखे ? तर-आपल्या गणगोतासारखे. किती स्वाभाविक उपमा !

आई गरीब आहे. पण तिची देवावर निस्सीम भक्ति व विश्वास आहे. शेवटीं ती "देवाला भज व सत्याला सोडूं नको" एवढाच स्वाभाविक उपदेश करिते, कल्पनेच्या भराऱ्या मारीत नाहीं.

तुम्हांला या कवितेंतील विशेष कोणत्या कल्पना आवडल्या ? ध्रुवपद कसें आहे ? 'निज नीज' मधील दुसऱ्या 'नी'त प्लुत स्वर असून त्याच्या तीन मात्रा आहेत. शिक्षक तुम्हांला हें समजावून सांगतील.

२२

सवदा अंगावर आला !

आमच्या गोष्टीचे दिवस आजकालचे नव्हत. शेंकडों, हजारों वर्षांपूर्वीं, जेव्हां पृथ्वीवर एखादा दुःखी प्राणी आहे कीं काय, म्हणून पाहाण्यास आपल्या नंदीवर बसून भवानी-शंकराची स्वारी पृथ्वीतलावर मुद्दाम येत असे, आणि त्या दुर्दैवी प्राण्याचें दुःख नाहींसें करून त्याला सुखसागरांत पोहूं लावीत असे, त्या काळाची ही गोष्ट आहे. हल्लींचें कंटकमय जग दुःखानें इतकें भरलेलें आहे, कीं शंकर-पार्वतीला पहिल्याप्रमाणें सहल करण्याची इच्छा झाली, तर आतां त्यांना सुखी प्राण्याच्याच शोधार्थ निघावें लागेल ! परंतु सुखी प्राण्याची गांठ घेऊन शंकर-पार्वतीला काय करावयाचें आहे ? अलीकडे याच कारणामुळें-अथवा इतर अनेक कारणांबरोबरच्या या एका कारणामुळें—नंदीवर बसून पृथ्वीवर संचार करण्याचा उमामहेश्वरांचा परिपाठ बंद झाला असावा, असें वाटतें. असो.

वर सांगितलेल्या पुरातन काळीं उज्जयिनी नगरांत भगवान् 'महाकालेश्वर'

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

नांवानें प्रसिद्ध असलेल्या देवालयांत एक अत्यंत सालस, वृद्ध, आंधळा, पण समाधानी ब्राह्मण, देवळाच्या महाद्वाराजवळ एक धोतर पुढें पसरून सकाळपासून प्रहरघटका रात्रीपर्यंत बसून राहत असे. त्या बिचाऱ्याला एक बायको आणि चार लहानलहान अपत्यें होतीं. त्या सर्वांचा चरितार्थ या आंधळ्यापुढें आलेल्या भिक्षेवर होणें शक्यच नव्हतें. त्याच्या बायकोला लोकांचीं चार कामें करून संसाराचा गाडा ढकलण्यास मदत करावी लागे. भटजींचे दोन मुलगे मुंजीस मोठे झाले होते. त्यांच्या मुंजी कशातरी एकदां झाल्या म्हणजे दोघांनाहि माधुकरी मागण्यास मोकळीक होईल म्हणून भटजींना आणि त्यांच्या पत्नीला मोठी आतुरता उत्पन्न झाली होती. एक मुलगी आठ वर्षांची अर्थात् ‘ उपवर ’ झाली होती. तिला एकदां कशीतरी उजवून टाकली, म्हणजे संसाराचा भार बराच हलका होऊन आपले उरलेले दिवस सुखांत जातील, असें या नवराबायकोच्या मनांत वारंवार येई, आणि तसें तीं बोलूनहि दाखवीत. सारांश, मुलांच्या मुंजी होणें आणि मुलीचें लग्न होणें म्हणजे आपला भाग्योदय होणें असेंच त्यांना वाटत होतें. या भाग्योदयाची वाट ईश्वरावर निष्ठा ठेवून तें कुटुंब पाहात होतें.

या दृढनिष्ठेमुळेंच त्यांच्या हल्लींच्या बिकट आणि खडतर संसाराचा भार त्यांना हलका झालासा मधूनमधून वाटत असे. नाहींतर कोण त्यांची ती दशा ! भाकर आहे तर कालवण नाहीं, अंथरूण आहे तर पांघरूण नाहीं ! आज भटजींचा पंचा फाटला, उद्यां मुलाचें आंगडें फाटलें, परवां घरभाड्याचें सहा महिन्यांचें थकलेलें भाडें द्यावयाचें, घरांतील भांडींकुंडीं फुटलीं, उसने आणलेले पैसे मागण्यास साळुबाई आल्या,—अशा अनेक मागण्यांनीं त्यांना जीव नकोसा होऊन जाई. अशा नाना प्रकारच्या इंगळ्यांनीं भटजींच्या बायकोस यातना होऊं लागल्या म्हणजे त्या बिचारीनें

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

देवळांत जाऊन आपल्या पतीला आपल्या सर्व दुःखांची कहाणी सांगावी, आणि त्यानें समाधानाचे चार शब्द बोलून कशीबशी तिची समजूत करावी असा क्रम बरेच दिवस चालला होता.

भटजींना घरीं न्यावयास त्यांची बायको दिवेलागणीच्या वेळीं दररोज देवळांत यावयाची. तिला कांहीं कारणानें बनलें नाहीं, तर मुलगी किंवा मुलें यावयाचीं, असा नित्य क्रम असे. पण एके दिवशीं प्रहर रात्र उलटून जाण्याची वेळ आली, तरी घरून कोणी आलें नाहीं. म्हणून भटजी चिंतेंत पडले. त्यांच्या मनांत नानाप्रकारच्या भयंकर कल्पना येऊं लागल्या, आणि त्यांची परमेश्वरावरील अचल निष्ठाहि किंचित् डळमळूं लागली. परंतु यानंतर थोड्याच वेळांत भटजींची बायको स्फुंदतस्फुंदत त्यांच्याजवळ आली आणि तिनें मोठ्या दुःखानें घरची दैना वर्णन करण्यास सुरुवात केली. ती म्हणाली, "आज घरच्या मालकानं शिपाई पाठवून आपली चीजवस्त घराबाहेर फेंकून देऊन घरास कुलुप लाविलं. पाऊस धुवांधार चाललेला, निवाऱ्याची कुठंहि जागा नाहीं; रस्त्यावर डाळ, पीठ, धान्य, सांडून खराबी झाली. तिन्हीसांजेच्या वेळीं लोकांच्या घरीं कुठं जाऊं म्हणून विचार पडला; अखेरीस दादाबाबा करून घरवाल्याची रात्रभर राहण्याची परवानगी कशीतरी मिळविली; उद्यां संध्याकाळच्या आंत दुसरं बिऱ्हाड पाहून हें खालीं करून दिलं पाहिजे, किंवा त्याचं थकलेलं भाडं तरी चुकतं केलं पाहिजे."

हा वृत्तांत ऐकून भटजींनाहि रडें कोसळल्यावांचून राहिलें नाहीं. मी वृद्ध, आंधळा, मला कोणाचा आधार नाहीं, हा विचार आजपर्यंत त्यांच्या मनांत असंख्य वेळां आला असेल; परंतु त्याचें शल्य भटजींच्या अंतःकरणास आजपर्यंत इतकें बोंचले नव्हतें. दारिद्र्याच्या विषाराचा

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

झटका आजच्यासारखा त्यांना कधींहि झोंबला नव्हता. आज त्यांचा नाईलाज झाला. त्यांची ती समाधानवृत्ति आज त्यांना सोडून गेली, आणि परमेश्वरावरील त्यांची निष्ठा बहुतेक नाहींशी झाली. पत्नीबरोबर तेहि स्फुंदस्फुंदून रडूं लागले !

या कुटुंबाचा हा करुण विलाप ऐकण्यास देवळांत फारसें कोणी नव्हतें आणि देवाच्या सभामंडपापासून तीं नवराबायको मुद्दाम अंमळ एकीकडे गेलीं असल्यामुळें त्यांच्याकडे विशेष कोणाचें लक्षहि गेलें नाहीं. मात्र एक श्रीमान् मारवाडी गृहस्थ आपल्या उजव्या हातानें डाव्या हातांतील सलकडीं, मधूनमधून गळ्यांतील कंठी, व कानांतील भिकबाळी चांचपीत, कशाचा तरी विचार करीत, आणि या कुटुंबाकडे दुरून पाहात, सभामंडपाच्या एका कठड्यावर बसला होता. त्याला भटजींचें आणि त्यांच्या पत्नीचें बोलणें ऐकूं येत नव्हतें; तथापि तीं नवराबायको कशाबद्दल बोलत असतील, याची कल्पना त्याला बरोबर करतां आली. किंबहुना त्यांच्या दुःखास आपणच कारण आहों, त्यांना आज घरांतून बाहेर काढ, असा हुकूम आज सायंकाळींच आपल्या तगादेदाराला आपण दिला, अशी त्याला आठवण झाली; पण आपण केलें यांत कांहीं वाईट केलें, असें त्याला आतांहि वाटलें नाहीं. उलट, हें ढोंगी कुटुंब आज घराबाहेर काढलें असतें, तर उद्यांपासून त्या घराचें भाडें तरी निर्वेध मिळूं लागेल, आणि आपल्या मागची एक ब्याद कायमची नाहींशी होईल, असेंच त्याला वाटलें. या विचारानें त्याच्या तोंडावर किंचित् हास्य चमकूं लागलें ! भटजींची आणि त्यांच्या कुटुंबाची दैना पाहून त्याच्या चित्ताला लवमात्र द्रव आला नाहीं. उलट, त्यांच्यावर रागावून त्यानें आपलें अंतःकरण अधिक निष्ठुर करून ठेविलें, आणि तो तसाच हंसत त्यांकडे पाहात कठड्यावर बसून राहिला.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

त्या दरिद्री, वृद्ध आणि आंधळ्या ब्राह्मणाचा विलाप देवालयाच्या गाभाऱ्यांत शंकरपार्वतीला मात्र उत्तम प्रकारें ऐकूं जात होता, किंवा त्यांना दुसऱ्या एकाद्या प्रकारें तो समजत होता हें खास ! कारण, त्या वृद्ध ब्राह्मणाला अनुलक्षून कांहीं संभाषण गाभाऱ्यांत चालू आहे, असा भास या लक्ष्मी-पुत्राला प्रथम चांगलाच झाला. थोड्या वेळानें हें संभाषण त्याला स्पष्टपणें ऐकूं येऊं लागलें. त्याला वाटलें, कीं कोमल मधुर आलापानें एक स्त्री कोणाला तरी कांहीं प्रश्न करीत आहे, आणि तिला स्निग्ध-गंभीर आवाजानें तो पुरुष उत्तर देत आहे.

" आपण म्हणयचं, तो सच्छील, निष्ठावंत आणि सत्पात्र ब्राह्मण आहे आणि त्यावर आज मोठाच विपरीत प्रसंग गुदरला आहे; मग त्याचं संकट निवारण करायचं कां मनावर घ्यायचं होत नाहीं ? "

" अग, हें त्याचें भोक्तृत्व आहे. तें भोगल्यावांचून बिचाऱ्याची सुटका होणार नाहीं; पण याहि संकटांतून तो अखेरीस मुक्त होईल. सदा सुखी कोणी नाहीं तसाच सदा दुःखीहि कोणी नाहीं. योग्य वेळीं त्याचें दारिद्र्य जाईल आणि मग आजच्या प्रसंगाचा त्याला विषाद वाटणार नाहीं. "

" योग्य वेळीं ? अजून योग्य वेळ यायचीच आहे वाटतं ? तें कांहीं नाहीं. या ब्राह्मणाला आज, फार तर उद्यां, पुष्कळ संपत्ति मिळून हा सुखी झाला पाहिजे. उद्यां तो लक्षाधीश झाला पाहिजे, तरच माझ्या बोलण्याला इकडून मान दायला झाला, असं मी म्हणेन. नाहींतर—"

" अग ! उतावीळपणानें कामें होत नाहींत आणि संपत्तीनें सुख मिळतें, व दारिद्र्यानें दुःख होतें, हेंहि खरें नाहीं. हा ब्राह्मण उद्यां दुःख-मुक्त होईल, इतकें आश्वासन तुला तूर्त पुरे आहे ! "

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

" नाहीं, माझी आपली वेडी समजूत असं कां म्हणाना ! माझं म्हणणं असं कीं, त्याला एक लाख रुपये उद्यांच्या उद्यां मिळाले पाहिजेत. मग सुखी व्हावं, कीं दुःखी व्हावं हें आपलं त्याचा तो पाहील ! "

" बरें तर, तुझी मर्जी ! गणपती ! (गाभाऱ्याबाहेर गजाननाची मूर्ति होती, तेथून 'आज्ञा' असा आवाज आला.) उद्यां त्या आंधळ्या ब्राह्मणाला एक लाख रुपये मिळतील अशी तजवीज कर ! "

गणपतीच्या बाजूनें 'आज्ञा' असा पुनः आवाज आला.

हा सर्व प्रकार ऐकून त्या लक्ष्मीपुत्राला मोठा अचंबा वाटला " काय ? या भिकारड्या भटजीला उद्यां एक लाख रुपये मिळणार ! होय, प्रत्यक्ष देवानें मनांत आणिल्यावर कां नाहीं मिळायचे ? पण ही गुप्त गोष्ट मला कळली असून तिच्यापासून मी जर आपला फायदा कांहींच करून घेतला नाहीं, तर मी व्यापारी बच्चा कसा ? या सवद्यांत आपणहि आपला चांगलाच फायदा करून घेतला पाहिजे." असा विचार करून हा मारवाडी देवदर्शन करून घरीं गेला, त्यानें घाईनें भोजन उरकलें, व ताबडतोब त्या आंधळ्या वृद्ध भटजींच्या बिऱ्हाडीं स्वारी एकटीच निघाली. त्याला पाहातांच भटजींच्या कुटुंबाची आणि भटजींची तारांबळच उडाली, पण शेटजींनीं उदार अंतःकरणानें आपण होऊनच त्यांची चिंता दूर केली.

" छे, छे ! हें काय भलतेंच ? हे शिपाई महामूर्ख असतात ! अहो, भाडें थकलें तर थकलें; त्यावांचून काय आमची चूल अडली होती ? नाहीं भटजी, तुम्ही आपले वाटेल तितके दिवस या बिऱ्हाडांत राहा. तुम्ही मागचें भाडें देऊं नका, आणि पुढेंहि तुम्ही जितके दिवस राहाल, त्याचेंहि भाडें तुम्ही देऊं नका. झालें ? अहो, पैसा मिळून जातो, त्याचें काय ? पण स्नेह मिळत नाहीं ! "

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

याप्रमाणें शेटजींनीं त्या उभयतांवर खूप साखर पेरली. त्या ब्राह्मणाला त्यामुळें समाधान वाटलें, आणि देवाची आपणावरील कृपा आजच सरली नाहीं असें मनांत येऊन त्याची निष्ठा पुनः जागृत झाली.

शेटजींनीं पुनः मोठ्या कळवळ्यानें "तुमचें कसें काय चाललें आहे." असा प्रश्न विचारिला व ब्राह्मणानें आपली साधी हकीकत आढेवेढे न घेतां थोडक्यांत त्यांना सांगितली. अखेरीस शेटजी म्हणाले, "भटजीमहाराज! तुमची हकीकत ऐकून मला तुमची फार कींव येते. तुम्हांला कांहींतरी मिळकत करून द्यावी, असें माझ्या मनांत फार येतें. पण मी पडलों व्यापारी बच्चा! मला व्यापारांत बूड आली तर त्याचें काहीं वाटत नाहीं, पण हातानें धर्म केला तर वाईट वाटतें. यासाठीं मी तुम्हांला एक फायद्याची युक्ति सांगतों ती ऐका. तुम्हांला आजपर्यंत एका रुपयावर कधीं कांहीं एका दिवसांत मिळालें नाहींना?—मी तुम्हांला तुमच्या उद्यांच्या मिळकतीबद्दल दहा रुपये देतों. ते आज घ्या, आणि उद्यां सकाळपासून मध्यरात्रीपर्यंत तुम्हांला जें कांहीं मिळेल, तें बिनतक्रार जसेंच्या तसेंच माझ्या हवालीं करा. त्याचा मालक मी—तुम्ही नाहीं. आतां झालें? काढूं दहा रुपये?"

भटजींना वास्तविक ही गोष्ट तेव्हांच मान्य व्हावी, परंतु या वृद्ध आणि अंध भटजींनाहि एक प्रकारचा ताठा होता. त्यांची देवावरील श्रद्धा शेटजींच्याच गोड भाषणांनीं आणि घरभाड्याच्या बिकट संकटांतून बाहेर निघाल्यानें द्विगुणित झाली होती. ते म्हणाले, "शेटजी, तुम्ही घर-भाड्याची आम्हांला सूट घातली, आणि पुढेंहि भाडें देण्याची गरज नाहीं म्हणून सांगितलें, यानेंच आम्हांवर तुमचे पराकाष्ठेचे उपकार झाले आहेत. आतां आम्हांसाठीं तुम्ही आपलें अधिक नुकसान करून घेऊं नये. माझी मिळकत काय असते, हें माझें मला चांगलें ठाऊक आहे. त्यामुळें तुम-

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

च्याशीं असा करार करायला मला लाज वाटते. तुम्हांला कांहीं धर्म करायचा असला, तर समाधानानें मला कांहीं उचलून द्या. तें मी घेईन. पण मी दरिद्री असलों, आणि उभ्या जन्मांत मला एकदम दहा रुपये दिसले नसले, तरी दहा रुपयांना मी आपलें एका दिवसाचें देखील नशीब विकणार नाहीं ! तसें करणें हें देवावर अविश्वास दाखविण्यासारखें आहे. माझी पामराची देवाला करुणा आली असली, तर तो दहाच काय, पण दहा हजार रुपये माझ्या घरीं उद्यां पावते करील ! बरें, त्याची मर्जी नसली तर मला तुमचे दहा रुपये किती व कसे पुरणार आहेत ? अहो आकाश फाटलें तर त्याला ठिगळें कोण किती लावणार ? ”

भटजींच्या या भाषणानें शेटजी तर बुचकळ्यांतच पडले. परंतु कांहीं विचार मनांत आणून ते ब्राह्मणाला म्हणाले, “ ठीक आहे, तुमच्याशीं सवदा ठरवावा म्हणून मी घरांतून बाहेर पडलों, त्यांत आतां हार खाणें हा मला बट्टा आहे. तुम्हीं दहा हजार म्हणतांना ? ठरलें तर आपलें ? मी तुम्हांला उद्यां सकाळीं दहा हजार रुपये देतों. तुम्हीं आपला पंचा घेऊन देवळांत नित्याप्रमाणें जावें, आणि उद्यां तेथें जें कांहीं तुम्हांला मिळेल तें मला द्यावें. ”

शेटजी आपली थट्टा करीत आहेत, असें भटजींना प्रथम वाटलें; परंतु ही थट्टा नव्हे, असें त्यांनीं वारंवार सांगितल्यावर भटजी म्हणाले, “ एकदां नशीब विकीत नाहीं म्हणून म्हटलें, मग दहा काय आणि दहा हजार काय ? नका माझा अंत पाहूं—मी नाहीं विकीत आपलें नशीब ! ”

शेटजींनीं कपाळावर हात मारून घेतला. कांहीं वेळानें त्या ब्राह्मणाची आणि त्याच्या बायकोची समजूत करण्याच्या उद्देशानें ते म्हणाले, ‘ तुम्हांला स्वतःला पैशाची गरज नसली तरी तुम्हांला देवानें चार सोन्यासारखीं

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

लेंकरें दिलीं आहेत, त्यांच्यासाठीं तरी दूरवर विचार करून बोलायचें तें बोला. घ्या, वीस हजार घ्या, चला आटोपा—आतां मात्र नाहीं म्हणून तुम्ही उद्यां पस्तावाल. हो, उद्यांची वेळ गेली,—नाहीं, ही बैठक मोडली, तर पुनः तुम्हांला मी दहा पैसे देखील देणार नाहीं; आतां वीस हजार देतों आहें, ते घ्या आणि त्यांत काय तें उमजा !"

परंतु तो ब्राह्मण शेटजींच्या या मागणीलाहि बधला नाहीं ! अखेरीस शेटजींनीं आपली रक्कम पाऊणलाख रुपयांपर्यंत चढविली. त्यावेळीं देखील भटजी मुखस्तंभ बसले. परंतु त्यांची बायको शेटजींना म्हणाली, "शेटजी, त्यांना काय, ते बैरागी होऊन निःसंग बनले आहेत. पण मला संसाराची काळजी आहे ना ? मी तुमचा सवदा कबूल करितें. तुम्हीं उद्यां पाऊण-लाख रुपये द्यावे, आणि उद्यां धोतरावर जें येईल तें सर्व आम्हीं तुम्हांस द्यावें. ठरला सवदा हा ?"

"हो उद्यां सकाळीं सूर्योदयाच्या आधीं पाऊणलाख रुपयांचे तोडे तुमच्या घरीं आणून लावीन; मग तर झालें ? भटजींनीं नित्याप्रमाणें उद्यां देवळांत जावें आणि त्यांची सर्व मिळकत तुम्ही मला द्यावी."

शेटजींनींहि स्वतः देवळांत येऊन भटजींजवळ बसावें, अशी सूचना भटीणबाईनीं केली, आणि आपल्या नवऱ्याला त्यांनीं कांहीं बोलूं न देतां शेटजींची अखेर रवानगी केली.

शेटजी निघून गेल्यावर भटजींनीं आपल्या बायकोला पुष्कळ दोष दिला. "शेटजी आपली थट्टा करीत होते. तूं असें हपापल्यासारखें भलतेंच कबूल करून आपलें हंसें मात्र करून घेतलेंस," असें म्हणून त्यांनीं आपल्या बायकोचा सडकून निषेध केला. आपल्या हातून खरोखरच अपराध घडला असें वाटून ती बिचारी माउलीहि फार कष्टी झाली.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

दुसरे दिवशीं उजाडलें नाहीं तोंच शेटजी आपणाबरोबर रोकड घेऊन आले. बैलाच्या छकड्यांतून थैल्यांमागें थैल्या घेऊन शेटजींचे नोकर ब्राह्मणाच्या बिऱ्हाडीं शिरले आणि त्यांनीं भिंतीशीं त्या थैल्या रचून ठेविल्या. तेव्हां मात्र भटजींचा आणि त्यांच्या सर्व कुटुंबाचा आनंद गगनांत मावेनासा झाला ! त्या सर्व कुटुंबानें थैल्यांचे बंद भराभर सोडून, त्या सर्व रुपयांनीं भरल्या आहेत अशी खात्री करून घेतल्यावर, भटजी म्हणाले, "शेटजी ! आम्ही हे रुपये आतां मोजीत बसत नाहीं. ते वीस हजार असोत, कीं पाऊणलाख असोत, मी ते घेतों—आनंदानें घेतों. तुम्ही खरोखरच मोठे उदार कर्ण आहां. काल मीं तुम्हांला झिडकारिलें, त्याचा राग मानूं नका हो ! मी आजच काय, पण तुम्हांला वाटेल तर महिनाभर फडकें पसरून बसतों, आणि मजपुढें काय येईल तें खुशाल तुम्ही घ्या !"

झालें, सूर्योदयाबरोबर भटजी आपला पंचा घेऊन, आणि बरोबर आपल्या मुलीला घेऊन, देवळांत गेले. शेटजीहि त्यांच्या मागोमाग निघाले. भटजींनीं देवदर्शन करून नित्याप्रमाणें दरवाजाशीं आपलें फडकें पसरलें, आणि आल्यागेल्यापाशीं 'आंधळ्याला धर्म !' मागावयाला मोठ्या निकरानें प्रारंभ केला.

तो दिवस कांहीं पर्वणीचा नव्हता. नित्यदर्शनाला येणारे लोक मात्र सकाळीं देवदर्शनाला येत होते. त्यांनीं त्या ब्राह्मणाला जातां येतां पै पैसा टाकला. थोडेबहुत तांदूळहि त्यांच्या धोतरावर जमले. शेंगा, बोरें, पेरू, एकादें केळें, त्यांच्यापुढें कोणीं टाकिलें.

दोन प्रहर लोटला, पण पुरते दोन आण्यांचे पैसेहि त्यांच्यापुढें जमले नाहींत ! दोन प्रहरीं घरीं न जातां तसेंच बसून राहण्याचा भटजींनीं बेत केला. शेटजींनाहि तो मान्य झाला. तिसरा प्रहर उलटला, संध्याकाळ

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

झाली, पण शेरभर तांदूळ, कांहीं फळफळावळ आणि सुमारें तीन आण्यांचा खुर्दा, इतकीच कायती तोंपर्यंत ब्राह्मणाला मिळकत झाली! दिवेलागणी होतांच या मिळकतीचें गांठोडें बांधून ब्राह्मणानें शेटजींच्या हवालीं केलें!

शेटजीच्या तोंडचें पाणीच पळालें! तो डोकें हापटून घेऊन आपले केस तोडूं लागला आणि अंगावरील कपड्याच्या चिंध्या करूं लागला! अखेरीस त्याच्या मनांत एक कल्पना आली, तीमुळें घटकाभर त्यानें आपलें मन आंवरून धरिलें. तो भटजींना अंमळ दरडावून म्हणाला, "भटजी, आजचा दिवस मध्यरात्रीपर्यंत संपत नाहीं. तोंपर्यंत तुम्ही असेंच येथें बसलें पाहिजे. मध्यरात्र झाल्यावर तुम्ही पाहिजे तर घरीं जा, पण तोंपर्यंत मी तुम्हांला येथून हालूं देणार नाहीं."

मध्यरात्रीपर्यंत बसावयाला भटजी मोठ्या आनंदानें कबूल झाले. देवळांतील गर्दी मोडल्यावर शेटजी गणपतीपुढें गेले व त्यांनीं हात जोडून अनन्यभावानें त्याची प्रार्थना केली. ते म्हणाले, "ब्राह्मणाला आज एक लाख रुपये मिळवून देण्याबद्दल काल, हे देवा! तुला शंकराची आज्ञा झाली होती, आणि 'देतों' म्हणून तूंहि त्यांना वचन दिलें होतेंस, तें मीं आपल्या कानांनीं ऐकिलें, आणि तें ऐकूनच मीं हा हिय्या केला. आतां दिवे लागले, तरी ब्राह्मणाला तुझ्या कबुलायतीप्रमाणें कांहींच प्राप्ति झाली नाहीं, हें काय? प्रभो! त्या ब्राह्मणाला आतां तरी लवकरच एक लाख रुपये मिळवून दे! मध्यरात्र व्हायला आतां अवकाश नाहीं."

ही प्रार्थना शेटजींनीं अगदीं परोपकारबुद्धीनें केली, आणि ती फलद्रूप झाली तर शेटजींचा त्यांत कांहीं फायदा नाहीं, असें एकाद्या अनोळखी मनुष्याला वाटलें असतें! त्याप्रमाणेंच गणपतीलाहि वाटावें, असा शेटजींचा हेतु होता. अनेक वर्षांच्या व्यासंगानें त्यांना दुवाजवी बोलणें, छपवाछपवी

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

करणें, या कला चांगल्याच अवगत झाल्या होत्या; परंतु शेटजींनीं ब्राह्मणाशीं केलेला व्यवहार गणपतीला माहीत नव्हता असें थोडेंच आहे !

शेटजींनीं प्रार्थना आटोपून गणपतीच्या विशाळ उदराच्या नाभिप्रांताला स्पर्श केला; इतक्यांत काय झालें कोणास ठाऊक ! बिचाऱ्या शेटजींना कांहीं समजलें नाहीं, पण त्यांचे हात मात्र गणपतीच्या सोंडेंत घट्ट आंवळून धरिल्याप्रमाणें जे अडकले, ते कांहीं केल्या निघेनात, आणि त्यांना रगहि अतोनात लागली !

इतक्यांत दुसरा एक चमत्कार झाला. आदल्या दिवशीं सायंकाळीं शेटजींनीं ऐकिला होता, तोच गंभीर ध्वनि आतां त्यांना पुनः एकवार ऐकूं आला ! "गणपति ! त्या ब्राह्मणाला एक लाख रुपये पोहोंचते केलेस ?"

गजाननानें बसल्या जागींच उत्तर दिलें, "देवाधिदेवा ! पाऊणलाखाची तजवीज सकाळींच केली; बाकीच्या रकमेसाठीं हात धरून ठेविले आहेत !"

हें भाषण ऐकून शेटजींची जी त्रेधा उडाली, ती त्यांची त्यांनाच ठाऊक ! त्यांच्या हृदयांत चमकन् चमक निघाली, सर्वांगास घाम सुटला, आणि डोळ्यांपुढें काजवे चमकूं लागले !

"अरे, हें काय ?" असें ते एकदम ओरडले आणि आपले हात सोडवून घेऊं लागले; पण ते जास्तच जोरानें आंवळले गेले !

शेवटीं गजाननमहाराज त्यांच्याशीं प्रत्यक्ष बोलूं लागले : "अरे मूढा ! देवळांत आलास आणि प्रत्यक्ष पार्वतीपरमेश्वरांचें संभाषण ऐकिलेंस, तरी तुझा स्वार्थ तुला सोडीना ना ? त्या भाषणाचे, तुझ्या देवांच्या भाषणाचे देखील टक्के करावयाला पाहूं लागलास ! तेव्हां आतां भोग त्याचें फळ ! बाबा, देव कोणाला स्वतःचें देत नाहीं, आणि कोणाचें घेतहि नाहीं ! एकाचें काढावें आणि दुसऱ्याला द्यावें, हा देवाचा सनातन संप्रदाय आहे, हें तुला

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

आपल्या दुकानदारींत आजपर्यंत कसें कळलें नाहीं ? तुझे नोकर देवळांत आले आहेत, त्यांना मोठ्यानें हांक मार, आणि ब्राह्मणाच्या घरीं उरलेले पंचवीस हजार रुपये आतांच्या आतां पोहोंचते करा, म्हणून सांग. मीं तुझे हात धरिले आहेत, हें त्यांना सांगशील तर खबरदार ! रक्कम पटली, कीं तुझे हात सुटतील !"

शेटजी भीतीनें गर्भगळीत झाले ! तथापि गणपतीस मोदकांची लाळूच दाखवून हात काढून घ्यावा असें त्यावेळींहि त्यांच्या मनांत आल्यावांचून राहिलें नाहीं ! 'सव्वामण गूळ खोबरें,' ! 'सव्वामणाचे मोदक,' 'एकवीस लाख दुर्वा !' वगैरे अस्पष्ट नवसाचे शब्द त्यांच्या तोंडांत घुटमळूं लागले होते; पण त्यानें इष्ट परिणाम न होतां त्यांचा हात अधिकच आंवळत गेला. त्यांवरून वरिष्ठांच्या देखत लांचलुचपतीची गोष्ट काढणें हें गण-पतीला देखील रुचत नाहीं, हें त्यांनीं ताडिलें. अखेरीस निरुपाय होऊन त्यांनीं ब्राह्मणाला आणखी पंचवीस हजार रुपये पावते करण्यास व त्याचा तो पंचा आपल्या घरीं घेऊन जाण्यास आपल्या नोकरांना सांगितलें.

रुपये पटतांच शेटजींचा हात सुटला, व तो दरिद्री वृद्ध ब्राह्मण चार प्रहरांत लक्षाधीश बनला ! पुढें शंकरपार्वतीच्या कृपाप्रसादानें त्याला दृष्टि आली, त्याचीं मुलें सद्गुणी आणि आज्ञाधारक निघालीं, त्याच्या मुलीलाहि चांगलें स्थळ मिळालें, वगैरे तपशील सांगण्याची गरज नाहीं. देव कृपा करूं लागला म्हणजे अर्धेमुर्धे सोडीत नाहीं, हें सर्वांस माहीत आहेच.

विनीत

परिचय

ही गोष्ट कोणत्या धाटणीची आहे ? हिची उभारणी एकाच प्रसंगावर केलेली आहे; परंतु लेखकाचा हेतु आंधळ्या ब्राह्मणाची किंवा शेटजींची मनःस्थिति दाखविण्याचा नसून तो गोष्ट सांगण्यांत रंगून गेला आहे;

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

कथानकाला महत्त्व असलें म्हणजे सगळे धागेदोरे सांभाळावे लागतात. म्हणून वास्तविक शेटजींची फजिती झाली तरी गोष्ट संपली नाहीं, लेखक तुम्हांला आंधळ्याला डोळे आले, त्याचीं मुलें चांगलीं निघालीं, मुलीला चांगलें स्थळ मिळालें, सगळ्यांचें काय झालें तें सांगून मग रजा घेतो. शेवटीं शेवटीं तर आपल्याला असें वाटूं लागतें कीं मग त्यांनीं जसें राज्य केलें तसें तुम्ही करा, झाली आमची गोष्ट असें जातां जातां लेखक म्हणतो कीं काय ? सारांश ही गोष्ट म्हणजे शेकोटीजवळ बसून सांगण्याची व ऐकण्याची कहाणी आहे. अशा कहाण्या आम्ही फार ऐकल्या. उदाहरणार्थ, 'गुलबकावली,' "एक होता राजा, त्याला होत्या दोन बायका. एक होती आवडती, दुसरी होती नावडती "–इ. इ. 'ध्रुवाख्यान' हीसुद्धां एक पद्यात्मक कहाणीच आहे. म्हणूनच ती आम्हांला लहानपणीं आवडायची.

अभ्यास

१. अधोरेखित वाक्यांचे अर्थ द्या व त्यांतील अलंकार उलगडून सांगा.

२. आंधळा ब्राह्मण लक्षाधीश झाल्यावर काय झालें ? पुढची गोष्ट सांगा. ती तयार करितांना 'संपत्तीनें सुख मिळतें व दारिद्र्यानें दुःख होतें असेंच कांहीं नाहीं' हें शंकराचें वाक्य ध्यानांत ठेवा.

३. मधुकरी, उजवून टाकणें, दादाबाबा करणें, विषार, भोक्तृत्व, भाडें थकणें, वर साखर पेरणें, ही बैठक मोडली, मुखस्तंभ, तोंडचें पाणी पळणें, यांचे अर्थ द्या.

४. धुवांधार = जोरानें पडणारा प्रवाह.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

२३

गोफण मारणारास

[गज़ल]

रे ! थांब नको गोफण ती उंच उगारूं
 त्या दीन विहंगास नको नाहक मारूं !
या निर्मल वातावरणीं, रम्य सकाळीं
 स्वच्छंद चहूंबाजुंस दे त्यास भरारूं
कापीत अनंतांतिल हा शीतल वारा
 तत्किन्नरकंठांतुन दे गीत थरारूं
कोठेंतरि रानांत दडे सोबत त्याची
 यायास पुन्हा सन्निध ती दे ललकारूं
बैसून जरा वल्लरिच्या कोमल दोलीं—
 आंदोलुन दे मुक्तरवें तीस पुकारूं
पोटांत नसे काल निशेपासुन कांहीं
 भक्ष्यार्थ फिरे तो, पथ दे त्यास सुधारूं
तान्हीं असती कोटरिं सोत्कंठ भुकेलीं
 त्यांना तृण, दाणे, जल दे नेउन चारूं
तीं नीडिं बुभुक्षातुर, अज्ञात वनीं तीं
 हें मागिल चिंताभय दे त्यास निवारूं
खातो तरि तो जीव मुका काय कुणाचें ?
 घे आवरता हात ! नको त्यास हकारूं
निर्वाह करी कंदमुळेंवारिवरी तो
 दे वाहुं सुखेन्नैव तयाचें भवतारूं

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

तूं सूज्ञ, दयाळू असती मानवयोनी
दे नीच विचारीं नयनीं तोय तरारूं
—रे ! थांब, नको क्रूरपणा नेउं थराला
मातून नको माणुसकी पार झुगारूं
जो ईश्वर निर्मी तुज तो निर्मि तयाही
त्याचें करुण-स्निग्ध नको चित्त विदारूं

भवानीशंकर पंडित

परिचय

गज्जल हा एक भावना व्यक्त करण्याचा काव्यप्रकार आहे, वृत्तविशेष नाहीं. गज्जलाचीं वृत्तें मूळ फारशींत अनेक असून मराठींतहि त्यांतील बहुतेक वृत्तें कवि माधव जूलियन् यांनीं आणिलीं आहेत. हें एक वृत्त पाहा; तुमच्या नेहमींच्या परिचयाच्या वृत्तांहून तें वेगळें आहे. भावनांचा परिपोष करण्यास हें वृत्त व विशेषतः यांतील यमक पद्धत किती अनुकूल आहे तें पाहा.

सबंध कवितेभर किती गोड, प्रसन्न व नाजूक वातावरण पसरलें आहे पाहा. 'पोटांत नसे...कांहीं' या ओळींत एकजात सर्व मराठी शब्दांच्या मध्यें एकच संस्कृत शब्द 'निशा' आला आहे, तो कानाला बरा लागत नाहीं.



CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

२४

एका दिवसाची दैनंदिनी

बाबांनीं मला एक खरोखरीचें घड्याळ आणून दिलें आणि सांगितलें कीं, " गणू, हें घड्याळ घे, व उद्यां सकाळीं उठल्यापासून झोंपेपर्यंत तूं जें जें काय करशील तें तें सर्व या घड्याळांत पाहून एका कागदावर लिहून ठेवून मला परवां सकाळीं दाखीव. जें काय लिहिशील तें कोणत्या वेळेस केलें तें समजण्यासाठीं त्याच्यापुढें बरोबर वेळ मांडीत जा. खोटें मुळींच लिहूं नको. समजलं? जा."

त्या रात्रीं घड्याळाला किल्ली देऊन मी मारे मोठ्या आनंदांत तें उशाखालीं घेऊन झोपलों.

सोमवार. तारीख ठाऊक नाहीं. बाबांस विचारायला हवी.

(६–३०) जळो त्या ठकी मोलकरणीचा रोज उठून त्रास! साडे सहा वाजले नाहींत तोंच आली हाक मारायला. जेव्हां पांघरुणांत गुरफटून झोंपावेंसें वाटतें तेव्हां आपली रोज येते. जरा उशीरानें झाडलें तर नाहीं होत? ओरडूं दे. उठल्यावर दाखवितों कसें काय आहे तें.

(६–३२ ते ७–१५) चापून झोंपलों.

(७- १६) उठावेंच लागलें. बाबा रागें भरायला लागले. थांबत जाऊन तोंड धुतलें. गरम पाणी कांहीं अखेर मिळालें नाहीं. हट्ट धरून बसलों असतों तर मिळालें असतें, पण बाबांचा मागें लकडा होता ना! सकाळचे बाबा बाहेर जाते तर बरें होतें. घरींच असतात.

(७–२०) लंगोटीबद्दल तुमान चढवली. नाडीचें तोंड पाठमोरें गेलें. काय हा त्रास तुमानीचा. दोन्ही बाजूला तोंडें केलीं असतीं तर किती नामी झालें असतें? बरी युक्ति सुचली. पुढचे वेळेस शिंप्यास

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

सांगितलें पाहिजे. त्याच्या मठ्ठ डोक्यांत उतरेल तेव्हां ना ? तशीच तुमान बांधून टाकली. सदरा चढवला. वर कालचाच कोट घातला. अरे पण हें काय खिशांत ? हं, कालचे आईनें दिलेले मिठमिरचीचे पोहे. थोडेसे चुकून राहिले त्या बगीच्या बडबडींत. खा आतां झालें !

(७–२५) पोहे मटकावले. कोणी जवळ नव्हतें म्हणून बरें, नाहीं-तर सकाळच्या प्रहरीं काय खातोस म्हणून विचारलं असतं. कृष्णा, बगी, मथी आणि गोंदू असते तर मला मुळींच राहतेना, त्यांनींच मागून घेतले असते. मग काय फक्का !

(७–३६) तोंडबींड पुसून आईकडे चहाकरतां गेलों. कांहीं केल्या ती वाडगा भरून चहाच देईना. शेवटीं दिला बुवा, जेव्हां अगदींच पिच्छा धरून बसलों तेव्हां. तरी थोडासा देतां देतां सांडलाच.

(७–४१) इतक्यांत गोंदू धांवत धांवत येऊन म्हणाला, "मात्तल आले मात्तल आले !" छाती धडाडली. वाडगा सर्रकन् निसटून खालीं बशीवर पडला. दोन्ही मिळून बरोबर बारा तुकडे झाले. चहाची गंगा वाहूं लागली ती वेगळीच.

(७–४३ ते ७–४५) आईच्या शिव्या व सर्वांचा हंशा. ठकीचा व पांडोबा आचाऱ्याचा मला फार राग आला. दांत पाडले पाहिजेत त्यांचे.

(७–४६ ते ७–४७) मास्तर बाहेरून हांका मारतात. गोंदूस टपली मारून, मथेस हळूच चिमटा काढला. कोकलूं लागली.

(७–५० ते ८) मास्तरांचा लवकर उठण्याचा उपदेश. शाळेंत काय खावयास घ्यावें याचा विचार करून ठेविला व शाळेंतील मोरोपंत मास्तरांना काय बात ठोकून क्रिकेट ग्राउंडवर पळावें याचा बेत थोडासा चालवला.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

(८–१ ते ९–५) मास्तरांचें शिकवणें. स्पेलिंग करतां करतां मास्तरांनीं दोनदां शेंडी धरून ओढली व एक टपली मारली. साहेबलोक कितीतरी शहाणे. ते शेंडीच ठेवीत नाहींत. किती वस्ताद !

(९–१६ ते ९–४०) ' उपरणें झाडून मास्तर जातात पण त्यांची तपकिरीची डबी मागें राहते. तपकिरीची चिमटी घेऊन ठकी .दाणे निवडीत बसली होती, तिकडे हलके पाठीमागून जाऊन तिच्या नाकावर उडवली. ठकीचं पिसाळणं व थयथयाट, मंडळी जमते, पोट धरधरून हंशा. मी तेथून पळतों.

(९–४१ ते ९–४७) नळाभोंवतीं धांगडधिंगा, नळास हात धरून वहिनींच्या अंगावर कारंजा सोडणें, व ती " हें काय गणूभावजी ! सासूबाईंस सांगेन बरं का ?" असें म्हणते.

(९–४८) दादा येतो, त्याचे वटारलेले डोळे पाहून गपचिप आंघोळीस बसतों.

(९–५० ते ५२) आंघोळ उरकली.

(९–५३ ते ९–५८) ओलेत्यानेंच धांवत जाऊन आईचें लुगडें वाळत होतें त्यानेंच आंग कसेंतरि पुसून देवघराकडे गेलों. लुगडें कोणी विसकटलें म्हणून ठकी ओरडते. कोणीच दाद देत नाहीं. खाशी ! आईकडे फिर्याद करते. "गण्याचं काम असेल मेल्याचं" आई म्हणाली. मी आडून ऐकलं.

(९–५९ ते १०) संध्येचा फार्स. बरें झालें, वासूकाका नव्हते म्हणून. नाहींतर मोठ्यानें संध्या म्हणावी लागली असती.

(१० ते १०–१९) लवकर वाढण्यासाठीं पांडोबांची खुशामत. त्याला मान चढतो. काय मिजास ! असे कळे धरून–! जाऊंदे, पुढें पाहून

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

घेऊं. जेवण—पोळ्या कच्च्या म्हटल्या म्हणून पांडोबास घुस्सा चढतो. कांहीं केल्या दुसरी पोळीच वाढीना. चंची लपवावयाची धमकी दिली तेव्हां आला नरम.

(१०–२० ते १०–३१) कपडे चढविणें. दप्तरांत पुस्तकें कोंबून कोणाची वाट न पाहातां शाळेंत धूम ठोकली. कृष्णा, गोंदू येतील सावकाश.

(१०–४३) शाळेच्या दाराशीं पोंचलों.

(१०–४५ ते १०–५५) रंगू भेटतो. नवी टोपी घालून आला म्हणून नऊ नऊ टपल्या प्रत्येकजण त्याला मारतो.

(१०–५७ ते ११) हेडमास्तर येतात. सर्व गुपचूप! घंटा वाजते. वर्ग सुरू होतो.

(११ ते १२) इंग्रजी वाचन व अर्थ. रंगूचा जोडा माझ्या दप्तरांत सांपडला म्हणून सर मला बांकावर उभे करतात. मुलांचा हंशा पिकतो.

(१२–३४) एक तास उभा राहून झाला म्हणून घड्याळ मोरोपंत मास्तरांना दाखवून बसूं काय म्हणून विचारलं. पुन्हां हंशा. कारण समजलं नाहीं. बसण्यास परवानगी मिळत नाहीं.

(१२–४२) ग्रामरमधील I would have been वगैरे रूपें वामन्या चालवीत असतां पुन्हां पुन्हां I would have been म्हणतो. कंटाळा येऊन मी हळूच म्हटलें "You would have been an ass!" मास्तरांनीं ऐकलें.

(१२–४४ ते १२–५२) शंभर उठाबशांची शिक्षा. सवईमुळें पन्नास भराभर काढल्या, पुढें पाय दुखूं लागले. तशाच एकेक काढल्या.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

मोजतां मोजतां पंधरा सोळा खाल्याच. मास्तरांच्या लक्षांत आल्याबरोबर पांच कानपिचक्या मिळाल्या.

(१-१ ते १-११) मास्तर बाहेर गेले. वर्गांत एकच किलकिलाट झाला. मास्तरांची छडी घेऊन मी जोरानें टेबलावर हाणली. मॉनिटरचें काम केलेंच पाहिजे.

(१-१२ ते १-१३) मास्तर येतांच वामन्या चहाडी करतो व मी खुर्चीवर बसलों म्हणून सांगतो.

(१-१४ ते १-१६) एकेका हातावर तीन तीन छड्या! खरें कुणाला वाटणार? कानफाट्या नांव पडलेलें!

(१-१७ ते १-२८) बोर्डावर गणित सोडविण्याची पाळी प्रथम माझ्यावर येते. गणित सोडवितों. बसण्याची परवानगी मिळाल्यामुळें जागे-वर जातां जातां वामन्याकडे पाहून जीभ दाखविली.

(१-२७ ते २-१) दोन वाजण्यास किती अवकाश आहे तें पाहिलें. तेवीस मिनिटें आहेत (?) तिसरें गणित सांगतां सांगतां दोनाची घंटा झाली. शाळेचें घड्याळ चूक. फास्ट का स्लो?

(२-२ ते २-१३) जिन्यावरून दडदडावून खालीं येतों. पेरू, शिताफळ, केळीं, गुडदाणी, भजीं, दिसतात. जीभेला पाणी सुटतें. चिवडा घेण्याचा बेत रहित. सगळें घ्यावेंसें वाटतें, पण दोन पैशांत काय घेणार? एका पैशाचे तीन पेरू, अर्ध्या पैशाची गुडदाणी व अर्ध्या पैशाचीं भजीं शेवटीं घेतलीं. पेरूवाल्या म्हातारीच्या टोपलींत हळूच हात घालून थोडासा जास्त मसाला घेतला. मसाल्याशिवाय पेरू चांगले कसे लागणार?

(२-१३ ते २-२९) खिसा फुगलेला पाहून रंगू, नान्या व केशा येतात व मागतात. मला मान चढून थोडें थोडें टाकतों त्यांच्या हातावर

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

देवाण–घेवाण करावीच लागणार. धिंगाणा व मस्ती. वामन्याशीं कुस्ती व त्याचा पराजय.

(२–३० ते २–३७) अडचाची घंटा. आतां कॉपीरायटिंगचा तास. दुसऱ्या वर्गांत जायचं. दप्तर घेऊन कोणी नाहींसं पाहून गुंगारा देण्यासाठीं टेहळणी. मैदानांत क्रिकेट म्याच अगदीं रंगांत आली असेल. जिन्यावर मोरोपंत मास्तर भेटतात. आमचा जिन्यांतच रंग होतो. हेड-मास्तरापुढें बोळवण. शिक्षा मिळते.

(२–४० ते ३–२३) पहिल्या इयत्तेपासून ते सातवीपर्यंत प्रत्येक वर्गांतून गळ्यांत पाटी बांधून धिंडका. जो तो ' पळपुट्या गणू ' म्हणून हांका मारतो.

(३–२४ ते ३–३३) वर्गांत येऊन प्रत्येकाच्या दप्तरांत कागदाचीं चिठोरीं ठेवणार इतक्यांत मुलें येतात व मजकडे पाहून हंसतात. मास्तर येतात.

(३–३४ ते ४–२०) इतिहास. मी लेसन बरोबर केलं नाहीं म्हणून तें दहा वेळां लिहून आणण्याचें इंपोझिशन बसतें. इ. स. १७०५ त औरंगजेब मेला काय कीं अकबर मेला काय ? कोणी तरी मेला एवढें खरें ! मग काय बिघडलें ? सनांचा सगळा घोटाळा !

(४–२५ ते ४–३०) सुटीची पहिली घंटा. पोरें फटाफट पुस्तकें मिटतात. फेटा चढवून बुटांतील मातीबिती साफ करून मास्तर कोटाचीं बटणें घालूं लागतात. दुसरी घंटा. बाकांचं आदळणं, दारांचें आपटणें, जिन्यावरची धडपड व गोंगाट.

(५–१० ते ५–२३) घरीं येऊन पाय धुऊन फराळास बसलों. दशमी चामड्यासारखी चिवट, उसळींत खडे भरलेले. छे ! उठलों. आळींतील पोरांबरोबर खेळायला गेलों.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

(५–३५ ते ६–४) बाबांनीं सकाळीं डॉक्टरकडून कडू औषधाची पूड आणली होती, ती हाताशीं लागतांच पांडोबांस साखरेचा नमुना दाखविला. त्यानें फक्की मारतांच तो फुटाण्यासारखा नाचूं लागला. वहिनी आली. मोठ्यानें ओरडली; दादा, कृष्णा, मथी, बगी, गोंदू, आई, ठकी जमतात. एकच गडबड व हंशावर हंशा.

(६–४ ते ६–३०) कांहीं उद्योग करायला नाहीं. त्रास आला. श्लोक म्हणूं लागलों. बाबांची येण्याची वेळ झाली.

(६–४०) पुस्तक काढून बसलों. बाबा हफीसांतून येतात. सर्व शांत.

(८ ते ८–३०) जेवण जेवतांना पांडोबा लिंबाएवढे डोळे करून बाबांना सांगूं कां म्हणून खुणावतो. मी लक्षच देत नाहीं.

(९–१५) घड्याळाला किल्ली देतांना तें खालीं पडून फुटलें व काटे मोडले. आतां कसें करायचं ? पीडा गेली. दैनंदिनी लिहायला सांगणारच नाहींत. अंथरूण–बाहेरल्या मोठ्या घड्याळांत सव्वा नऊ झाले. डायरी लिहिण्याचं पुरं करतों. पुन्हां कधीं लिहिणार नाहीं. आज फार दमलों. अशी डायरी लिहिली तर कुणाला दाखवावयाची सोयच नाहीं. मग लिहायची कशाला !!

(करमणूक)

परिचय

दैनंदिनी म्हणजे रोजनिशी—या रोजनिशींत अगदीं खरें, झालें तसें, आपल्या मनांत आलेले विचार, आपले निश्चय, आपल्याला भेटलेले लोक, सर्व कांहीं थोडक्यांत लिहावयाचें. गणू हुशार पण खोडकर मुलगा होता. किती खरें खुरें लिहिलें त्यानें ! आतां दैनंदिनी लिहावयास घड्याळाची जरूर नाहीं किंवा मिनिटवार लिहावयाचें नाहीं, हें तो विसरला म्हणूनच मजेदार झाली आहे गोष्ट. शिवाय लेखकानें गंमत करण्यासाठीं एका दिव-

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

साऱ्या अवधींतच अनेक चमत्कारिक प्रसंग मुद्दाम आणले आहेत. नेमानें दैनंदिनी ठेवण्याची संवय तुम्ही अगदीं प्रथमपासून ठेवा. आपण कसकसे सुधारलों, हें तुम्हांला दरवर्षी कळेलच; पण कांहीं वर्षांनीं तुम्हांलाच मजा वाटेल, पूर्वीची हकीकत वाचून! गेल्या पिढींतील मुलांची दैनंदिनी तुम्हीं वाचली तशी तुमची दैनंदिनी मुलें वाचूं लागलीं तर काय वाटेल त्यांना ?

मोठमोठे लोक दैनंदिन्या ठेवतात. त्यांना स्वतःला तर उपयोग होतोच, पण इतिहासकारांनाहि अशा दैनंदिनीवरून महत्त्वाच्या प्रसंगांची माहिती मिळते. मराठी इतिहासांतील रोजनिशांवरून, 'सॅमुअल पेपीज' यांच्या डायरीवरून इतिहासावर पुष्कळच प्रकाश पडला आहे. मग या गोष्टीवरून काय धडा घेणार तुम्ही ?

अभ्यास

१. 'दैनंदिनीं'तील वेळाकडे लक्ष्यपूर्वक पाहून त्यांत हंसण्याजोगें कांहीं सांपडतें का पहा.

२. (९-५० ते ९-५२) "आंघोळ उरकली" यांत काय मौज आहे ?

३. फक्का, पिच्छा, दाद, मान चढणें या शब्दांचे अर्थ सांगून या गोष्टींतील इंग्रजी शब्दांऐवजीं शुद्ध मराठी शब्द योजा.

४. या मुलाच्या वेळीं असलेल्या शिक्षणपद्धतींत तुम्हांला चांगलें काय वाटतें व वाईट काय आढळतें ?

स्वाध्याय

१. या गोष्टीसारखी दैनंदिनी न लिहितां जशी लिहावयास पाहिजे तशी स्वतःची एका दिवसाची दैनंदिनी लिहा.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

२५

श्रीकृष्णजन्मकालवर्णन

ओव्या

दिशा सुप्रसन्न सकळ । गगन निरभ्र निर्मळ ॥
उदय पावला तारकामेळ । वर्षाकाळ असतांही ॥
मंगलोत्साह घरोघरीं । शोभनानंद नगरोनगरीं ।
दुःख शोक दोष दरिद्री । सुखसागरीं बुडाले ॥
हृदयशल्यें विरोनी गेलीं । ब्रह्मानंदें मनें निवालीं ।
सुहृद्भावें प्रेमाथिलीं । भूतें भूतळीं परस्परें ॥
श्रीकृष्णाचा जन्मकाळ । तेणें आनंदभरित जळ ।
सर्व भूतात्मा गोपाळ । सुखसुखाळ सर्वांसी ॥
नद्या वाहती प्रसन्न जळें । शुद्ध सत्त्वात्मकें सुविमळें ।
त्यजिलीं रजतमाचीं डहुळें । शुद्ध मेळें ज्याचेनी ॥
नीलोत्पलें श्वेतोत्पलें । कुमुदें कल्हारें निर्मळें ।
कुशेशयें हेमकमळें । रातोत्पलें रत्नाभ ॥
पद्माप्राणेश्वराचे जन्म । म्हणोनि पद्मेसि आनंद परम ।
तिणें अलंकारिलें धाम । पद्माराम पद्माकर ।
मानसादि सरोवरें । भागीरथ्यादि सरितातीरें ।
पुष्करपृथूदकादि अपारें । पुण्योदारें सुतीर्थें ॥
अनंत तपें तपूनि मुनि । जन्म पावले पक्षियोनीं ।
श्रीकृष्णाचें जन्म भुवनीं । देखों नयनीं या हेतू ॥
गंधर्व जन्मले भ्रमरकुळीं । श्रीकृष्णावतार भूमंडळीं ।
तया सुखाची नवाळी । सुकृत बहळीं सेवावया ॥

कृष्णदयार्णव

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

अभ्यास

श्रीकृष्णजन्माच्या प्रसंगीं सर्व सृष्टि कशी प्रसन्न झाली होती याचें हें सुंदर वर्णन कृष्णदयार्णव या कवीच्या 'श्रीहरिवरदा' या काव्यांतून घेतलें आहे. हा कवि १६ व्या शतकांत होऊन गेला.

पद्मप्राणेश्वर = विष्णु. प्रेमाथिली = प्रेमानें भरलीं. नवाळी = गोडी. बहळीं= पुष्कळ. डहुळ = गढूळ. कल्हार = कृष्णकमळ. रत्नाभ = रत्नासारखी प्रभा ज्यांना आहे अशीं. कुशेशय = तांबडें कमळ.

२६

विष्णुशास्त्री चिपळूणकर

राष्ट्रांतल्या कांहीं विशेष गोष्टींच्या अभ्युदयास कांहीं विशेष प्रकारच्या व्यक्ति लागत असतात; आणि तशा व्यक्ति कालदेशवर्तमानानुरूप तेथें उत्पन्न व्हाव्या अशी योजनाही सृष्टिक्रमांत आढळते. श्रीशिवछत्रपति मराठ्यांच्या राज्याच्या अभ्युदयार्थ अवतरले; ज्ञानदेव, नामदेव, तुकाराम, वामन, मोरोपंत इत्यादि महापुरुष आपल्या भक्तिभावाच्या प्रसारार्थ आणि महाराष्ट्र भाषेंतल्या काव्याच्या अभ्युदयार्थ होऊन गेले; तसे विष्णुशास्त्री चिपळूणकर हे, मराठी भाषेच्या गद्यरचनेच्या उन्नत्यर्थ आणि स्वदेशाभिमानाच्या पुनरुज्जीवनार्थ होऊन गेले कीं काय असें वाटतें. त्यांचें संक्षिप्त चरित्र येथें आम्ही सादर करितों.

सगळ्या जुन्या विद्वन्मंडळांत गाजलेले मोरशास्त्री साठे, हे ज्यांस यथार्थ गुण पाहून, मोठ्या कौतुकानें आणि संतोषानें 'बृहस्पति' म्हणत असत, त्या सुप्रसिद्ध कृष्णशास्त्री चिपळूणकरांचे चिरंजीव हे विष्णुशास्त्री चिपळूणकर होत. म्हणजे हे आमच्यांतले कच होत. हे इ. स. १८५० ह्या वर्षी जन्मले. हे लहानपणापासूनच गरीब आणि

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

संकोचवृत्ति असत. परंतु, त्यांची बुद्धि चांगली होती; आणि त्यांस विद्येची अभिरुचि फार होती. त्यांचे वडील कृष्णशास्त्री हे कांहीं दिवस दक्षिणाप्राईझ कमिटीचे सेक्रेटरी होते, आणि पुढें एतद्देशीय वर्तमानपत्रांवरचे व एतद्देशीय पुस्तकांवरचे रिपोर्टर होते, त्यामुळें, त्यांजकडे देशभाषेंतर्लीं पुष्कळ वर्तमानपत्रें व पुस्तकें येत असत, तीं ह्यांस सहजच वाचावयास मिळत. त्याच्या योगानें ह्यांस मराठी भाषेची फार अभिरुचि लागली. आणि ह्यांचे ठायीं उत्तम मार्मिकता उत्पन्न झाली. हे मॅट्रिक्युलेशनची परीक्षा उतरून इ. स. १८६५ मध्यें पुण्याच्या कॉलेजांत गेले, आणि इ. स. १८७२ ह्या वर्षी बी. ए. झाले. नंतर, कांहीं वेळपर्यंत त्यांनीं बाबा गोखल्यांच्या शाळेंत शिक्षकाचें काम केलें. आणि मग सरकारी हायस्कुलांत शिक्षकाची जागा पत्करली. ते मोठे मार्मिक शिक्षक असत. गणित खेरीज करून बाकीचे सर्व विषय आणि त्यांत विशेषेंकरून भाषाविषय त्यांस फार आवडत असत. आणि हे विषय ते इतक्या उत्तम


विष्णुशास्त्री चिपळूणकर

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

रीतीनें शिकवीत म्हणून सांगतात कीं, तें शिकविणें जेव्हां जेव्हां आटपे, तेव्हां तेव्हां विद्यार्थ्यांस वाईट वाटे. मराठी भाषा म्हणजे आपली केवळ माता, तिची सेवा करवेल तितकी केली पाहिजे, असें ते समजत असत. आणि त्याकरितां त्यांनीं, इ. स. १८७४ ह्या वर्षी **निबंधमाला** हें मासिक पुस्तक चालू केलें. त्यांत कांहीं खरमरीत लेख येऊं लागले, त्यांवरून म्हणा, किंवा सरकारी कामांतल्या दुसऱ्या कांहीं कारणावरून म्हणा, त्यांची बदली इ. स. १८७८ ह्या वर्षीं रत्नागिरीच्या हायस्कुलांत झाली. पुढें त्याच वर्षीं त्यांचे वडील निवर्तले. नंतर त्यांनीं सरकारी चाकरीचा राजीनामा देऊन, कांहीं मित्रांच्या साह्यानें पुण्यास खासगी इंग्रजी शाळा मोरोबा दादांच्या वाड्यांत इ. स. १८८० ह्या वर्षी घातली. ती आतां पुण्याचें न्यू इंग्लिश स्कूल ह्या नांवानें प्रसिद्ध आहे. ती त्यांच्या अनुयायांनीं उत्तम प्रकारें चालविली आहे. आणि सगळ्या मुंबई इलाख्यांत त्या शाळेसारखी दुसरी शाळा नाहीं असें झालें आहे. त्या शाळेच्या चांगुलपणाची पक्कदशा तेंच फर्ग्युसन कॉलेज होय. तेंहि उत्तम चाललें आहे. त्याचप्रमाणें, **केसरी** वर्तमानपत्र, **मराठा** वर्तमानपत्र, **चित्रशाळा**, **किताबखाना**, हीं सगळीं झाडें त्यांच्या हातचीं होत. हीं आतां वाढीस लागून, ह्यांस सुंदर फळें येत आहेत. आणि त्या फळांकडे पाहून, जन थक्क होत आहेत. हे विष्णुशास्त्री, नवज्वर होऊन, एकाएकीं, इ. स. १८८२ च्या एप्रिल महिन्याच्या १७ व्या तारखेस पुणें येथें कैलासवासी झाले. तेव्हां सगळा महाराष्ट्रदेश फार हळहळला.

विष्णुशास्त्र्यांच्या चरित्रांतल्या मुख्य गोष्टी ह्या आहेत. त्यांचें सगळें अवतारकृत्य बत्तीस वर्षांच्या आंत आटपलें. त्यामुळें त्यांच्या योग्यतेचा पूर्ण प्रकाश पडण्यास मिळावा तितका अवकाश मिळाला नाहीं. तरी, सरकारी

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

चाकरीचा राजीनामा देऊन आपल्या आंगच्या बळानें खासगी उद्योगावर निर्वाह चालविण्याचा दृढ निश्चय, खरी निस्पृहता, खरा सत्वस्थपणा, आणि आपल्या जन्मभूमीविषयीं खरा अभिमान, हे त्यांचे वर्णनीय गुण बऱ्याच प्रकारें उदय पावून, अलीकडच्या नव्या पदवीधर मंडळींतल्या वंद्य पुरुषांत त्यांची गणना होऊं लागली होती, ती अगदीं यथार्थ होती. ते मराठी भाषा उत्तम लिहीत असत. त्यांनीं एकाद्या गोष्टीचें वर्णन केलेलें वाचलें कीं ती गोष्ट प्रत्यक्ष आपल्या डोळ्यांपुढें होत आहे कीं काय असें वाटतें. यांच्या लिहिण्याच्या भाषेमध्यें एक विशेष प्रकारची ऐट आहे. ती ऐट त्यांनीं प्रचारांत आणिली. तिचें अनुकरण आतां पुष्कळ लोक करीत आहेत. तरी, तशी ऐट कोणाला साधत नाहीं. आपली खरोखर योग्यता काय आहे, आणि इतर मत्सरी लोक आपणांस विनाकारण काय काय नांवें ठेवतात, हें त्यांच्या लेखांवरून आमच्या लोकांस पुष्कळ कळूं लागलें; आपणांस काय केलें पाहिजे हें त्यांस चांगलें समजलें; आणि स्वदेशाभिमानाच्या अंकुरास पुष्कळ पाणी मिळालें. शिवाय हे गृहस्थ, वागण्यांत अगदीं साधे, मितभाषी आणि फार सालस होते. ह्यांचें सर्व कांहीं अनुकरणीय होतें. मनाचा मोकळेपणा हा त्यांचे ठायीं मूर्तिमंत होता. **निबंधमालेच्या** दुसऱ्या अंकांत त्यांनीं आपल्या उद्देशांविषयीं असें म्हटलें आहे कीं, "आम्ही दुसऱ्यास वाजवी रीतीनें नांवें ठेवण्यास ज्याप्रमाणें मागें पुढें पाहाणार नाहीं त्याचप्रमाणें दुसऱ्यांनीं आमच्या लेखाविरुद्ध मतें प्रदर्शित केल्यास त्यांत आम्हांसहि अगदीं वाईट वाटणार नाहीं. आपणांस जें खरें वाटेल, तें स्पष्टपणें लिहिण्यास जो भितो, किंवा तसें आपणांविरुद्ध लिहिलेलें ज्यास आवडत नाहीं, तो खरा सत्यनिष्ठ नव्हे, असें आम्ही समजतों." हें जें शास्त्रीबावांनीं लिहिलें आहे, त्यावरून केवळ त्यांची सत्यनिष्ठा

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

व्यक्त होते असें नव्हे; तर 'काव्यसंग्रह'कार वामन दाजी ओक यांसारख्यांशीं त्यांचे जे खडाजंगीचे वादविवाद झाले, त्यांवरूनहि त्यांची सत्यनिष्ठा चांगली प्रगट झाली आहे. हे इतके चांगले गृहस्थ आमच्यामध्यें होऊन गेले, ह्याचा आम्हांस खरोखर मोठा अभिमान वाटतो; आणि आमच्या राष्ट्राची उन्नति होण्यास अशाच विभूति उत्पन्न झाल्या पाहिजेत, असें मनांत येतें. देव करो, आणि असे अनेक विष्णुशास्त्री आमच्यांत होऊन, ते पुष्कळ वर्षें वांचून, त्यांचे हातून देशहित होवो.

वि. कों. ओक

परिचय

विष्णुशास्त्री चिपळूणकरांनीं मराठी भाषेची फार मोठी सेवा केली आहे. १८७५ च्या सुमारास आमच्यांतील विद्वानांस मराठी पुस्तकें व वर्तमानपत्रें वाचणें, मराठींतून पुस्तकें लिहिणें कमीपणाचें वाटत असे. जे थोडेफार लोक मराठी लिहीत त्यांचें लिखाण ओबडधोबड, अशुद्ध व घेडगुजरी असे. विष्णुशास्त्र्यांनीं प्रथम आपल्या निबंधमालेच्या द्वारें मराठींतूनहि इंग्रजी-प्रमाणें उत्तम प्रकारें लिहितां येतें हें सिद्ध केलें व स्वभाषेबद्दल लोकांच्या मनांत प्रेम व अभिमान उत्पन्न केला. त्यांचें हें सरळ सोपें चरित्र **विनायक कोंडदेव ओकांनीं** लिहिलें आहे. **ओकांची** भाषा त्यांनीं अनेक वर्षें चालविलेल्या मासिकाप्रमाणें अगदीं बाळबोध आहे. लहान लहान वाक्यें, रचना सोपी व सरळ, अलंकाराची वगैरे भानगड नाहीं, फार तर उपमा कधीं कधीं योजायची, जें सांगायचें तें सरळ व स्पष्टपणें अशी ओकांची जुन्या वळणाची भाषा असते. तिच्यांत बहुधा प्रसाद नसावयाचा, आवेशहि नसावयाचा. विष्णुशास्त्र्यांबद्दल किती शांत व थंडपणानें त्यांनीं लिहिलें आहे पाहा. असे ही सोपी सरळ धोपट भाषा लिहिणारे आम्हांला हवेतच. शब्दचमत्कृति व कल्पना यांच्या भराऱ्यांनीं भांबावून गेल्यावर ओकांच्या दालनांत किती घरच्यासारखें वाटतें, नाहीं ?

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

अभ्यास

१. अधोरेखित शब्दांतील कल्पनांचा खुलासा करा.
२. 'ऐट' व 'एतद्देशीय' यांना दुसरे शब्द सुचवा.

२७

झोंपेंत हंसणाऱ्या सुधेस–

सौ. मनोरमाबाई रानडे

तुज काय वाटलें काय स्वप्न तुज पडलें ?
झोंपेंत हांससी ! मोह पडे मज बाळे !
जागृतींत चाळे अमित करुनि हांसविसी
निद्रेंत म्हणुनि का देव हांसवी तुजसी ?

तूं सकल जनांची होसी लाडकी,
तुज बघुनि नाचती पुष्पें सारखीं;
स्थिरविसी तारका व्योमीं कौतुकीं

हृदयांत करुनिया प्रवेश सृष्टीमाता
गुदगुल्या करितसे काय **सुधे** तुज आतां !
या तुझ्या स्मितानें हृदय स्निग्धतर बनतें
जडमूढ चकित मन मोदें पुलकित होतें
पतिपुण्यसंचयें लाभ अशीचा झाला
पापिणीवरी हा कृपादृष्टिघन वळला

उपमान तुला विश्वीं ना गवसतें
संबोधनिं केवळ तुझिया तृप्तते
मम शरीर आत्म्या ! तुज हें समजतें

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri



(मूर्ति) मी नाहीं जा !

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

स्मितमुखास बघुनी विलोभुनी मन जाई
तव प्रेमसमाधी भंगत तरि मी नाहीं !

सौ. मनोरमाबाई रानडे

अ भ्या स

कवयित्रीची खेळकर, चपळ व सर्वांची लाडकी मुलगी सुधा झोपेंत हंसत असतां प्रेमळ मातृमनाला स्वाभाविक कल्पना सुचतील त्याच या कवितेंत तुम्हांला सांपडतील. भाषा साधी असून तिच्यांत प्रसाद आहे. तारका 'सुधे'चें कौतुक करितां करितां रस्ता चालायचें विसरल्या ही कल्पना किती गोड आहे !

२८

मी नाहीं जा !

(मूर्तिपरिचय)

या मूर्तीतील तिघांच्या तीन तऱ्हा आहेत. फार सोपें आहे हें चित्र समजायला ! मनीला जवळ घेतल्यामुळें चंपी रुसली आहे. चंपीचे पाय व डोळे पाहा ! आणि मनी !—धनिणीच्या गालाला कपाळ घाशीत डोळे मिस्कीलपणें बारीक करून ती छातींतल्या छातींत 'पर्, गुर्' असा आवाज करते आहे. मालकिणीला दोघेंहि आवडतात, पण चंपीच्या रुसण्यामुळें तिला किती गंमत वाटते आहे पण ! हुबेहूब पुतळे आहेत हे ! लहान तान्ह्या मुलाला घेतलें म्हणजे मोठी बहीण अशीच रुसते, नाहीं ?

आतां जरा मजा करा. तिघेंजण बोलत आहेत असा संवाद तयार करा. नाहींतर प्रत्येकाच्या तोंडचें फक्त एक एक वाक्य वहीवर लिहा पाहूं.

मनी :
चंपी :
धनीण :
चंपी : मी नाहीं जा !

श्री. बा. रानडे

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

२९

पिल्या ठोठाव !

(पिल्या व प्रतापराव येतात.)

प्रताप : आमच्या विजापुरास रामराम ठोकून बेत केल्याप्रमाणें प्रथम या कुसुमपुरांत तर येऊन पोंचलों. येथें अगोदर आपल्या राणोजीची गांठ घेतली पाहिजे. त्याला भेटून कितीतरी दिवस झाले ! अरे, मला वाटतें हेंच त्याचें घर ! वा, शंकाच नको. पिल्या, गाढवा, पुढें कुठें चाललास ? हुं, पाहातोस काय ? मार थाप !

पिल्या : थाप मारूं व्हय ? कोणती थाप जी, तोंडाची कीं हाताची ? अन् कोणाला मारूं ? कोण हाय हतं ? आपणास्नी कुनी शिया बिया दिल्याती व्हय ?

प्रताप : गाढवाच्या लेका—

पिल्या : हां धनीसाव ? त्ये न्हवं बगा. मला होवं तर गाढव म्हना पन माझं आईबाप कुनी काढलं तर त्याची मला लई चीड हाय. माझ्या बानं आपलं काय केलं जी ? माझ्याबानी तो आपला चाकूर होऊन चाबूक खात ऱ्हायला असता तर मात्र खचित गाढव व्हता.

प्रताप : झाली टकळी सुरू हरामखोराची. या चोराला उठतां लाथ आणि बसतां बुक्कीच पाहिजे. जरा वेळ गेला कीं याची आठवण बुजालीच (चाबूक सरसावून) पिल्या, संभाळ, मी सांगतों असें ताबडतोब कर. लगाव ठोसे. अब्बीके अब्बी. खूब जोरसे—

पिल्या : बरं हाय तर मग, लगावतोच ठोसं. पन धनीसाव, कुनाला लगावूं जी ठोसं ? हतं तर कोनबी न्हाई ! वाईच दावा तर खरी, कीं, बगा कसा मारा करतो त्यो—

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

प्रताप : अरे गद्र्या, तूं आला आहेस आज मार खायच्या बेताला. ठीक आहे. पुन्हां सांगतों बघ, जोरानें ठोठाव; मारे बोंबाबोंब करून दे. असें मिळमिळीत ठोठावणें मला मुळींच आवडत नाहीं, हुं! विचार कसला करतोस? काढतोस आवाज कां काढूं तुझ्या डोक्यांतून आवाज !

पिल्या : तसं कशापायीं. सरकार! मीं हायना त्याच तयारीमंदी (अस्तन्या सारतो व घोंगडी कमरेभोंवतीं गुंडाळतो.) यजमानसाबानीं आज गोळीबिळी चढवलिया जनू, म्हून भांडान काढत्याती. बरं हाय धनीसाब, ठोसं देतोच तर बगा. मग जर कां कमजास्त झालं, तर मला न्हाई दकल. मागून भानगाडबिनगाड नको, म्हून म्हंगतो.

प्रताप : असें काय? तूं आज फारच बेजबाब बोलूं लागला आहेस. चिलीम बिलीम झोंकली आहेस वाटतें. थांब, तुझा कैफ उतरतों बरें एकदम. (त्याचा कान धरून पिळतो.) कशी आहे मात्रा ! लागू पडली का? कां उगाळूं आणखी दोन वळसे? लकडीशिवाय मकडी वळत नाहीं.

पिल्या : (भुईवर लोळत ओरडत) मेलों, मेलों ! धावा, खून, खून ! आमच्या धनीसाबास्नी अक्षी खूळ लागलया. धावा बिगिबिगी.

प्रताप : बघ कसा माजोरी आहे तो. मार खाल्लान् तरी पुन्हा गाढवासारखा पाहिजे तें बरळतो आहे. पिल्या, उठून ठोठावतोस का नाहीं? कां देऊं आणखी न्याहारीला?

पिल्या : नग नग सरकार! लई झालं. माझी भूक इत्ती न्हाइ धनीसाब.

[राणोजीराव येतो.]

राणोजी : अरे आहे तरी काय? कोण ओरडला तो? कोण

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

पिल्या ?—आणि हे कोण ? अरे प्रतापराव ! वा ! मित्रा केव्हां आलास ? बरें, विजयपूरची मंडळी सारी खुशाल ? (एकमेकांला कडकडून भेटतात.)

प्रताप : घाबरून आलास वाटतें बाहेर ? अरे तुला ठाऊक नाहीं, तो पिल्या आहे ! पक्का कांगावखोर ! एकपट असलें तर दसपट दाखवील. त्याचा आमचा हा विनोद झाला ! नेहमींचा आहे हा ! त्याला आपल्या चाकरीपेशाचा विसर पडतो, म्हणून मधून मधून त्याला अशी ही आठवण द्यावी लागते. खरोखर. माझा प्यारा दोस्त भेटलास म्हणून किती आनंद झाला आहे म्हणून सांगूं ?

राणोजी : अरे, व्हावयाचाच तो ! तुला एकट्यालाच का तो झाला आहे ? स्नेहाची तर हीच मजा ! एकाला ब्रह्मानंद झाला, कीं दुसऱ्याला औदास्य समुस्थित झालेंच. एकाचें औदास्य तोच दुसऱ्याचा उल्हास. आहे कीं नाहीं अजब गम्मत ? आं ? प्रतापराव, हंसतोस रे कां ?

प्रताप : हंसूं नको तर काय रडूं ? अरे वेड्या, हा तुझा बोलण्याचा प्रकार पाहून शहाणादेखील वेडा बनायचा ! ही नवीन विद्वत्ता कोठें पैदा केलीत आपण ?

राणोजी : प्रतापराव, मी तुला फार धूर्त समजत होतों; पण कांहीं नाहीं. अरे आमच्या या अस्मानीसुलतानी भक्षणांतलें इंगित तुला नाहींच कळावयाचें ! अरे स्त्री विशिष्ट करून घेण्याचें हें उत्कृष्ट संधान म्हणून हा भक्षण व्यतिपात आम्ही घेतला आहे, समजलास ? पिल्या, असा लोळतोस कां ? ऊठ. प्रतापराव, चल आंत.

पिल्या : ह्यो उठलों बगा, काय म्हणतां ? धनीसाबांनीं तुम्हास्नी म्यां कांहीं चिलीम बिलीम वढल्याचं सांगितलं व्हय ? ह्या माळेच्यान् बगा,

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

आपण चिलमीला शिवलों असेल तर ! बाकी तुमच्या कानांत सांगतों बगा, आज धनीसाहेबांनींच कायबी हकडं तकडं केलंया. कसं वसकन् कुत्र्यावानी अंगावर येत्याती त काय ! येंचं रातदिन ह्यें असंच. जर येनी बिगिबिगी लगीन करून घ्येतलं न्हाइ, तर आपल्याला त्येंची नोकरी सोडावी लागणार !

राणोजी : पिल्या, असं कुठं झालें आहे ! अरे, माझा मित्र तुझा फार जुना सेवक आहे. लहानपणापासून तुमची दोघांची जोडी. याची नोकरी सोडणार तूं ?

प्रताप : अरे तो कसचा नोकरी सोडतो ? त्याला मी, मला तो —त्याचें दुसऱ्या कोणाशीं पटायचेंच नाहीं. होय कीं नाहीं पिल्या ? (चाबूक उगारतो).

पिल्या : (दूर सरून :) व्हय, व्हय सरकार. हायच तसं आपलं माझ्या-वर परेम न् काय ? ह्यो बगितला मासला, दादासाब ? नोकरी सोडूं नको —तर काय करूं म्हणतां ? ह्ये बगा, आतां तुम्हीच न्याव करा. ह्येंचा मी अगदीं बचपनापुन चाकर हाय खरा ! पण मानुस झालं म्हून किती मार खाईल ? मी म्हणतो धा पाच चाबूक दिसाल्नं खावं लागलं तर लई झालं पन् येंचा झपाटा कांहीं मुलुखा न्याराच ! धा पाच तर सकाळच्या न्ह्यारीलाच मिळत्याती ! आतां आपुन सोसाल का असं ?

राणोजी : (हंसून) आपल्याला नाहीं बुवा अजून तसा अतिप्रसंग पारपत्य झाला; म्हणून नाहीं सांगवत.

पिल्या : ह्ये बगा मी सांगूं तुम्हास्नी मागच्या तंट्याचं मूळ ? ह्ये हतं आल अन् मला कसं म्हंगतात " हुं, लगाव ठोसं, जलदी, आतांच्या आतां लगाव !" थतं बगा त्येंच्या अन् माझ्या ब्रिगर कोनबी न्हवतं. मग

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

कसा म्हंगतां ? मी धनीसाबास्नां ठोसं लगवाव व्हय ? लोक काय म्हंगत्याल ? थुंकत्याल कीं तोंडावर !

प्रताप : किती गाढव आहे हा ? अरे, मीं याला दहादां सांगितलं कीं पिल्या, दार ठोठाव; पण ऐकेल तर शपथ ! मग थोडीशी किल्ली देऊन—

पिल्या : हं हं धनीसाब, खोटं बोलनं लई वंगळ ! आपनासारख्या थोर गिरस्तांनीं तर कंदी कंदी खोटं बोलूं नये. आपुन तोंडातनं दारावर असा सबुद तरी काडला ? म्हणं हतं ठोठाव, लई जोरानं ठोठाव. मला मिळमिळीत ठोठावनं आवडत न्हाई ! मला काय ठाव यांचं 'दारावर ?' मी काय समजलों, कीं धनीसाबास्नी पाठवीट लई रगडून घ्याची हाय ! म्हून अस्तन्याबिस्तन्या सारून करतो तयारी तों आल एकदम वागावानी अंगावर. अन् हूं काय, दिला पलाखतीचा मार ! माझंच धोरण चुकलं बगा.

प्रताप : पिल्या ! तोंड आटपतोस का नाहीं ?

राणोजी : अरे, थांब रे, त्याची वल्गना काय आहे ती ऐकूं दे. कशी धोरणा चुकली रे ?

पिल्या : कसं चुकलं व्हय ? हें बगा, त्येंनी हुकूम करतांच मी का त्यांना खालीं पाडून त्येंची पाठ चांगली मऊ केली असती, म्हंजी माझं असं कशापायीं व्हतं !

(दूर उभा राहतो)

प्रताप : बरें बरें, मोठा फाजील झाला आहे नाहीं तर !

(हात उगारतो.)

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

पिल्या : हं ह्ये बगा दादासाब. कसं पिसाळल्यावानि करतात त्ये. एकाद्या देवरुशाला तरी येंस्नी नेऊन दावावं म्हंगतों.

प्रताप : अरे हरामखोरा !

प्रो. वा. बा. केळकर

परिचय

प्रसिद्ध 'त्राटिका' नाटकांतील हा प्रवेश आहे. मूळ नाटक इंग्रजी शेक्सपियर या नामांकित इंग्लिश नाटककाराचें, पण त्याला मराठी पेहराव प्रो. वासुदेव बाळकृष्ण केळकर यांनीं इतका हुबेहूब दिला आहे कीं हें रूपांतर असेल असें कधीं वाटावयाचें नाहीं. प्रो. केळकर हे फर्ग्युसन कॉलेजांत अध्यापक होते. आगरकरांच्या 'विकारविलसित' (हॅम्लेट) प्रमाणें हें उत्तम रूपांतर आहे. सबंध नाटक अवश्य वाचा. हा प्रवेश गमतीचा आहे. प्रतापराव नांवाचा तापट, उतावळा पण उमदा सरदार आपल्या नोकरासह कुसुमपुरास आला आहे. राणोजीच्या घरासमोर तो पिल्यास स्पष्टपणें 'दारावर थाप मार,' 'दार ठोठाव' असें न सांगतां मोघम 'थाप मार' "ठोठाव' असे हुकूम सोडतो. त्यामुळें पुढची गंमत होते. हा विनोद केवळ शाब्दिक आहे.

अभ्यास

विनोदाचें दुसरें साधन म्हणजे राणोजीचें भाषण ! त्याच्या भाषणांनीं विनोद कां उत्पन्न होतो ? हा विनोद कशा प्रकारचा आहे ? राणोजीनें ज्या चुका केल्या आहेत त्याऐवजीं योग्य शब्द सुचवा.



CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

३०

गुलामाचें गाऱ्हाणें

वृत्त-श्यामला

जूं बैसलें मानेवरी   चाबूक हा पाठीवरी
ह्या कर्दमी मार्गावरी   चौखूर धावावें परी
हांकावया जो बैसला   सत्तामदें तो झिंगला
माया दयेची आर्द्रता   नाहीं तयाच्या अंतरीं !
मागें रथामाजीं धनी   थुंकी तयाची झेलुनी
त्वेषें लगामा खेंचुनी   आसूड ने खालीं वरी
धोंड्यावरी ठेचाळतां,   खाचेंत पायीं मोडतां,
उंचीवरी संथावतां   ते कोरडे अंगावरी.
विश्रामधोनी वांचवा   कर्तृत्व सारें दाखवा
या हाकणाराच्या नसे   पर्वा तयाची अंतरीं.
त्या बक्षिसाच्या पोतड्या   हांसून मोतद्दार घे
माझ्या तनूच्या चिंधड्या   कोणीहि पाहेना परी !
धावूं किती रे मालका !   होसी दयेला पारखा !
किंवा तुझी इच्छाच का   जावें फुटोनी म्यां उरीं ! !

यशवन्त

अभ्यास

'कवि यशवन्तां'ची ही एक प्रसिद्ध रूपकात्मक कविता आहे. या रूपकांत तिघांचा निर्देश केला आहे—मालक, मोतद्दार आणि घोडा. मालक रथांत सुखासीन व बेफिकीर बसला आहे. हाकणारा मालकाकडून बक्षिस मिळावयाच्या आशेनें निर्दयपणानें घोड्याला चाबकानें मारून वेड्या वांकड्या रस्त्यावरून

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

पिटाळीत आहे. मालकानें आपला घोडा हाकण्याची त्याला सत्ता म्हणजे कामगिरी–नोकरी दिली. या सत्तेनें मोतद्दार झिंगून गेला आहे व त्याला वाटतें जणूं काय आपणच मालक आहों ! घोड्याच्या नशिवीं मात्र जूं व चाबकाचा मार. हें रूपक अनेक प्रकारें उलगडून दाखवितां येईल. कविता नीट वाचून मनन करून रूपक उलगडून सांगा व तसें करितांना रथ, कर्दमी रस्ता, आसूडाचे कोरडे, यांची फोड करा.

१. उरीं फुटणें, पायीं मोडणें, संथावणें यांचे अर्थ द्या.

२. कवितेला "गुलामाचें गाऱ्हाणें" हें नांव कां दिलें ?

३१

व्हिक्टोरिआवाला

"चल बेटा !" हातांतील लगाम घोड्याच्या पाठीवर हलकेच आपटत याकूब म्हणाला. तेवढा इशारा त्या घोड्याला नेहमींच्या संवयीमुळें पुरेसा होता. तो हळूहळू दुडक्या चालीनें निघाला. गरगर फिरणाऱ्या रबरी चाकांचा अस्पष्ट आवाज घोड्याच्या ठेक्यांत पडणाऱ्या पावलांच्या आवाजांत ऐकूं येत नव्हता. मधून मधून घोड्याचें फुरफुरणें, पुढील फळीवर आपटल्या जाणाऱ्या चाबकाच्या दांड्याचा 'खाट् खाट्' आवाज,

कुमार रघुवीर

याशिवाय इतक्या पहांटेस त्या अगदीं बाजूच्या गल्लींत दुसरा कसलाच आवाज

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

ऐकूं येत नव्हता. " अभी बहुत नजीक है बेटा स्टेशन ! " जणूं काय त्या घोड्याला याची सर्व भाषा समजतच होती. तें वाक्य समजल्याप्रमाणेंच घोडाहि त्याच वेळीं फुरफुरला. बराच वेळ चालल्यावर एकदां स्टेशन आलें. त्यानें इकडे तिकडे पाहून गाडी एके ठिकाणीं उभी केली. त्यावेळीं तेथें कोणी पोलिस नव्हता त्यामुळें त्याला कोठें त्रास झाला नाहीं. तोच दिवस असता तर " एऽऽव्हिक्टोरिआ ! इधर नहीं खडी करना ! चलो हकालो ! " अशा तऱ्हेच्या 'पुलीस'च्या शब्दांना दंडाच्या भीतीनें मान वांकवणें भाग पडलें असतें.

सकाळीं ४॥ ला एक लांबची गाडी यावयाची होती. त्यावेळीं भाडें मिळेल ही त्याची आशा ! अझून गाडीला पाऊणएक तास अवकाश होता. लगाम सैल सोडून चाबूक हातांत घेऊन तो आपल्या जागेवर बसून राहिला. बसल्या बसल्याच त्याला डुलकी आली. त्याची मान पुढच्या बाजूस व आजू-बाजूला झोंके घेऊं लागली. आपला मालक झोंपला आहे, असें पाहूनच जणूं काय गाडीचा घोडाहि उभ्याउभ्या डोळे बंद करून डुलक्या घेऊं लागला.

" ठाण् ठाण् , ठाण् ठाण् ! " दुसऱ्याच कोणा गाडीच्या हालचालीचे सूचक असे ध्वनी त्याच्या झोंपीं गेलेल्या कानांत शिरले. तो खडबडून जागा झाला. घोडाहि फुरफुरला ! अजून गाडीला १०।१५ मिनिटें होतीं. तो खालीं उतरून गाडीची उत्कंठेनें वाट पाहात उभा राहिला.

'धोऽऽ' आवाज करीत गाडी स्टेशनांत शिरली. उतारू भरभर उतरूं लागले. हमालाची ये–जा सुरू झाली, एक एक हमाल आपल्या 'शेट'च्या बरोबर बाहेर पडत होता. 'व्हिक्टोरिआ, साब !' याकूब विचारूं लागला. त्याच्या पोटांत कालवाकालव होत होती. भाडें मिळेल का नाहीं ? मिळा-लेंच तर लांबचें का जवळचें ? सौदा ठरेल का पण ? एका मागून एक सारखे प्रश्न त्याच्या मनांत उद्भवत होते. तो चाबकाचा शेंडा वर करीत

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

प्रत्येक उतारूकडे पहात 'शेऽट !' असें अदबीनें म्हणत होता. वेळीं त्याचा 'शेट' कोण होईल हें सांगतां येत नव्हतें. त्यामुळें प्रत्येकाला तो खूष ठेवीत होता. साहेब लोक बहुतेक मोटरींतून जाणारे! त्यांची आशा करण्याचें त्याला कारण नव्हतें! गांवठी साहेबांवरच त्याची सर्व भिस्त! त्यानें बऱ्याच लोकांना विचारलें; पण त्याला कोणी गिऱ्हाईक मिळालें नाहीं.

दुसरी लांबची गाडी आतां सहाला होती. अजून पुष्कळ अवकाश होता. त्याला अतिशय झोंप आली. त्यानें आंतल्या गादीवर हातपाय पसरून ताणून दिलें. तो किती वेळ झोंपला होता, हें त्याला समजलें नाहीं; पण जागा झाला त्यावेळीं त्याला कोणी तरी हलवीत होता. "ए व्हिक्टोरिआऽ!" व त्याबरोबरच कानठळी बसविणारी मालगाडीच्या एन्जीनची शीळ हे दोन्ही आवाज त्याच्या कानीं पडले. तो झटकन् उठून बसला.

"कुलाबा आता है क्या!" त्याच्यासमोरील बूटपँट घातलेला मनुष्य म्हणाला.

"हां हां साब!" त्याला भाडें मिळाल्याबद्दल आनंद झाला.

"क्या लेएंगा! एक बात बोलो!"

"डेढ रुपया साब! तो लोकांची पद्धत ठाऊक असल्यामुळें जरा जास्त म्हणाला.

त्याच्या अपेक्षेप्रमाणें घासाघीस होऊन १४ आण्यांला भाडें ठरलें. चला! भवानी तर झाली! हमालानें सामान भरलें. घोडा चालूं लागला. याकूबनें विडी पेटविली. तिच्या धुराचे फवारे सोडीत तो घोड्याला मधून मधून चुचकारत होता. त्याचे सारखे विचार चालू होते, तरी यंत्राप्रमाणें तो वळणावर, नाक्यावर गाडी संभाळून नेत होता. मागून ट्रॅम आली कीं

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

तिचा खणखणाट ऐकून रुळावरून बाजूस होणें, मोटारीला रस्ता करून देणें वगैरे सर्व क्रिया त्याच्या हातून आपोआप होतच होत्या. त्याच्या नेहमींच्या अनुभवाप्रमाणेंच त्याला थोडेंसें जास्त अंतर व ४।५ जास्त गल्ल्या धुंडाळाव्या लागल्या. चौदा आणे चुकते झाले.

त्यानें थोडा वेळ परत येतेवेळचें भाडें मिळण्याची वाट पाहिली, पण जमलें नाहीं. त्या अवधींत त्यानें घोड्याचें गवतानें व स्वतःचें चहानें पोट भरलें. त्याला चहामुळें जरा हुरूप आला. घोड्याला थोपटून, त्याचें अंग थोडावेळ मळून त्यानें पुन्हां लगाम हातीं घेतला. घोडा चालूं लागला.

सूर्य आतां वर आला होता. जिकडे तिकडे माणसांची गडबड घाई सुरू झाली होती. ट्रॅमचा खणखणाट व तारेवरून घसरणाऱ्या दांड्याचा 'सऽऽऽ—' असा चमत्कारिक आवाज, मोटारींचे 'पँाक पँाक' व विजेच्या शिंगाचा आवाज वगैरेंनीं शहर पुन्हां जागृत झाल्याचीं सर्व चिन्हें दिसत होतीं. याकूब घोड्याच्या लगामाला एक लहानसा हिसका देऊन आपल्या मनांतील हृदय घोड्याला तारायंत्राप्रमाणें कळवीत होता. तो पुन्हां बोरी-बंदरजवळ आला.

घोड्याला व त्याला थोडासा विसावा मिळाला. पण तो विसाव्यासाठीं तेथें थांबला नव्हता. त्याला एखादें नवें भाडें मिळाल्यास पाहिजे होतें. नऊ वाजून गेले होते. साडेनवाच्या गाडीला एखादा 'पासेंजर' मिळाल्यास पाहावा म्हणून तो तेथें थोडा वेळ थांबला.

गाडी आली. माणसें बाहेर पडूं लागलीं. त्यानें पुष्कळांना विचारून पाहिलें. पण त्याला कोणी 'शेट' मिळाला नाहीं. आतां तो कोणाची एवढी पर्वा करीत नव्हता. तो थोडासा रागावलाहि होता. आतांपर्यंत प्रत्येक 'शेटला' कदाचित् तो आपल्या व्हिक्टोरिआमध्यें येईल या आशेनें

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

अदबीनें विचारणाऱ्या याकूबनें "कां पांडुतात्या यायचं का?" म्हणून हंसत हंसत एका पोरगेल्या माणसाची टर उडविण्याच्या हेतूनें विचारलें. त्याला 'कसला येतो तो?' असेंच वाटत होतें. पण लगेच त्याला वाटलें तो खरोखर आपल्या व्हिक्टोरिआंत आला तर?—म्हणून तो पुढें कांहीं बोलला नाहीं. तो पुढें निघून गेला. त्याच्याविषयीं निराशा झाल्यावर याकूब थोडेंसें स्वतःशीं व थोडेंसें त्याला ऐकूं जाईल या बेतानें "पैशे न्हाईत का खिशामंदी!" म्हणून म्हणाला व हंसला. 'कशी केली टर?' असें वाटून त्याला आनंद झाला. पण तो तेवढा वेळच. त्यापासून त्याला कोणता फायदा? पुन्हां तो स्वतःविषयीं विचार करूं लागला.

तेथें आणखी उभें राहून त्याला भाडें मिळण्यासारखें नव्हतें. लांब दिसणाऱ्या ट्रॅम नाक्याजवळ बरीच गर्दी दिसली. त्यानें आपला मोर्चा तिकडे वळवला. चाबूक वर करून 'शेटसाब, गाडी!' म्हणून तो ओरडून व खुणावून सांगत होता. तो जवळ येऊन उभा राहिला. ट्रॅम मागून ट्रॅम जात होती. प्रत्येक वेळीं लोक उत्सुकतेनें जात. प्रथम दरवाजाच बंद दिसे, पण कांहीं लोक तो वर करून आंत शिरण्याचा प्रयत्न करीत. इतक्यांत कंडक्टर मागें येऊन 'जगा नहीं!—पीछे गाडीसे आव!!' म्हणून ओरडूं लागे. बिचारे खालीं उतरत. निराश होऊन दुसऱ्या ट्रॅमची वाट पाहात. हीच याकूबला सुसंधि असे. 'शेऽऽट'! तो त्याच्या मताप्रमाणें, एखादा येण्यासारखा पगडीवाला, फेटेवाला शोधून त्याला म्हणे. त्यालाहि व्हिक्टोरिआंतून जावेंसें वाटे पण एक आणा व व्हिक्टोरिआचें भाडें यांतील अंतर होतां होईतों कमी करण्याच्या त्या माणसाच्या प्रयत्नामुळें त्यांचा सौदा कधींच ठरत नसे. असें दोन तीन वेळां होऊन एकदांच्या भरपूर जागेच्या ट्रॅम गाड्या भराभर येऊं लागल्या. एक दोन गाड्यांतून गर्दी साफ निघून गेली. याकूब बापडा गाडीघोड्यासकट ट्रॅमगाडीला मनांत शिव्या देत तेथेंच राहिला

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

अकरा वाजून गेले. सकाळीं झालेल्या भवानीवर त्याला अजून कांहींच भाडें मिळालें नव्हतें. त्याला कांहीं सुचेना. त्यानें लगाम हातीं घेतला, घोडा टपटप पावलें टाकीत चालूं लागला. वाटेंत त्याला एक मुसलमानी हॉटेल लागलें. 'एऽऽचाय लाव एक!' त्यानें लगाम खेंचून हॉटेलच्या पोऱ्याला सांगितलें. चहाचा कप तोंडाला लावीत तो इकडे तिकडे पाहात होता. बाजूला एक इसम हातांत बॅग घेऊन उभा असलेला दिसला. त्यानें भरभर चहा घशाखालीं घालून पोऱ्याच्या हातांत एक आणा टाकला. तो आशेनें त्या गृहस्थाकडे धांवला. 'गाडी मंगता है शेट!' 'अरे नहीं!' 'शेट' आपल्याच विचारांत असल्यामुळें त्याच्यावर ओरडून म्हणाला. त्याची पूर्ण निराशा झाली!

आतां त्याच्याकडे सकाळीं मिळालेल्या चौदा आण्यांपैकीं अकरा आणेच शिल्लक राहिले होते. दोन आणे चहाला व एक दिडकी विडीला व तीन दिडक्यांच्या तीन पानपट्ट्या. या अकरा आण्यांत त्याचें, घोड्याचें, बायकोचें, व दोन पोरांचें कसें होणार? अजून त्याला एखादें नवें भाडें मिळालें तर हवें होतें.

त्याला पुष्कळ हवें होतें! पण तें सर्व मिळेलच कशावरून?

साडेबारा वाजून गेले. त्याला भूक लागूं लागली. त्यानें आतां आपल्या घराकडे गाडी फिरविली. जातां जातां चार आण्यांचा घोड्याला दाणा घेण्यास तो विसरला नाहीं. घरीं हमिदा नवऱ्याची वाट पाहात होती.

त्यानें आपली मळलेली तांबडी टोपी काढली. खाकी कोट घामानें बराच भिजला होता. मधून मधून फाटलेल्या जागेंतून त्याचें घामानें ओलें झालेलें काळें अंग दिसत होतें. विजार काढून तो आडव्या उभ्या पट्ट्याची रंगीत लुंगी नेसला. नळाखालीं आंघोळ करून तो घरांत आला. आज

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

शुक्रवार होता. तो मशिदींत जाऊन निमाज पढून आला. मुलें बाहेर खेळत होतीं. घोड्याला पाणी पाजून त्याला दाणा व गवत चारून तो जेवायला बसला. बरोबर मुलांनाहि त्यानें घेतलें होतें. समोर आलेलें साधेंसुधें जेवण त्यानें खलास केलें. नंतर थोडा वेळ त्यानें विश्रांति घेतली.

अडीच तीनचा सुमार होतांच, राहिलेले सात आणे बायकोच्या हवालीं करून त्यानें कपडे चढवले. घोड्याला बाहेर काढून त्यानें खोगीर वगैरे चढवलें. गाडी जुंपून थोडेंसें गवत खालच्या गोणपाटाच्या पिशवींत कोंबलें. लगाम हातीं घेऊन तो आपल्या घोड्यासकट पुन्हां बाहेर पडला. घोडा एकपरीनें सदा जवळ असणारा त्याचा मित्रच होता.

आतां संध्याकाळ झाली होती. भाडें मिळावयाचीं ठिकाणें कालमानाप्रमाणें बदलत असल्यामुळें तो एका मोठ्या सिनेमागृहासमोर जाऊन उभा राहिला. त्यानें बराच वेळ वाट पाहिली. सात वाजले होते. आतां थोड्याच वेळांत सिनेमा सुटणार म्हणून तो उत्कंठित अंतःकरणानें वाट पाहात होता.

झालें ! सुटला एकदांचा सिनेमा. एक शेट पुढें आले. हो ना करतांना त्याला आठ आण्याचें भाडें मिळालें. त्यानें गाडी हांकली.

आकाशांत ढग जमूं लागले होते. मधून मधून चमकणारी वीज, विजेच्या दिव्यांना लाजवूं लागली होती. थोड्याच वेळांत पाऊस पडणार अशीं चिन्हें दिसत होतीं. याकूबला आनंद वाटला. त्याच्याहि डोक्यांत एक आनंदी विचार विजेसारखा चमकून गेला. आकाशांतील ढगांप्रमाणेंच त्याच्या अंतःकरणांत गडगडाट होत होता.

थोड्याच वेळांत जोरानें पाऊस पडूं लागला. बऱ्याच छत्रीविहीन चालणाऱ्या लोकांची त्रेधा उडाली. याकूबला वाटलें, पर्वणी आली ! ह्या सोन्यासारख्या संधीचीच तो मघांपासून वाट पाहात होता. त्यांतच ट्रॅमच्या

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

तारा नादुरुस्त झाल्या ! त्याला मोठा आनंद झाला. आतां त्याला भाडें मिळणार होतेंच; शिवाय सौदा पटवून लोकांचें चालणार नव्हतें. तो सांगेल ती किंमत द्यावी लागणार होती. आतां त्याच्यापेक्षां लोकांनाच जास्त गरज होती.

छत्री संभाळीत एकजण पगडीवाले पुढें आले. 'परेलकु आता है क्या ?'

" हां साब ! दो रुपया पडेगा ! "

" नही डेढ रुपया देएंगा ! "

" नही नही ! हम् एकच बात बोलता है ! "

" अच्छा चलो ! "

आतां त्याला भाडें कसें झटकन् मिळालें ! त्यानें घोड्याला चाबूक हाणला. विजा कडाडत होत्या. पाऊस पडून त्याला ओला चिंब करीत होता. त्याला त्याची फारशी काळजी वाटली नाहीं. त्यानें भिजत भिजतच आंतील शेटियाला घरीं नेऊन पोहोंचविलें. त्याच्या हातीं दोन रुपये पडले.

आतां तो श्रीमंत झाला होता. त्याच्या खिशांत आतां अडीच रुपये खुळखुळत होते. त्याच्या डोक्यांत नाना विचार खेळूं लागले. झिम् झिम् पडणाऱ्या पावसाच्या सरींतून त्याला लांबचा लालहिरवा दिवा अंधुक अंधुक दिसूं लागला. नवाला पांच दहा मिनिटें होतीं. त्यानें घोड्याला चाबूक हाणला. दौड करत तो तीनचार मिनिटांत तेथें गेला. दुकान थोड्याच वेळांत बंद व्हावयाचें होतें. त्यानें आंत प्रवेश केला. पिंपाजवळ बसलेल्या पारशानें त्याला ग्लास भरून दिला.

पहिल्या दोन चार ग्लासांनाच तो शुद्धीवर होता. नंतर तो किती प्याला व किती पैसे खर्च झाले तें त्याला मुळींच समजलें नाहीं.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

दुकान बंद होतांच त्याला बाहेर यावें लागलें. पडत पडत तो आपल्या जागेवर चढला. लगाम हातांत घेतांच घोडा चालूं लागला. त्याच्या सभों-वार जग गरगर फिरत होतें. पण तो गाडीघोड्याला घेऊन नीट सरळ चालला होता. घोडा, आपण होऊनच, याकूबला घेऊन घरचा रस्ता काटत होता !



सध्यां याकूब स्वतःच्या जिवाचा राजा होता ! जिकडे तिकडे आनंद होता ! ! आशानिराशा यांचें त्याच्यावरील प्राबल्य त्या वेळेपुरतें नाहींसें झालें होतें ! तो पूर्ण बेफिकीर होता. जेव्हां येईल तेव्हां येईल शुद्धीवर !

पण शुद्धीवर आल्यावर मग......?

कुमार रघुवीर

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

अभ्यास

जगांत वावरतांना आपण नानाप्रकारचीं गरीब माणसें पाहातों. हमाल, टांगेवाले पाहातों; भाजीवाले, गवळी, रद्दी विकत घेणारे, कल्हई करणारे, भिकारी, फकीर, कारकून, शिपाई—कितीतरी माणसें पाहातों; पण त्यांच्या-बद्दल विशेष विचार करावयाला आपल्याला वेळ असतो कोठें? अन् संवयहि नसते. तो हमाल, कारकून, किंवा पट्टेवाला—त्यांच्या मनांत काय विचार, बेत चालले असतील, त्यांच्या आशानिराशा कोणत्या, त्यांचीं सुखदुःखें कोणतीं याबद्दल विचार करून त्यांच्याशीं समरस व्हावें तेव्हांच 'व्हिक्टोरिआवाल्या' सारखें मार्मिक व हुबेहूब शब्दचित्र काढतां येईल. करा बरें प्रयत्न आणि तुमच्या वारंवार नजरेस पडणाऱ्या अशाच एखाद्या माण-साचें शब्दचित्र रंगवा.

१. या शब्दचित्राचा जो शेवट केला आहे त्याविषयीं तुमचें काय म्हणणें आहे?
२. याकूब दारू कां पीत होता?
३. दिवसभराच्या दिनक्रमांत याकूबचे कोणते स्वभावधर्म दिसून आले ते निवडून सांगा.
४. "वेळीं त्याचा शेट कोण होईल हें सांगतां येत नव्हतें." याचा अर्थ काय?
५. या गोष्टीवरून मुंबईतील स्थळांची, लोकांची, त्यांच्या रहाणीची वगैरे काय माहिती होते ती बारकाईनें पाहून, दुसऱ्या स्थळाचें असेंच 'वाता-वरण' तयार करा.



CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

३२

तो पशूहि न धरी खंत

अस्वलास वेसण खाशी
घालून फिरे दरवेशी ॥ धृ० ॥

जंगलांत ज्याचें जगणें
मन माने तैसें फिरणें
जो क्रूर वन्य जातीनें
तो लोळण घे दाराशीं १

बस खालीं म्हणतां बसतो
धनि म्हणे 'ऊठ' मग उठतो
नाचून आणि दाखवितो
वेसणींत जादू ऐशी २

रस्त्यांत तमाशा त्याचा
क्षण इतरां तो मौजेचा
धंदा हा दरवेशाचा
तांब्याच्या जमती राशी ३

नृत्याचें त्याच्या असलें
खूप हें विडंबन चाले
जे अवतीं भवतीं जमले
आनंदच त्यांत तयांसी ४

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

तो पशूहि न धरी खंत
विसरला आपुली जात
तन्मय हो त्यांतच चित्त
हें जनावरच गुलहौशी ! ५

अज्ञातवासी

अभ्यास

१. हें सुंदर काव्य कोणत्या प्रकारचें आहे ? कवीला रस्त्यावर कवितेंत वर्णिलेला देखावा दिसला व त्यानें वस्तुस्थितिदर्शक काव्य केलें असें तुम्हांला वाटतें काय ? अस्वलावर हें विडंबनकाव्य आहे ? यांत कांहीं रूपक किंवा अन्योक्ति आहे काय ?

२. वस्तुस्थिति हुबेहूब रेखाटणें यालाहि कसब लागतें. अशा काव्यांचीहि किंमत कमी मानतां कामा नये. या दृष्टीनेंहि ही कविता वाचा.

३. कवीची अस्वलाबद्दलची वृत्ति कशी आहे ? या काव्यांत सात्विक संताप किंवा भावनांचा आवेग आहे काय ? एकंदर काव्याचें धोरण कसें आहे ?

३३

रबर

मांजराच्या पावलांनीं तिसऱ्या मजल्यावर गेलों. बंद खिडक्यांच्या फटींतून सूर्यकिरण डोकावत होते. मला पाहातांच पलंगावर बसलेला 'टम्या' गुर्रर करूं लागला. खोलींत पसरलेल्या कोंदट हवेमुळें, आधींच पापानें भारावलेलें माझें मन जास्तीच दडपून गेलें. टम्याला दबकावून मी खिडकीपाशीं गेलों व हळूच एक फट उघडली. दाराच्या कुरकुरण्यानें व प्रकाशाच्या झोतानें घाबरून कोळी आपल्या जाळ्यांत लपले. भिंतीवरच्या नेपोलियननें दिपून जाऊन डोळे मिचकावले. सभोंवार नजर टाकली व कोणी नाहींसें

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

पाहून लांड्या विजारीच्या खिशांतून एक लाल झगा घातलेलें रबर बाहेर काढलें. हाच माझा चोरीचा माल! ह्याच्याकरितां बाबांनीं चार दिवस धुमाकूळ माजविला होता. त्याचा तो लाल झगा! मऊ मऊ पांढरें अंग! "ह्यानें शाईसुद्धां खोडली आहे अं!" मी भिंतीवरचा डाग पुसून आश्चर्यानें ओरडलों.

"भाऊ काय करतोस रे?" पाठीमागून ताईनें एकदम विचारलें. मी दचकलों. मनी रागावली, म्हणजे तिच्या अंगावर जसे केस ताठ होतात, तसा माझ्या अंगावर केसन् केस ताठ उभा राहिला. घाईघाईनें मी रबर खिशांत कोंबलें. "म्हणे काय करतोस रे! आजीबाईच कीं नाहीं मोठी!" मी तिला वेडावत म्हटलें. "असं काय रे सदा हिडीस-फिडीस करत असतोस? आम्ही तुझ्या कोणीच नाहीं वाटतं?" ताईनें डोळ्यांत पाणी आणून म्हटलें.

एकदां वाटलें सांगून टाकावें झालें ताईला, पण—बायकांच्या पोटांत कांहीं राहत नाहीं असें बाबा नाहीं का परवां म्हणाले? "एऽऽहे लागली लगेच मुसमुसायला! असल्या रडक्या मुलीला कोण सांगणार बुवा?" मी कांहीं तरी युक्ति शोधीत म्हटलें. "हे बघ पुसले" ताईनें परकरानें डोळे पुसून वर बघितलें; "आतां सांग ना!" मी एकदम खिडकीकडे वळलों "ओह्हो! किती सुंदर खारीचीं पिल्लें! चलचल ताई आपण त्यांना पकडूं!" 'कुठें कुठें' करीत ताई खिडकींतून वांकून पाहूं लागली. मी पाऊल न वाजवतांच जिन्याकडे वळलों. तोंच···भावड्या! फसवतोस काय मला! थांब, बाबा आले कीं सांगतें तुमचें रबर भाऊनें चोरलें म्हणून!"

ताईचे शब्द कानीं पडले. मी तसाच मागें वळलों. माझी मुद्रा पहा-तांच ताईचा चेहरा खर्कन् उतरला. "बाबांना सांगीन म्हणे" मी सरळ

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

तिचा कान धरून तिच्या दोन तोंडांत भडकाविल्या. ती भोकांड पसरून खालीं गेली. आतां खालीं जाणें म्हणजे आईचा प्रसाद खाणें हें पक्कें ठाऊक असल्यामुळें मी वरच एका कपाटाआड दडलों!

"वस्या, ए वस्या! कार्टी एक क्षणभर चैन पडूं देत नाहीं. आणि तूं ग कशाला गेली होतीस वर धडपडायला." आईचे शब्द व पाठीमागून दोन धपाटे ऐकूं आले.

मी कपाटामागें लपत उगीचच ओले झालेले डोळे पुसले.

"वसंत म्हणून बाबांची हांक ऐकूं येतांच मुकाट्यानें जिन्याकडे वळलों. बाबांचा रागीट स्वभाव मला पूर्णपणें ठाऊक होता. दाराशीं पोंचतांच माझ्या तोंडाला कोरड सुटली, घामाचे ओघळ सुटूं लागले. कसेबसे अश्रू आवरून मी दिवाणखान्यांत जाऊन उभा राहिलों. बाबांनीं अजून पोशाख देखील काढला नव्हता. त्यांचे आधींचेच पिंगट डोळे रागानें जळजळीत निखाऱ्यासारखे दिसत होते. त्यांची नजर चुकविण्याकरितां मी बाजूला पाहिलें. आई, बाळू, माई, ताई एका कोपऱ्यांत घोळका करून उभीं होतीं.

"आजच्या नाटकाला बरीच गर्दी दिसते आहे" मी बाबांच्याकडे जातां जातां पुटपुटलों.

बाबा चष्म्याच्या भिंगांतून सारखे रोखून पाहात होते. माझ्या छातींत कोणी तरी जोरानें ढवळत आहे असें त्यांच्या नजरेखालीं मला वाटलें. त्यांनीं पुढें केलेल्या हातावर मी मुकाट्यानें रबर टाकलें.

आई, माई आपआपसांत कुजबुजूं लागलीं. 'बाबा' माईनें हळूच एक हांक मारली. बाबांनीं तिला हातानेंच चूप बसविलें. त्यांच्या कपाळावर एक आठी पडली, डोळ्याखालीं सुरकुत्यांचें जाळें खोल झालें.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

" वसंत ! तूं हें कोठून काढलेंस ? " बाबांनीं मला विचारलें. त्यांचे शब्द मुळींच कठोर नव्हते. पण मला एकदम भीति वाटूं लागली. मीं माईकडे केविलवाण्या नजरेनें पाहिलें. आई–बाळूचे चेहेरे अश्रुबिंदूंतून थरथर कापल्यासारखे दिसले. आणि ताई ! ताईला हंसतांना पाहून खालचा ओठ रक्त येईपर्यंत मीं चावला. ' तुमच्या टेबलावरून घेतलें–' मी वर मान करून खणखणीत स्वरांत उत्तर दिलें व बाबांच्या नजरेशीं नजर भिडविली.



आतांपर्यंत मारूं का नको ह्या विचारांनीं डळमळणारा बाबांचा चेहरा एकदम कठोर झाला.

" आणि उद्धटपणानें वर बोलतो आहे बेशरम–" असें म्हणून बाबांनीं खाडकन् एक तोंडांत भडकावली.

" आई ग ! " मी कळवळलों.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

" पोराचा जीव का घ्यावयाचा आहे ? " आईनें पोटाशीं धरून पांची बोटें उठलेल्या माझ्या गालावर हात ठेवीत म्हटलें.

" बाबा ! " माईनें जरा मोठ्यानें हाक मारली.

मीं चोरून ताईकडे पाहिलें तों तिच्या डोळ्यांतून पाणी गळत होतें. मला आनंद झाला. तिला आणखी रडविण्याकरितां मी बाबांच्या समोर जाऊन उभा राहिलों.

सप्–सप्–सप्–अंगावर वेत फुटला. बाबांचा हात थांबला. आई, बाळू, माई अस्पष्ट प्रकाशांत डोक्यावर उभे असल्यासारखे दिसले. शरीर हलकें होऊन पतंगाप्रमाणें हवेंत तरंगत होतें.

पण मला मागें कोण ओढतें आहे...मी मोठ्या प्रयासानें जड डोळे उघडून पाहिलें. ताई ! ताईच का ही ?...ताई आपले दोन्ही हात माझ्या गळ्यांत घालून, गालाशीं गाल घासत स्वतःच्या अश्रूंनीं माझे कोरडे पडलेले डोळे भिजवीत होती.

सर्वांग ठणकत असतांहि आनंदानें हंसलों व कोरड्या पडलेल्या ओठांनीं ताईचा एक मुका घेतला.

मधुसूदन रानडे

परिचय

कादंबरी म्हणजे भली मोठी–सबंध आयुष्याची–गोष्ट. कथा ही त्या मानानें लहान–आयुष्यांतील एकाद्या महत्त्वाच्या भागापुरती–गोष्ट; तर लघुकथा म्हणजे चिंगुलीशी आयुष्यांतील एकाद्या विशेष चटकदार प्रसंगाविषयींची गोष्ट.

या लघुकथेंत, एका मुलानें रबर चोरलें व बापानें त्याला सपाटून शिक्षा केली हा प्रसंग वर्णिला आहे. गोष्ट बोधपर आहे काय ? रबर चोरूं नये, बाबा शिक्षा करतील हा नीतिपाठ या कथेंत दिला आहे काय ? अर्थात् नाहीं. या प्रसंगाच्या नीमित्तानें मुलांचें मानसचित्र तुम्हांला दाखविलें आहे. कशी गमतीची गुंतागुंत आहे पाहा. वसंताला आधीं ताईचा राग येतो, त्याला मार बसतांच प्रथम ताईला बरें वाटतें पण मग वाईट वाटतें; तिला वाईट वाटलेलें पाहून त्यांतल्या त्यांत वसंताला समाधान वाटतें व तिला अधिक वाईट वाटावें म्हणून तो अधिक मार खाण्यास तयार होतो.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

अधिक माराचा परिणाम ताईचे वशाच्या गळ्यांत हात अन् वशानें प्रेमानें घेतलेला ताईचा मुका. कशी गंमत आहे! कशीं असतात लहान मुलांचीं लहरी मनें! जसा वारा वाहील तशीं झुकतात तीं. हे बाबा कसे काय आहेत? त्यांना कोणतीं व किती विशेषणें लावाल?

अभ्यास

१. आरंभाला कशी मौज आहे पाहा. मांजराच्या पावलानें वर गेलेल्या वसंताला मांजर आढळतें. लहान मुलें चोरी कां करितात? वशानें रबर कां चोरलें?
२. अधोरेखित शब्दांतील कल्पना स्पष्ट करा.
३. इंग्रजी भाषेंतील नपुंसकलिंगी शब्द मराठींत घेतांना तो कसा वापरावा याविषयीं मुळींच नियम नसल्यामुळें प्रांतपरत्वें फार घोटाळा उडतो. उदा० तें, तो रबर; तें, ती बिल्डींग; तें, तो कोच; तें, ती मशीन असे अनेक शब्द आढळतील.

३४

पांडुतात्यांची झोंप

तात्यांच्या बेसुमार झोंपाळूपणामुळें त्यांची स्वतःची कमी गैरसोय होई असें नाहीं. जेवणाव्यतिरिक्त इतर प्रसंगीं ते वेळेवर हजर झाले आहेत असें बहुधा व्हावयाचें नाहीं. श्रावणीच्या दिवशीं ते पंचगव्यप्राशनाच्या पुण्यप्रसंगीं बहुधा गैरहजर राहून, सातूच्या पिठाचे गोळे खाण्याचे वेळीं मात्र येऊन दत्त म्हणून उभे राहावयाचे! स्नेह्याच्या घरची गौरीची आरास करण्याच्या कामीं मदत करण्याची त्यांना मोठी हौस. पण बेटी झोंप त्यांच्या उपकारशीलत्वाच्या नेहमीं आड यावयाची. आरास सुरू होण्यापूर्वीं ते जे निजावयाचे ते निमंत्रित मंडळीस हरभऱ्याची डाळ व पन्हें वांटण्याच्या संधीस जागे व्हावयाचे! कीर्तनप्रसंगीं व सत्यनारायणाच्या कथेस प्रसाद वांटण्यापूर्वीं ते बहुधा जावयाचे नाहींत, आणि या प्रकारें सुरसकथाश्रवणास नेहमीं मुकावयाचे! बाकी त्या लाभास घोरण्यानें इतरांस मुकविण्यापेक्षां स्वतः मुकणें हें एका दृष्टीनें, निरपेक्षपणाचेंच होय यांत संशय नाहीं.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

झोंपेंत गेलेल्या वेळाचें तात्यांना मुळींच भान राहत नसे. उगीच कोठें डुलकी येते न येते तोंच आपलें घड्याळ दोन दोन, तीन तीन तासांची मजल मारितें, अर्थात तें मनस्वी जलद म्हणजे पांच मिनिटांत एक तास या वेगानें चालतें असा त्यांचा बरेच दिवस समज होता. म्हणून त्यांनीं तें दुरुस्त करण्याकरितां अनेक वेळां घड्याळजीस देऊन पाहिलें, तरी त्याची गति मंद होण्याचें चिन्ह दिसेना. इकडे दुरुस्तीच्या खर्चाची गति सारखी वाढतच होती. अखेरीस दुरुस्तीचा खर्च घड्याळाच्या किंमतीच्या दसपटीवर गेला, तेव्हां त्यांनीं जुन्या घड्याळास रजा देण्याचें व नवें विकत घेण्याचें ठरविलें, आणि त्याकरितां ते एका घड्याळाच्या दुकानीं गेले. तेथील सर्व घड्याळांचे कांटे नाटकप्रयोगांतील नर्तकींच्या हाताप्रमाणें एकसारखे फिरतांना पाहून आणि त्यांतील व आपल्या घड्याळांतील वेळ तंतोतंत जुळत असलेली पाहून त्यांनीं आपला बेत फिरविला, आणि जुनें घड्याळ परत घरीं नेलें. भपकेबाज दुकानांतला कोरा व सुंदर माल दृष्टीस पडल्यावर तो न घेतां जुनाच माल वापरण्याची इच्छा होणें फार विरळा दिसून येतें. पण तो चमत्कार त्या दिवशीं तात्यांच्या बाबतींत घडून आला खरा. घरीं आल्यावर तात्या जरा लवंडले. त्यांचा डोळा लागावयास व त्यांचें घड्याळ बंद पडण्यास एकच गांठ पडली. त्याचे कांटे तीन तास त्याच्या मालकाच्या अवयवांप्रमाणें निश्चल राहिले. तात्या उठून पाहतात तों कांटे पूर्वींच्याच ठिकाणीं. घड्याळाची गति आपोआप दुरुस्त झालेली पाहून त्यांना अर्थातच आनंद झाला. “ नवें घड्याळ घेण्याची धमकी देतांच बेटें कसें वाटेवर आलें ! ” असे उद्गार त्यांच्या तोंडून बाहेर पडले. या वेळेपासून तें घड्याळ त्यांच्या गळ्यांतील ताईत होऊन बसलें; तें इतकें, कीं, कालगतीनें त्याचे दोन्ही कांटे मोडून गळून पडले तरी तात्या वेळ पाहाण्याकरितां त्यावांचून दुसऱ्या

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

कोणत्याहि घड्याळाचा उपयोग करीत नाहींत. आणि त्यांना दुसरें घड्याळ आपल्या घड्याळा इतकें भरंवशालायक वाटतहि नाहीं.

आगगाडी पकडावयाची असली म्हणजे तात्यांच्या जिवाची धांदल विचारूं नये. पण जेवणानंतर लहानशी सुरसुरी आली, कीं तिनें सारी घाण व्हावयाची. "या गाड्यांच्या वेळा नेहमीं गैरसोईच्या असावयाच्या. जेवण झाल्यावर जरा स्वस्थपणें पडूं म्हटलें तर सोय नाहीं. झोंपेच्या वेळीं गाडीनें कोणत्याहि स्टेशनवर येतां कामा नये, असा नियम करण्याबद्दल कंपनीकडे एक अर्ज जरूर केला पाहिजे. इंग्रजांचें सारेंच गैरसोयीचें. बंगल्याचीच गोष्ट ध्याना. ज्या घराला खुंट्या नाहींत, कोनाडे नाहींत, फडताळें नाहींत, माडी नाहीं, ज्या घराला सुरक्षितपणा नाहीं, जें घर बाहेरून लावायला गेलें कीं, आंतून बंद होऊन मालकालाच बाहेर तिष्ठत ठेवतें, तें घर खुशाल बंगला म्हणून समजावें! नाहीं म्हणायला आराम-खुर्ची, सोडा, लिंबु, आईस्क्रीम, अशा कांहीं अपवादादाखल सोईस्कर वस्तु इंग्रजांमध्येंहि आहेत." यांतील कांहीं सोईस्कर वस्तूंच्या कल्पनेनें तात्यांच्या तोंडाला पाणी न सुटतें तर त्यांचें वक्तृत्व आणखीहि कितीतरी वेळ चालतें.

तात्यांना मोठ्या शिकस्तीनें गाडी सांपडली तरी ते वेळेवर मुक्कामाला पोंचतील याचा मुळींच नेम नसे. ते झोंपेच्या भरांत नेहमीं मुक्कामाच्या पुढें दोन तीन स्टेशनें जावयाचे व तेथें उतरून झालेल्या चुकीची दुरुस्ती करण्याकरतां उलट दिशेनें येणाऱ्या गाडीनें परत यावयास निघावयाचे! हा प्रकार घड्याळाच्या लंबकाप्रमाणें दोन तीन वेळां झाल्यावर मग कोठें त्याना मुक्कामाचें ठिकाण दिसावयाचें! एकदां आगगाडीच्या एका लहान फाट्याचा प्रवास त्यांना एकाच तिकिटावर रात्रींतून दोन तीन वेळां घडला! एकदां ते मुंबईहून पुण्यास जाणाऱ्या गाडीची कल्याण स्टेशनवर वाट

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

पाहात बसले असतां—नव्हे निजले असतां—त्यांच्या लागोपाठ तीन गाड्या चुकल्या. दर खेपेस गाडीनें निघावयाची शिटी फुंकल्यावर तात्या जागे व्हायचे आणि तिच्या मागें धूम ठोकूनहि ती हातीं लागत नाहीं हें कळून आल्यावर हात हालवीत परत यावयाचे ! पुढील गाडीस अजून अवकाश आहे, तितक्यांत आणखी एक झोंप काढण्यास हरकत नाहीं, अशा भरंवशावर ते पुनः लवंडायचे, आणि पुनः पूर्वीच्याच प्रकाराची आवृत्ति व्हावयाची. तिसऱ्या खेपेस तर डोळ्यांवरची झांपड पुरती उडालेली नसल्यामुळें ते गाडीच्या मागें धांवावयाचें सोडून उलट दिशेला धांवत सुटले! चवथ्या खेपेस गाडी सांपडण्याचें कारण एवढेंच, कीं त्यांनीं गाडी येण्यापूर्वीं आपणास उठविण्याबद्दल हमालास बजाविलें होतें. आपणांस उठावयास उशीर लागल्यास 'जेवण तयार आहे,' हा मंत्र कानांत उच्चारावयास त्यांनीं मुद्दाम सांगितलें होतें.

तात्यांनीं अलीकडे शरीराच्या वाटेल त्या अवस्थेंत झोंप यावी अशी संवय जडवून घेतली आहे. ते बसून झोंप घेतात, उभ्यानें झोंप घेतात. फार काय पण चालतांनाहि झोंप घेतात. त्यांना पळत पळत झोंप घेतांना मात्र अजून कोणी पाहिलें नाहीं. पण भविष्यकालाच्या पोटांत काय काय चमत्कार दडून राहिले आहेत हें कुणी सांगावें ?

श्री. कृ. कोल्हटकर

अभ्यास

हा गमतीचा लेख वाचतांना खूप हंसूं येतें कीं नाहीं ? अशा प्रकारच्या विनोदाची पद्धत मराठी भाषेंत प्रथम **कोल्हटकरांनीं** पाडली. त्यापूर्वी विदूषकांच्या वेड्यावांकड्या उड्या व शब्दांवरील बाष्कळ कोट्या यांतच विनोद मानण्यांत येत असे. कल्पनांची चमत्कृति, उपहास, विकृति यांनीं साध्य होणारा बौद्धिक विनोद श्रीपाद कृष्णांनींच सुरू केला.

१. या लेखांत तुम्हांला हंसूं कां येतें ?

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

२. बसतां, उठतां, चालतांना, पळतांना झोंप घेणारा पांडुतात्या खरोखरीच्या जगांत असेल काय ? नाहीं. एखादा झोंपाळू माणूस घ्यावयाचा; झोंपेमुळें कुठेंहि जाण्यास, आगगाडी गांठण्यास त्याला लागलेला विलंब लक्षांत आणावयाचा व या वास्तविक पायावर अतिशयोक्ति व कल्पना यांची भली मोठी इमारत उभारावयाची, हेंच या विनोदाचें बीज आहे.

३. या लेखांत अतिशयोक्ति आहेच पण कोठें टवाळी केलेली आहे काय ? शोधा. अतिशयोक्तिपर विनोदाचीं दोनतीन ठळक उदाहरणें दाखवा व मनांत चटकन् भरणाऱ्या अशा उपमा व दाखले निवडा.

४. 'सुरसुरी' म्हणजे काय ?

३५

खेड्यांतील घराकडे

(चाल–केशवकरणी)

[मोठ्या उत्सुकतेनें शहरवासी विद्यार्थी आपल्या खेड्यांतील घराकडे जात आहे—]

खुणा गांवच्या दिसूं लागल्या स्पष्ट मला लोचनीं
उडे किति खळबळ हृदयांतुनी.
देशमुखांचीं हिरवीं सुंदर शेतें हीं शोभती
वाडगीं त्यांत दिसूं लागती.
माळावर पातलों लागला दिसूं गांव–कोस हा
कायतरी मौज कथूं ही पहा !
ही चोंहिकडे पसरली दिसे हिरवळ
तें लांब दूरवर नदिचें जल निश्चल
हे कळस अलिकडे देवीचें देउळ

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

वट–पिंपळ ते आणिक दुसरी शोभे वृक्षावली
त्यांत तीं घरें गडप जाहलीं.
गुरें वासरें दिसूं लागलीं चरतांना या इथें
गुराखी तसे तयामागुते.
बाळपणींचे मित्र यामधें असतिल माझे किती
दृष्टिही आश्चर्यें लाविती.
किती आदरें खुल्या दिलानें मजकडेच धावती
रीत ही प्रेमळ यांची किती !
"काय राव होतां शहरामधिं किति दिन
खबर बात आम्हां सम्दी द्या सांगुन"
—हीं गोड भाषणें त्यांच्यांतिल ऐकुन
मोठ्या प्रेमानें मी त्यांचा निरोप तो घेउनी
चाललों पहा पुढें हर्षुनी.
एक टाकितां पाऊल पुढती हृदय मुदें हें उडे
त्यांत ही विचारावली उठे.
जायाचें हळु परसाच्या त्या मागिल दारांतुनी
कसें सर्वांनाहि चुकवुनी.
असतिल ताई भाऊ खेळत 'हप्पि' तिथें अंगणीं
मौज मी देइन ही उडवुनी !
मी चोरचोरुनी मागुति हळु जाइन
तो सागरगोटा वरचेवर झेलिन
आश्चर्यें बघतिल वरति सारेजण
माउलीस मग थक्क कराया आम्ही जाऊं कसें
धूम ती धाव घेउनी तसें

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

बघतां बघतां मारुतिचें हें देवालय लागलें
किती परि चंचल मन जाहलें.
चांफा दिसतो स्पष्ट आमुचा येथुन परसांतला
पहा किति उंच तरी वाढला !
माळवदावर उभे राहुनी अरे परंतू असें
पाहतें मजकडे कोणसें !
हं—कळलें—ही तर माझी ताई गडे !
किती रोखुन टाकी दृष्टी ही मजकडे
घाईंत सांगण्या गेली आईकडे,
दारीं येइल अतां माउली ओवाळाया मला
पूर्विंचा बेत विफ़ल जाहला !

वा. भा. पाठक

प रि च य

किती साधी पण गोड कविता ! तुमच्यापैकीं ज्यांचीं घरें खेडेगांवीं आहेत त्यांना हिच्यांतील मर्म कळेल व सहानुभवाचा आनंदहि वाटेल. या विद्यार्थ्याला आधीं देशमुखांचीं परिचित शेतें दिसतात, मग तो माळ चढून येतो, गांवकूस दिसतें, पलीकडच्या देवीचें देऊळ, वडपिंपळ दिसूं लागतात. वाटेंत गुरें व गुराखी भेटतात. तो मागच्या दारानें घरांत शिरून सगळ्यांना आश्चर्यचकित करून सोडीन म्हणतो; पण ताईनें त्याला दुरून पाहिलें व आईला वर्दी गेली. बिचाऱ्याची (?) गोड निराशा झाली.

अ भ्या स

१. तुमच्या गांवचें असें चित्रपटाप्रमाणें क्रमशः चित्र डोळ्यांसमोर आणा व वर्णन करा. तुम्हाला गांव नसेल तर आजोळचें वर्णन करा.
२. जमल्यास अस्पष्ट गांवकूस व मागें त्याच्या देवीच्या देवळाचें शिखर व बाजूस एक झाड असें चित्र काढा.
३. 'हप्पी' म्हणजे कोणता खेळ ? माळवद कौलारू छप्पर नसून वर गच्ची-प्रमाणें असलेली जागा; धावें.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

३६

कांहीं जुने कथाप्रकार

—१—

दोन घुबडें

चतुर व चाणाक्ष अशा एका वजिरानें आपल्या धन्याला—सुल्तानाला—सांगितलेली ही गोष्ट आहे.

अल्—बसरा या गांवीं एक व अल्—मोसल या गांवीं एक अशीं दोन घुबडें राहतात. परवां अल्—बसरा येथील घुबडानें दुसऱ्या घुबडाला म्हटलें, 'तुझी लेक माझ्या लेकाला दे कीं!'

अल्—मोसल येथील घुबड यावर उत्तरलें, "माझी लेक तुझ्या लेकाला द्यायला मी तयार आहें. मात्र एकच अट आहे. तिच्याबद्दल हुंडा म्हणून त्वां मला शंभर उजाड गांवें द्यावीं."

अल्—बसरा येथील घुबडानें प्रत्युत्तर दिलें, "त्वां केलेली ही मागणी आतांच पुरी करतां येणें शक्य नाहीं. पण अल्लानें जर का सुल्तानाला आणखी एक वर्ष आयुष्य दिलें तर तुझी मागणी मी अगदीं व्यवस्थित पुरी करीन!"

—२—

उधळ्या मुलाची कथा

आणि भगवान् ख्रिस्त आपल्या शिष्यांना बोलता झाला :—

एका माणसाला दोन मुलगे होते.

त्यांतला धाकटा बापाला म्हणाला, बाबा, "माझ्या वांट्याला जेवढी मिळकत येते तेवढी मला देऊन टाका." तेव्हां त्यानें आपली मिळकत

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

त्यांना वाटून दिली. आणि नंतर फार दिवस गेले नाहींत तोंच तो धाकटा मुलगा आपलें सर्व कांहीं होतें तें घेऊन दूर देशीं प्रवासास गेला; व तिकडे स्वैरपणानें वागून आपली सारी चीजवस्तु त्यानें उधळली.

त्यानें अशी उधळपट्टी केल्यावर, त्या देशांत फार मोठा दुष्काळ पडला. त्याला सारखी चणचण पडूं लागली. तेव्हां तेथील एका माणसाच्या चाकरीस तो राहिला. त्या माणसानें त्याला डुकरें चारण्याकरितां आपल्या शेतावर पाठविलें. तिथें, डुकरें खात तें तूस जरी पोटांत भरायला मिळालें तरी आनंद आहे, असें मानण्याइतकी त्याची स्थिति झाली. कुणीहि माणूस त्याला कांहीं देईना.

आणि जेव्हां तो शुद्धीवर आला तेव्हां तो म्हणूं लागला, "माझ्या बापाच्या घरीं कितीतरी मोलकऱ्यांना पुरून उरेल इतकी भाकरी मिळते; आणि मी मात्र भुकेनें तडफडत आहें. बाबांकडेच मी आतां जातों आणि त्यांना म्हणतों कीं, "बाबा, मी परमेश्वराचा, तसाच तुमचाहि गुन्हा केला आहे. तुमचा पुत्र म्हणवून घेण्यास मी पात्र नाहीं. तुमच्या मोलकऱ्यांपैकीं एक म्हणून मला ठेवा."

असें म्हणून तो उठला आणि आपल्या बापाकडे आला. तो बराच दूर असतांना बापानें त्याला पाहिलें. बाप सद्गदित झाला. त्यानें धांवत जाऊन त्याच्या खांद्यावर मान टाकली व त्याचें चुंबन घेतलें.

मुलगा बापाला म्हणाला, "बाबा, परमेश्वराच्या व तुमच्या दृष्टीनें मीं पाप केलें आहे. तुमचा पुत्र म्हणवून घेण्यास मी पात्र नाहीं."

बापानें आपल्या नोकरांना हांका मारल्या आणि सांगितलें, "अरे सर्वांत चांगला असेल तो अंगरखा आणा आणि याच्या अंगावर चढवा, बोटांत आंगठी आणि पायांत पायतण घाला. आणि हें पाहा, तें मुद्दाम

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

पोसवून गुबगुबीत केलेलें वासरूं इथें आणा आणि कापा. आपण तें खाऊं आणि मग आनंद करूं; कारण माझा हा मला मेलेला मुलगा जिवंत होऊन आला आहे; हरवला होता तो सांपडला आहे." मग ते सारे आनंदोत्सवांत मग्न झाले.

या वेळीं, थोरला मुलगा शेतांत होता. तो तिकडून जेव्हां परतला व घराचे जवळ जवळ आला, तेव्हां त्याच्या कानीं गायनाचे सूर व नृत्याचे

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

नाद पडूं लागले. "काय आहे हें!" त्यानें एका चाकराला बोलावून पुसलें. तो म्हणाला, "आपले धाकटे बंधु आले आहेत. ते सुरक्षित परत आल्यामुळें त्यांच्याकरितां घरांतलें पोसकें वासरूं त्यांनीं मारलें आहे." हें ऐकून तो रागावला. तो घरांत जाईचना. त्यावरून बाप बाहेर आला व समजावणी करूं लागला. तेव्हां तो म्हणाला, "आज इतकीं वर्षें मी तुमची सेवा करतों आहें, तुमच्या आज्ञेबाहेर एकदांहि कधीं गेलों नाहीं; असें असतां एक कोकरूं सुद्धां मारावयास देऊन मित्रमंडळीसह मजा करण्यास तुम्हीं मला कधीं संधी दिली नाहीं. आणि ज्यानें तुमची मिळकत वाईट संगतींत फस्त करून टाकली, तो हा तुमचा मुलगा आल्याबरोबर याच्याकरितां मात्र पोसकें वासरूं मारलेंत." त्यावर बाप म्हणाला, "मुला, तूं तर माझ्या नेहमींच सांगतीं आहेस, आणि जें माझें आहे तें सारें तुझेंच आहे. आज तुझा हा भाऊ आपल्याला मेल्यासारखा होता तो जिवंत होऊन आला आहे; हरवला होता तो सांपडला आहे. याकरितां आपण आनंदानें उत्सव करणें हें उचित होय."

अनुवादक : **गं. दे. खानोलकर**

अ भ्या स

वर कांहीं जुन्या कथाप्रकारांचा तुम्हांला परिचय करून दिला आहे. पहिला चुटका हा एक लहानशी अरबी बोधकथा आहे. ही इसापच्या गोष्टीसारखी आहे.

दुसरा उतारा "उधळ्या मुलाची कथा" ही बायबलमधील एक प्रसिद्ध दृष्टांतपर कथा आहे. अशा प्रकारच्या गोष्टींच्या रूपानें सामान्य जनांस उपदेश करण्याची ख्रिस्ताची पद्धत होती. या कथेची भाषा किती साधी व सुटसुटीत आहे पाहा! अगदीं साध्या पण ओजस्वी भाषेविषयीं बायबलचा लौकिक आहे. मूळ बायबल किंवा रावबहादूर आठवले यांनीं त्याचें केलेलें भाषांतर, अवश्य वाचा. हा दृष्टांत उकलून बाप, वडिल मुलगा, व उधळा मुलगा कोण तें सांगा.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

अशाच प्रकारचे भगवान् बुद्धानें सांगितलेले दृष्टांत 'जातककथा" म्हणून प्रसिद्ध आहेत. बायबलमध्यें वर्णिलेल्या प्रसंगांवर युरोपांतील नामांकित चित्रकारांनीं अनेक चित्रें काढलीं आहेत. त्यांपैकीं रेम्ब्रांट या चित्रकारानें तांब्याच्या पत्र्यावर एकदम खोदून तयार केलेलें चित्र येथें दिलें आहे. मुलाची काय दशा झाली आहे पाहा!! आणि हे भाव दर्शविणाऱ्या रेषा चित्रकारानें किती बिनचूक काढल्या आहेत!

३७

तृणाची थोरवी

तृण—गवत—किती लहान व चिमुकलें. तरी पण त्याचा महिमा फार मोठा आहे. तृण हें सर्व विश्वास गुरुस्थानीं शोभण्यासारखें आहे. वर्षाऋतूस प्रारंभ झाला म्हणजे जेथें पूर्वीं कांहींहि दिसत नव्हतें, जेथें रखरखीत व उजाड भासत होतें, ज्या जमिनीवर व ज्या पर्वतशिखरांकडे दृष्टी फेंकली असतां रखरखीतपणामुळें दिपल्यासारखें होई तीच भूमि, तेच पर्वत, तींच डोंगरांचीं अंगें, प्रत्यंगें किती सुंदर व रमणीय दिसूं लागतात! डोळ्यास संतोषदायक अशी हिरवी हिरवी नव्या नवाळीची मृदु लव सर्वत्र दिसूं लागते. कोठेंहि चौफेर दृष्टि फेका. जेथें जेथें म्हणून जागा असेल तेथें तेथें हें तृण सर्वत्र उगवलेलें असतें. घराच्या कौलांवर, दगडांच्या अंगावर, वृक्षांच्या स्कंधावर गवत उगवलेलें दिसेल. या तृणास उगवण्यासाठीं वाटेल तें ठिकाण चालतें. वाटेल त्या ठिकाणीं तें आपली सोय करून घेतें. अमुकच ठिकाणीं मी वाढेन असें त्याला वाटत नाहीं. परिस्थितीचा प्रतिबंध तृणाला कधींच नसतो.

लहानसें—इवलेंसें गवत. पण हें मूठभर उंचीचें असलें तरी सारी धरणी तें व्यापून टाकतें. सर्व भूतलास आपल्या पायांनीं त्यानें आक्रांत करून सोडलें

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

आहे. लहान वस्तूंतहि ऐक्यामुळें व दृढनिश्चयामुळें पाहा कसें सामर्थ्य उत्पन्न होतें तें. एवढेंसें गवत! परंतु त्यानें विस्तृत पृथ्वीस हिरव्या शालूनें नटविली आहे. या तृणानें डोंगराच्या पाठीवर हिरव्या झुली घातल्या आहेत, व पर्वतांच्या माथ्यावर हिरवे मंदिल बांधले आहेत.

कधीं कधीं हें तृण उंचहि वाढतें. वाऱ्याच्या झुळकेसरशीं तें मंद मंद डुलत असतें. कबीराचा मुलगा कमाल हातांत विळा घेऊन गवत कापण्यासाठीं गेला असतां या तृणाच्या मंद डोलण्यानेंच तो मोहून गेला व प्रेमाचा धडा शिकला. त्या डोलणाऱ्या तृणानें माना हालवून, कमालास सांगितलें, "कापूं नको, नको रे कापूं." जरी या तृणाची प्रार्थना कोणीं न ऐकतां त्याला कापलें तरी तें कुरकुर करीत नाहीं. सारा देह त्या तृणानें परार्थच दिलेला असतो. मनुष्यें त्यास कापून काढतात, आगगाडीचे मालक त्यास आग लावतात, गुरें त्यावर चरतात व दातांनीं कुरतडतात. परंतु तें तृण कुरकुर करीत नाहीं. उलट जरा पाऊस पडला, व चार दंवाचे थेंब पडले तर तें पुन्हां वैभवानें वाढूं लागतें, डुलूं लागतें व खुलूं लागतें. तृणाचें हें वाढणें कोणासाठीं आहे? तृणाची हिरवी संपत्ति कोणासाठीं आहे! तें वैभव दुसऱ्यानें लुटावें, त्या वैभवानें दुसऱ्यानें संपन्न व्हावें, गाईगुरांनीं पुष्ट व्हावें, व त्यांना दूध यावें म्हणून आहे.

तृण हें समदृष्टि आहे. कधीं कधीं त्याच्या मृदु अंगावर विषारी भुजंग पसरलेले असतात. त्या विषधरांस तें 'नाहीं' म्हणत नाहीं. आपला सुंदर मृदु देह त्यानें सर्वांसाठीं पसरला आहे. हरिणांसाठीं, गाईगुरांसाठीं, क्रूर जनावरांसाठीं, मनुष्यांसाठीं, सर्वांसाठीं हा गालीचा पसरलेला आहे. या हरितवर्णाच्या गादीचा वारस ज्याची इच्छा असेल तो आहे. कोणीहि येवो त्याला तेथें मज्जाव नाहीं.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

"हे तृणा, जगास सुखी करण्यासाठीं तूं पुनः पुनः अवतार घेतोस. रोज मरतोस व पुन्हां आनंदानें जन्मतोस. दुसऱ्याच्या उपयोगीं पडावें एवढेंच तुला माहित आहे. यांतच तुझें सुख, आनंद, यश सर्व कांहीं आहे. कोठेंहि जरा ओलावा मिळाला कीं पुरे; लगेच पायांनीं तुडवलेला, उन्हानें करपलेला असा तूं हंसूं लागतोस, डुलूं लागतोस. कोणी तुला उचलून फेकून देतील तर तेथेंहि योग्य परिस्थितीची तूं वाट पाहात बसतोस. तूं जाशील तेथें स्वर्ग निर्माण करतोस; ओसाड जागेस नंदनवन बनवतोस. सर्व उन्हाळ्यांत तूं मेल्यासारखा दिसतोस. तेव्हां तूं जगाला कंटाळून गेला आहेस असें वाटतें. मनुष्यांच्या, पशूंच्या लाथा खाऊन तूं उद्विग्न झाला आहेस असेंहि वाटतें. परंतु बा तृणा, केवढा तुझा उदार-पणा व केवढी तुझी थोरवी? तूं जगाच्या जाचास कंटाळत नाहींस, जगाचे आघात प्रत्यहीं सोसण्यास तूं सदा तयार. पुन्हां आकाश मेघमालेनें भरून आलें, मोत्यासारख्या पावसाच्या सरी सुरू झाल्या कीं, तूं आपलें वैभव पुन्हां मिरवतोस. तूं संधि वायां दवडीत नाहींस. मोठा पाऊस न पडतां चारच शिंतोडे आले, अथवा तेहि न मिळतां चार दंवाचे बिंदूच मिळाले तर तेवढ्यानेंहि मोत्यांचे हार घालून तूं शोभतोस. आजूबाजूचा दूरवरचाहि ओलावा तूं आपले चिमकुले हातपाय पसरून आपलासा करतोस. तूं श्रीमंत होतोस; परंतु तुझी श्रीमंती देण्यासाठीं आहे. तूं भिकारपणानेंच खरा शोभतोस; व मरणानेंच खरा जगतोस. दुसऱ्यासाठीं तूं सदैव मरतोस. म्हणूनच तूं अमर आहेस. तूं त्रेतायुगांत, सत्ययुगांत, द्वापारांत, कलींत सर्वदा आहेसच. या तुझ्या अमरत्वाचें साधन परो-पकारितेंत आहे.

बा तृणा, तूं तपोधनांची तपोभूमि आहेस, मृगांची आरामशय्या आहेस, व थकलेल्या भागलेल्या मानवांचें तूं विश्रांतिस्थान आहेस. कंदुक

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

क्रीडा वगैरे करणाऱ्या थोरामोठ्यांची तूं प्रिय वनस्थली आहेस. सर्व जगांतील उपवनें, उद्यानें, व पुष्पवनें यांचा तूं राजा आहेस. तूं जर तेथें नसशील तर सर्व शोभा विशोभित होईल. तुझ्याशिवाय फुलांचे चित्र-विचित्र ताटवे खुद्धन दिसणार नाहींत, व कारंजाचे तुषार तूं आजूबाजूस असल्याशिवाय शोभत नाहींत. तूं साधा पण अतीव सुंदर आहेस. साधेपणा व सरळपणा यांतच तुझी खरी रमणीयता आहे.

बा तृणा, तूं लहान परंतु तुझी महती अगम्य आहे. तुझें वर्णन मी कृपणमति किती करणार ? तुझें वर्णन करावयास तुझ्याप्रमाणें साधें, सरळ व परोपकारार्थ देह देणारें असें झालें पाहिजे."

पां. स. साने

अभ्यास

गवत ही एक क्षुद्र व क्षुल्लक वस्तु पण लेखकानें किती खुबीनें त्याचा गौरव गाइला आहे. भाषेचा झोक असा आहे कीं हटकून शिवरामपंत परांजप्यांची आठवण व्हावी. संस्कृत शब्द खचून भरले असून सुद्धां भाषेंत एक प्रकारचा साधेपणा व प्रसाद आहे. आम्ही खूण केलेलीं वाक्यें किती सुंदर आहेत पाहा !

१. या लेखांत गवताचे मुख्य कोणते गुण वर्णिले आहेत ?

२. हा लेख गवताची तुम्हांला माहिती देण्यासाठीं लिहिला आहे काय ? लेख लिहितांना लेखकाची कशा प्रकारची दृष्टि होती ?

३. 'हिरवी संपत्ति' ही कल्पना किती गोड आहे. असे कांहीं सुंदर वाक्प्रचार शोधा.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

३८

विरोळ्यानें काय शिकविलें ?

पांचसात दिवस पाऊस पडत राहिल्यामुळें मुठा नदीला बराच पूर आला होता. आमच्या पुणें शहरचे रस्ते काय, नाले काय, सगळेच चहा-डखोर ! म्युनिसिपालटीच्या व्यवस्थेचीं सारीं बिंगें जाणारायेणारांस ऐका-यला नको असतांहि, ते सांगत होते, आणि शिमग्याच्या सणाला अजून चारपांच महिने अवकाश असूनहि शिडकावाचे अंगरखे ज्याच्या त्याच्या अंगांत दिसत होते. विशेष गम्मत ही कीं, मी मी म्हणणारे सुधारकहि या पावसाळ्याच्या शिमग्यांत रंगत होते. पावसाची झिमझिम राहून राहून सुरू होती. अशा वेळीं आम्ही चारपांच जण, तंगड्या तोंडीत, बंडावर पाण्याची मजा पाहावयास गेलों. दोनहि नद्या पर्जन्याच्या प्रसादामुळें पाषाणहृदयी पित्याच्या कठोरपणास कंटाळून, माहेरास राम राम ठोकून वेगानें आपल्या प्रियकराकडे धांव घेत होत्या. त्यांनीं आपलीं वाळवंटें केव्हांच आक्रमून टाकिलीं होतीं. दोनहि कांठांस थडाथड थपडा देऊन त्या झपाट्यानें पुढें धांवत होत्या. संगमावर दोघींची गांठ पडल्यावर दोघी एकमेकींस कडकडून भेटल्या आणि एकजूट करून पुढें चालल्या. काय त्यांचा वेग ! केवढा जोर ! "आम्हांला कोंडून घालून बाहेर खडा पहारा करणारे आमचे पहाडी वडील ! त्यांनादेखील आम्हीं भीक घातली नाहीं; दोनहि अंगांनीं अडवीत आम्हांला चिमट्यांत धरूं पाहाणाऱ्या दरडींस आम्हीं जुमानिलें नाहीं; आपल्या लांबच लांब फेकलेल्या बाहूंनीं आम्हांला धरून ठेवूं पहा-णाऱ्या झाडांखोडांस आम्ही दाद दिली नाहीं ! त्या आम्ही आमच्या वाटेंत आडव्या पडणाऱ्या या भिंताडाला काय विचारतों ?" असें धिक्कारानें गर्जतच त्या आल्या. आणि बांधाला पायांखालीं तुडवीत त्याच्या

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

मानगुटावरून उड्या टाकून पुढें चालत्या झाल्या. त्यांना वाटेंत अडथळा केल्यामुळें त्यांचा किती संताप उडाला होता! एकदां बांधाला खालीं तुडवून-देखील त्यांचें समाधान झालें नाहीं असें दिसलें. कारण, चार पुरुष खोलींत उडी घेतल्यावरहि त्या उसळून पुनः परत बांधाला लाथाडायाला धांवत होत्या. त्यांच्या या आक्रस्ताळी सपाट्यांत कितीक दगडागोट्यांचा आणि विटाविटकरांचा चुराडा झाला असेल! कितीक झुडपांना त्यांनीं आपल्याबरोबर ओढीत नेलें असेल. कितीक मातीच्या ढिगाऱ्यांचा स्वाहा केला असेल! कितीक किड्याकिरड्यांना जलसमाधी दिली असेल! असेल कशाला? आम्ही पाहात उभे होतों तितक्यांतच एक मोठ्या विरोळ्याची व त्यांच्या पसरलेल्या केसांच्या कांहीं बटांची झटापट चाललेली आम्हांस दिसली—

गोविंदराव : नको बोवा हें पाहाणें! चला! आपल्याच्यानें आतां पाहावत नाहीं! बिचारा जरा डोकें वर काढितो न काढितो तोंच पुनः गुरफटला!

शंकरराव : अहो, असे घाबरतां काय? त्याची धडपड पाहाण्यांतच एक प्रकारची मौज आहे! ती जर पाहावयाची नाहीं तर मग इतक्या लांब आलांत कशाला?

वामनराव : ओहो! शाबास! चांगला वीतभर चढला कीं भिंतीवर! ती पाहा—तेथेंच चार बोटांवर भिंतींत एक फट आहे. ती जर बिचाऱ्याला दिसेल!........अरे, अरे—अरे!

कृष्णाजीपंत : गेला—दोन हात लांब गेला. आतां कसची ती फट त्याला दिसते! या भयंकर झोतापुढें त्याचें काय चालतें!

शंकरराव : काय चालतें? तो पाहा आला, पुनः गिरका घेऊन

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

परत भिंतीशीं आला ! त्याला जणों आपल्यामागें लागलेल्या प्रचंड शक्तीचें भानच नाहीं ! कोठें तरी बीळ मिळेल आणि आपण त्यांत शिरूं, ही त्याची एकच आशा केवढी दांडगी आहे ! त्या आशेच्या जोरावर त्याची सारी झटापट चालली आहे. वरून, मागून, खालून, बाजूनें इतके झोंके व तडाखे बसताहेत, पण त्याची तडफड बंद झाली आहे का ?

वामनराव : मला वाटतें, याची तडफड बंद होईल आणि तो जर नुसता स्वस्थ पडून राहील, तरच त्याचें कल्याण होईल. निदान तो या कैदासणींच्या केसांच्या फटकाऱ्यांत मरायाचा तरी नाहीं. नाहीं तर--

शंकरराव : मरतो काय हो ! त्याची चिकाटी केवढी जबर ! पाहाना एवढ्या दहा मिनिटांत तो किती वेळां तरी उलथापालथा झाला, किती वेळां तरी टोले खात पुढें लोटला, कितीदां पाण्यांत बुडाल्यासारखा--दिसेनासा झाला, तरी त्याची आपली मुंडी पुनः वर आहे ती आहेच ! एवढासा जीव ! पण त्याचा दम केवढा ? शाबास ! फिरला परत ! चढला वर ! चांगला वीत दीडवीत चढला !

कृष्णराव : कसचा चढला ? झालें, संपलें बिचाऱ्याचें--ती पाहा आली लाट--सांपडला भोवऱ्यांत--झाला गडप !

गोविंदराव : पाहिलेंत ! बिचारा शेवटीं बळी पडला ! दोन तुफान नद्यांचा एकवटलेला संताप कोणीकडे आणि हें वीतभर जिवाणूं कोणीकडे ! त्याचा कसचा निभाव लागतो ! त्याला पाहिल्यापासून मला हें त्याचें पुढचें दिसत होतें ! खरेंच, मी येथून दूर जाऊन बसतों तर बरें होतें ! अशा लहानसान प्राण्यांचें जीवान्तिक तडफडणें पाहाण्यांत तुम्हाला काय मौज वाटते कोण जाणे ! आपल्याला जशी भोवंड येते.

वामनराव : अहो, ती बरोबर. ती तशी येतेच ! येवढ्या जोरानें कांहींहि

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

एकसारखें दृष्टीसमोर जात राहिलें म्हणजे आपले डोळे फिरूं लागतात आणि भोवंड येते. एवढ्याला भिऊन जर येथून पळावयाचें, तर मग— काय हो, तुम्ही प्रत्यक्ष त्या भोवऱ्यांत सांपडल्यावर तुमचें कसें होईल?

गोविंदराव : करा बोवा थट्टा! तुम्हांला सुचते बरी. माझ्या मनाला तर तो विरोळा, त्याचे मागें लागलेला तो पाण्याचा राक्षस आणि त्याचा शेवट, हीं सारीं लागून राहिलीं आहेत! त्या बिचाऱ्याचा काय अपराध! सृष्टीचा तरी काय हा न्याय! एवढासा जीव एवढ्या प्रचंड कल्होळांत सृष्टीनें आणून सोडावा कां म्हणून! तरी सृष्टींत सर्वत्र न्याय आणि प्रेम भरलें आहे म्हणे! भगवंताचें दयामय वास्तव्य सर्वत्र नांदत आहे म्हणतात ....आहा! तसें असतें तर या विरोळ्याला भगवंताच्या दयेनें या संकटांतहि हात दिला नसता काय?

कृष्णराव : गोविंदराव एवढ्याशा गोष्टीवरून तुम्ही भगवंताच्या न्यायीपणावर कां घसरतां? तुम्हांला काय ठाऊक, त्या विरोळ्याचा अपराध होता कीं नव्हता? त्यानें पुष्कळशा बेटकुळ्या विनाकारण गट्ट केल्या असतील. शेवटीं आपणहि गट्ट झाला! यांत भगवंताच्या घरचा न्याय कोठें बिनसला? करावें तसें भरावें!

शंकरराव : यांत तुम्हांला इतकें नवीन काय वाटतें? हें नेहमीं जिकडे तिकडे चाललेंच आहे, नाहीं का? जिकडे तिकडे शांत आहे, पशुपक्षी आनंदानें आपली कालक्रमणा करीत आहेत, बागा होताहेत, मळे उठताहेत, शहरें वसलीं आहेत, घरें, वाडे, गिरण्या, कारखाने चालू आहेत आणि सर्व आबादानी आहे; तोंच तळची जमीन हालूं लागावी, पृथ्वीच्या पोटांत गडबडूं लागावें, शेजारचे डोंगर जळती आग ओकूं लागावे, सगळें वातावरण तांबड्या लाल अग्निरसानें भरून जावें, आणि

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

क्षणांत सर्व वस्ती तप्त रसांत कढूं लागावी, असे सृष्टिप्रकोप काय कमी होतात? बोटीवर हजारों माणसें चढतात, उतरतात, हजारों बोटी समुद्राच्या छातीवर नाचतात बागडतात, पण क्षणांत त्याची मर्जी जाऊन समुद्र खवळतो आणि बोटीच्या बोटी आपल्या अनंत उदरांत गडप करून टाकतो कीं नाहीं? भूमाय तरी किती स्थिर, इतकी शांत आणि कनवाळू ना? तिच्या पाठी-पोटावर आम्ही हवे तसे खेळतों बागडतों, आमच्या मनांत कधीं ती संतापेल अशी शंकाहि येत नाहीं; पण एकदम भूकंपाचा धक्का बसून गांवेंचीं गांवें आणि तालुक्यांचे तालुके ती गिळून टाकिते कीं नाहीं? येथें कोणाचा अपराध असतो? हे निसर्गाचे संचार अनंत आणि अगाध आहेत! येथें आपली अक्कल फारशी चालत नाहीं! पण, प्रबळांनीं दुर्बळांस खुशाल पायांखालीं तुडवावें, हा प्रकार जड सृष्टींतच का आहे? जड सृष्टींतच कशाला? खुद्द माणसांमाणसांमध्यें काय आहे? येथें तर बऱ्याच अंशीं आपले आपण मालक असतों ना? तरी आपल्या हातून काय होतें? मी—मी तर म्हणतों, गोविंदराव, हा विरोळा पाण्यांत सांपडावा व त्याचा असा शेवट व्हावा, यांत फार खोल अर्थ आहे.

गोविंदराव : तो कोणता?

शंकरराव : कोणता? या प्रचंड जलौघाच्या झपाट्यांत सांपडून इतका वेळ झगडत राहणाऱ्या व शेवटीं त्या झटापटींतच प्राणाची आहुति देणाऱ्या विरोळ्याचा शेवट पाहून तुमच्या मनांत कांहींच विचार उत्पन्न होत नाहींत? त्या विरोळ्याच्या क्षणाच्या इतिहासानें मनुष्यसमाजाला अत्यंत निकट असे विचार-माझ्या मनांत उभे राहतात! तुमच्या कोणाच्या नाहींत का राहत?

गोविंदराव : मला वाटतें, आपल्या समाजांत अशाच तऱ्हेची धडपड सुरू असून तींत असेच करुणास्पद प्रकार प्रत्यहीं घडत आहेत

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

असेंच तुमचें म्हणणें, होय ना? तसा विचार माझ्या मनांत येतो खरा! पण काय करायचें? आपण काय करणार! त्या विरोळ्यानें काय केलें?

शंकरराव : विरोळ्यानें काय केलें? विरोळ्यानें आपल्या जन्माचें सार्थक केलें! तुम्हांआम्हांसारख्या हताश सुधारकांस प्राणांतिक प्रयत्नांचें आणि आजन्म उद्योगाचें उदाहरण घालून दिलें! या विरोळ्याप्रमाणेंच हजारों निरपराध मानवी जीव हजारों वर्षांच्या सांचत, फुगत आलेल्या लोंढ्यापुढें, आणि धर्माच्या, देवाच्या आणि पवित्रतेच्या भेसूर संमर्दापुढें तडफडत आहेत! समाजाचा प्रवाह सनातन आहे. पण या समाजाच्या प्रवाहाला आलेल्या पुरांत कितीक निर्बळ प्राणी प्रत्यहीं सांपडत आहेत! समाजाच्या सनातन जुलमाखालीं त्यांचा बिचाऱ्यांचा इतका चेंदामेंदा होत आहे, कीं, त्यांना स्वतांला जरा हातपाय हालविण्याचीहि ताकद नाहीं.

अहो तो विरोळासुद्धां आमच्यापेक्षां अधिक नेटाचा. त्याच्यापेक्षां खरोखरच अनंतपट प्रचंड अशा लोंढ्याच्या तडाक्यांत तो सांपडला असूनहि त्यानें आपली धडपड सोडली नाहीं. शेवटचा स्वाहा होईपर्यंत—कोणाला ठाऊक, त्यानंतरहि असेल—त्याचे प्रयत्न चालू होते. येवढ्या अजस्र शत्रूच्याहि हातांतून सुटावयाची खटपट त्यानें बंद पडूं दिली नाहीं, त्याचा उद्योग सुरूच राहिला. जणूं काय आपला शत्रु कोण, केवढा, याचें त्यास भानच नाहीं! तसा आमचा उद्योग पाहिजे. आमची आम्हांलाच ऐकूं न येणारी आजची कुई, सगळ्या जगाला खडबडून जागें करणारी विश्वगर्जना झाली पाहिजे! आपला कोंडमारा फोडूं पाहाणारा आमच्यांतील निसर्गांश आमच्यासारख्या हजारों स्त्रीपुरुषांतील निसर्गांशाशीं एकजीव झाला पाहिजे. या विरोळ्याप्रमाणें आमचे प्रयत्न आमरण—एकांतिक दृष्टीनें—चालले पाहिजेत. बांधावरून उडी टाकिल्यामुळें खंडशः झालेल्या त्या

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

जलौघाकडे पाहा. आपल्या आड येणाऱ्या बांधावरून उडी मारून पुढें गेल्यामुळें त्याच्या शरीराचे राईएवढाले तुकडे होताहेत! पण ते सर्व पुनः जमतात, पुनः उसळतात, पुनः सर्व वाळवंटभर कल्लोळ माजवितात, आणि आपला पूर्वींचा जोर, पूर्वींचा जन्मभाग मिळाल्याशिवाय स्वस्थ राहत नाहींत. त्यांचें उदाहरण आपण डोळ्यांपुढें ठेविलें पाहिजे. अडथळयाशीं टक्कर देऊन स्वतः घायाळ होऊनच हा जलौघ त्या बांधाला लाथाडायला समर्थ होतो. आपण आपल्या बंधुभगिनींवर जे जुलूम, जे अन्याय करीत आलों—करीत आहों—त्यापुढें निसर्गाचा स्वैराचार कांहींच नाहीं! हे सनातन अन्याय आहेत, हे पूर्वकर्माचे जुलूम आहेत, असें म्हणून स्वस्थ बसणें म्हणजे स्वतांची फसवणूक आहे! हे आपणच जन्मास घातलेले जुलूम व अन्याय आहेत; ते आपणच दूर केले पाहिजेत. त्यांचा लोंढा केवढाहि प्रचंड असो, आपण त्यांतूनहि सुटण्याची व त्यांतूनहि डोकें वर उचलण्याची धडपड केली पाहिजे. मृत्यूवांचून जन्म नाहीं. रूढीच्या अनावर लोंढ्यांत आज आपण सांपडून विरोळ्याप्रमाणें नामशेष होऊं कदाचित्! परंतु आपल्या मागून येणारांस आपण वाट तरी करून ठेवूं. आपण खटपटींत—धडपडींतच मरून जाऊं; परंतु आपला मृत्यु म्हणजे आपणांपेक्षां खंबीर वीरांचा जन्म होय! आज कोपऱ्यांत पडलेल्या आणि समाजानें निस्त्राण केलेल्या जीवांच्या जागीं उद्यां नवे जीव येतील, आणि ते पावसाच्या धारांवरून उतरणाऱ्या या सैतानांस सूर्याच्या किरणांवर बसून शुष्क करणाऱ्या देवदूतांप्रमाणें, आज या अनाथ प्राण्यांवर अधिकार गाजविणाऱ्या समाजास वठणीस आणतील! जुलूम आणि अन्याय यांशीं झगडणें एवढें आपलें काम. तें आपण आमरणान्त करावें म्हणजे झालें! पुढच्याचा विचार आपणांस कशाला?

प्रो. वासुदेव बळवंत पटवर्धन

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

परिचय

वासुदेवराव पटवर्धन हे एक कळकळीचे सुधारक होते. त्यांनीं थोडेंच लिहिलें आहे पण जें लिहिलें तें सारें उत्तम ! त्यांच्या व्याख्यानांत व लेखांत एक प्रकारची विलक्षण तडफ व डौल असे. काव्यमय वर्णन करितांना वासुदेवराव रंगून जाऊन मोहनी पसरवीत, तर वादविवादांत हल्ला पेटून आवेशानें प्रतिस्पर्ध्यावर तुटून पडत.

वरील सर्व गुण तुम्हांला या लेखनांत सांपडतील. त्यांची दृष्टि काव्यमय असल्यानें बोधपर असा लेख लिहिण्यास बसले असतां ते तो रुक्ष व नीरस न बनवितां किती छानदार सजवितात पाहा ! मूळ लेखांतील निवडक उतारा येथें दिला आहे.

बंड = पुण्याजवळ नदीचें पाणी तुंबविण्यासाठीं घातलेला बांध. याजवळच्या बागेस 'बंडगार्डन' म्हणतात.

विरोळा म्हणजे विष नसलेला पाण्यांतला साप.

अभ्यास

१. नागमोडी खूण केलेल्या वाक्यांचे व अधोरेखित शब्दांचे अर्थ द्या.

२. या लेखांत विनोद कोठें आहे ?

३. विरोळ्यानें खरेंच काय शिकविलें ? पाण्याच्या प्रवाहाशीं झगडून मरण्यांत त्यानें वेडेपणा केला नाहीं असें पटवर्धन म्हणतात. विरोळ्याच्या कृत्याचें समर्थन करा.

४. पाण्याचा प्रचंड प्रवाह–क्षुद्र विरोळा–त्याची धडपड–मृत्यु हें सर्व रूपक आहे असें समजा व तें उलगडून आपल्या चालू समाजस्थितीशीं जुळवा.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

३९

सारंगीवाला

मनमोहन ! वाजवुनी सारंगी काढी मंजुळ सूर
विश्व निजलें, शांत झालें !
एक धरणी मात्र डोले !
गंभीरपणानें अंधारांतुन छेडित जाई सूर
कंप वाऱ्यांतून कानीं
तरल येती गोड गानीं
समरसती हृदयीं भाव, लागते गोड मना हुरहूर
नाचती हे वरति तारे
गात डुलती मंद वारे
बघ तालावरतीं नाचुं लागलें हृदय वाहुनी पूर
अंगुलीची रागदारी
आंत उठते गुंजणारी
मग एकतान होऊन ऐकितें आंतून कुणि आतूर
जीव डोले दिव्यतेनें
रोमरंध्रीं भरुनि गाणें
मन तन्मय होऊनि मधुर माधुरी सेवित झालें चूर
रस, कला या एकवटुनी
बोलती कीं झंकृतींनीं
सौंदर्य नाचतें थयथय, वाजति शब्दांचे नुपूर
काय कसलें गान गावें !
शांत चित्तें व्याकुळावें
तळमळुनी त्यांतच शोधित जावें, वाटे, पुढती दूर

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

म्हणुनि करुनी येथ येसी
देव कीं गंधर्व गासी
शांतवी लकेरी दग्ध जिवा—तरि, छेड छेड ते सूर

गिरीश

परिचय

मध्यरात्र झाली आहे, रस्त्यावर सामसूम झालें आहे, माणसें झोंपलीं आहेत, फक्त 'एक धरणी मात्र' डोलत आहे, अशा वेळीं कुणीतरी अज्ञात असा सारंगीवाला सारंगी वाजवीत रस्त्यानें चालला आहे. अंधारांत तो दिसत नाहीं, त्याची सारंगी दिसत नाहीं; मात्र त्या अत्यंत शांत वेळेस 'वाऱ्यां'तून तरल असे 'कंप' कवीच्या कानांवर येतात. त्यांच्या भावनाकुल व 'दग्ध' जीवावर या मंजुळ सुरांचे काय परिणाम होतात तें या सुंदर कवितेंत दाखविलें आहे.

कवि गिरीशांची भाषा फार गोड, शब्द नेहमीं वेंचक, मधुर व नादयुक्त असावयाचे. त्यांची कविता मनांत वाचतांना सुद्धां कुणीतरी छानदार गात आहे असा आपल्याला भास होतो.

अभ्यास

१ या कवितेंतील विशेष नादमधुर अशा ओळी निवडा. २ कवितेंत सुंदर अशीं श्राव्यचित्रें (Auditory images) विखुरलीं आहेत. त्यांतलीं दोन तीन निवडा. ३ गान ऐकून 'व्याकुळावें' असें कवि कां म्हणतो ? ४ 'व्याकुळावें' हें क्रियापद कसें बनलें ?

पुरवणीवाचन

याच नांवाच्या याच सारंगीवाल्याला उद्देशून अशाच प्रसंगीं लिहिलेल्या 'माधव जूलियन' व 'यशवंत' यांच्या कविता वाचा व तिन्ही कवितांची तुलना करा.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

४०

रेनकोटाचीं साहसें

कांहीं लोकांचें नशीबच फुटकें असतें. त्यांच्या छत्र्या नेहमीं हरवतात, तसेंच पैशाचें पाकीट, सरकारी प्रॉमिसरी नोटांचें बंडल, पाळलेलें कुत्रें हीं कुठेंतरी नाहींशीं होतात! कंपनीचा शेअर घेतला कीं कंपनीच बुडते! वनभोजनाला गेले, तर कपबशा न्यायलाच विसरतील! पोपट पाळला, तर तो थंडीनें मरतो; दुसरा पाळला, तर उष्म्यानें मरतो; तिसरा पाळला तर बोका खाऊन जातो!

मात्र कांहीं थोडे लोक फार भाग्यवान् निघतात. त्यांना रस्त्यांत अंगठी सांपडते; त्यांच्या वहाणा हरवतात पण त्याजागीं नव्या कोऱ्या वहाणा ठेवलेल्या सांपडतात; जुनी पेटी साफ करतांना आंत पडून राहिलेला एखादा रुपया अचानक हातीं येतो.

एकदां प्रवासांत माझें पैशाचें पाकीट हरवलें. खूप शोधलें, अधिकाऱ्यांना कळविलें, पुढच्या टप्प्यांना तारा ठोकल्या, बक्षिस लावलें, पण व्यर्थ! पाकिट एकदां गेलें तें गेलें. या शोधांत मी एकंदर २४ मैल चाललों, १,००,००० शब्द बोललों, डबल क्राऊन साईझचीं तीन पानें अर्ज लिहिले, आणि पाव चौरस-मैल पृष्ठभाग व १३,२०० घनफूट जागा शोधली.

रेनकोट हरवण्याच्या बाबतींत मात्र मला निराळाच अनुभव आला. सतरा पावसाळे मी त्याच्या आंत काढले होते. तुफान वाऱ्याशीं त्याला टक्कर द्यावी लागली होती. सहा इंच जाडीचें बर्फपतन त्याला सहन करावें लागलें होतें. १०२० इंच पाऊस त्यावरून वाहिला होता. ७००० मैल आगगाडीच्या प्रवासांत त्याचा उशीसारखा उपयोग मला होत होता.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

गेलीं सात आठ वर्षें त्याचा पाणी ओघळून लावण्याचा गुण साहजिक कमी झाला होता; व तो आतां इतका विरला होता कीं, कबुतरें आंत येऊं नयेत म्हणून खिडक्यांत जाळ्या मारतात तसा तो दिसूं लागला होता! परंतु या रेनकोटाची मला भयंकर माया लागली होती. इतकी कीं, तो फेंकून देण्यास माझा जीव घेईना. रस्त्यांतल्या एकाद्या घाणेरड्या भिकाऱ्याला देऊन तो विटाळविणें हेंहि मनाला बरें वाटेना! 'आतां हा रेनकोट कोणाला तरी देऊन टाकला पाहिजे' असें मीं माझ्या गड्यादेखत मुद्दाम सुचविलें होतें, पण ह्या सूचनेचा फायदा तोहि घेईना! काय करावें? हा रेनकोट घालवावा कसा? मनोभावना दुखविल्या जाणार नाहींत अशा खुबीनेंच त्याचा गोड शेवट कसा करतां येईल याचा मी विचार करीत होतों.

एक दिवस संधी आली. माझा मित्र जाण्याकरितां उठला होता. त्याच्याजवळ छत्री नव्हती व पाऊस तर झिम्झिम् पडूं लागला होता. हा मित्र आगगाडीनें लांबच्या गांवाला जाणार होता व लवकर परत येण्याची अपेक्षा नव्हती. 'घेऊन जा रेनकोट!' मी दानशूरपणाचा आव आणून म्हटलें; 'तुमच्याजवळ राहिला काय, अन् माझ्याजवळ राहिला काय— सारखेंच!' पण माझें नशीब कसलें! "राहूं द्या—राहूं द्या" तो म्हणाला; "अंगावर असला काय अन् नसला काय सारखेंच!" मित्र लांबच्या गांवाला निघून गेला. रेनकोट मात्र खुंटीवरच राहिला.

मी एकदां बसमध्यें बसून चाललों होतों. रेनकोटाचा गोड निकाल लावण्याचे खुनशी विचार सारखे मनांत घोळत होते. रेनकोट मागें पाठ-टेकणीवर टाकला होता. इतक्यांत उतरावयाची वेळ आली. मी लगबगीनें तसाच उठलों व उतरूं लागलों, तोंच माझी बाही कोणी तरी मागून जोरानें खेंचली! मागें वळून पाहतों तोंच माझ्या मागच्या बांकावर बसलेल्या

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

एका सद्गृहस्थानें एका हातानें माझी बाही पकडलेली व दुसऱ्या हाताचीं बोटें बांकाच्या. पाठीवर टाकलेल्या रेनकोटाकडे केलेलीं—असें दृश्य मला दिसलें ! माझ्या रागाला सीमा उरली नाहीं ! आवडता रेनकोट फाडून त्याच्या चिंध्या करून जाळणें, किंवा चोळामोळा करून गटारांत टाकणें अशासारखें भयंकर क्रूर कृत्य न करतां तो घालविण्याची मीं ही नाजुक युक्ति योजली असतां मध्येंच खो देणारा हा कोण लष्करच्या भाकरी भाजणारा ? याचा हा परोपकाराचा बाणा माझें पैशाचें पाकीट हरवलें होतें तेव्हां कोठें गेला होता ? माझ्यावर मागूनच असा अचानक हल्ला केल्याबद्दल त्याला कोर्टांत खेंचण्याचे विचार मनांत चालू असतां, तोंडावर खोटेंच स्मित दर्शवून व किंचित् वांकडी मान करून मी 'थँक् यू' म्हटलें व तो रेनकोट मला उचलून घ्यावा लागला !

एक वेळ चोरी करूं नये हें कबूल, पण एकादा सद्गृहस्थ आपलाच रेनकोट विसरला, तर तो त्याला परत करण्याची खटपट दुसऱ्यानें कां करावी ? बसमधील लोकांच्या सज्जनपणाविषयीं माझी खात्री झाल्यामुळें मला आतां चोरबाजाराची युक्ति सुचली. समजा, मी असा खांद्यावर रेन-कोट टाकून बावळटासारखा चोरबाजारांतून चालूं लागलों, तर माझ्या खांद्यावरचें ओझें हलकें करणारा कोणीतरी भेटणें असंभवनीय नव्हतें. त्याप्रमाणें मी गर्दींत शिरलों. चोरासारख्या दिसणाऱ्या एका माणसाच्या दिशेनें मीं चालण्याचा रोख ठेवला. मला वाट करून देण्याकरितां तो जरा बाजूला झाला, पण मीं आपला मोर्चा मुद्दाम त्याच्याकडेच वळवला. कोटाचें लोंबतें टोंक हातांत पकडून ठेवलेलें नाहीं हें स्पष्ट करण्याकरतां मीं आपले हात विजारीच्या खिशांत घातले. चोर जवळ आला. अगदीं खेटून जाऊं लागला; घसटून गेला, सळसळ असा रेनकोट सरकल्याचा आवाज ऐकूं आला व खांदा हलका झाला ! आतां मी निर्धास्त झालों !

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

अखेर सद्गृहस्थांच्या ऐवजीं चोरच माझ्या सहाय्याला आला. चोरानें माझ्या हृदयांतील हाक ऐकली. चोरानें रेनकोट पळवला. मीं ओझें उतरल्याचा श्वास टाकला !

तोंच काय ! 'सा–ब' अशी हाक मीं ऐकली. मी भरभर पाय उचलूं लागलों. पुन्हां 'साब'—मीं क्विक मार्चमध्यें चालीचें रूपांतर केलें. पुन्हां 'साब साब' असे साद ऐकूं आले. मीं चाल बदलून डबल मार्चला आरंभ केला. लवकर दिसेनासें व्हावें म्हणून वेड्यावांकड्या चालीच्या ताना, ठेके आणि खटके घेतले ! पण तोच आवाज सारंगीप्रमाणें मागोमाग येऊं लागला ! शेवटीं 'साब, आपका बरसाती गिर गया !' असें म्हणून कोणीं तरी मला मागून हटकलें व कोटाच्या पाठीची एक सुरकुती धरून थांबविलें. खट्दिशीं मध्येंच रेडिओ बंद करावा त्याप्रमाणें माझी चाल भलत्या आसनांत थांबली. 'साब, आपका बरसाती गिर गया था धांदलीमें !' तो चोर धापा टाकीत म्हणाला. त्याला वाटलें असावें, मी ट्रॅम गांठण्याकरितां पळतों आहें !

कांहीं तरी मानसशास्त्राच्या नियमाप्रमाणें, इच्छा तसें फळ या न्यायानें—मीं जेव्हां विजारीच्या खिशांत हात घातला, तेव्हां खांदा बराच खालीं कलला व मी अजाणतां त्यावरून रेनकोट घसरवूं लागलों असलों पाहिजे ! इकडे मला वाटत होतें, किंवा मी वाटवून घेत होतों, कीं चोर रेनकोट अलगत उचलीत आहे ! चोर कसला ! साबच तो ! बसमधल्या उपद्व्यापी सद्गृहस्थाचा भाऊच शोभत होता तो ! दैव फिरलें म्हणजे चोरदेखील साव बनतात ! त्याच्या तोंडावर रेनकोट घालून त्याला गुदमरवून मारण्याचा विचार माझ्या डोक्यांत आला; पण मींच मूग गिळले. हंसल्यासारखें करून मीं म्हटलें 'थँक् यू ! बहुत

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

अच्छा ! रेनकोट मिला, पण ट्रॅम चुका ना !' हॅ हॅ करीत त्या चोरानें मला सलाम केला; खिशांतून एक आणेली काढून मीं त्याच्या हातावर ठेवली. जाळ-पोळ, फोड-तोड वगैरेसारखें भयानक कृत्य न करतां केवळ हातचलाखी-सारख्या अहिंद उपायांनीं रेनकोटाचा निकाल लावण्याचा माझा संकल्प अशा रीतीनें फसला गेला ! कारण काय, तर त्या चोरानें हातचलाखी केली नाहीं म्हणून ! अरे, पण तुझा हा साळसूदपणा माझी मनीबॅग हरवली तेव्हां कोठें गेला होता ?

एकदां सिनेमा सुटल्यावर मी गर्दीतून वाट काढीत होतों. शेजारींच एक बाई चालली होती. तिच्या छत्रींत माझा रेनकोट अडकला. पण रेन-कोटाचें बकल माझ्याही छत्रीच्या काडींत अडकल्यामुळें ती बाईहि ओढली जाऊं लागली. देवानें ही संधि दिली. मी रेनकोटाचें माझ्या छत्रींत अडक-लेलें टोंक चट्‌दिशीं सोडवलें व पुढें झटकलों. रेनकोट तिच्याच छत्रींत अडकून राहिला. "अहो—अहो, तुमचा रेनकोट !" ती म्हणाली.

"काय माझा ? छे ! माझा नाहीं तो !"

"तुमचाच ! आतां तुमच्या हातावरून पडला !"

"आपला गैरसमज झाला आहे !" मी म्हटलें; "तो तुमचाच. मला रेनकोट आहे कुठें ? ही छत्री असल्यावर रेनकोट कशाला ?"

"खास तुमचाच हा !"

"खास माझा नव्हे !" मी म्हणालों.

"नाहीं कसा ? तुमचाच !"

"मी पैजेनं सांगतों कीं माझा नाहीं. जर माझा ठरला, तर तुम्हांला बक्षीस देईन !"

"तुम्हांला हा घेतलाच पाहिजे. हा माझा नाहीं."

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

"तुमचा नसला, तर तुमच्या भावाचा असेल!"

"मला भाऊहि नाहीं व रेनकोटही नाहीं."

"नसला तर होईल; राहूं द्या!"

"तुम्ही परत घेतां का—"

थरावर गोष्ट जाण्यापूर्वींच मीं म्हटलें, "आपण म्हणतच असाल तर घेतों! कारण फार्स करण्याची माझी इच्छा नाहीं."

गेलेला पाहुणा गाडी चुकली म्हणजे परत यावा, तशी माझी स्थिति झाली!

दुसऱ्या दिवशीं सकाळींच एका मोठ्या बँकेंत पाहातां पाहातां १०,००० च्या करन्सी नोटा चोरीस गेल्याचें मी वाचलें. अहाहा! पाहातां पाहातां जर चोरी होऊं शकते, तर तिकडे आपण बघितलें नाहीं तर नाहीं का होणार? बँकेला संधि देण्याची कल्पना मला पूर्वींच कां सुचली नाहीं? ताबडतोब मी त्या बँकेंत गेलों व एका आडोशाच्या खिडकीपुढील फळीवर रेनकोट ठेवला आणि तेथून लांबच्या एका काउंटरपाशीं जाऊन टेहळीत उभा राहिलों. बँकेंत खरें काम कांहींच नसल्यामुळें कोट चोरीस जाईपर्यंत काय करावें तें सुचेना. म्हणून उगीचच कांहीं फॉर्म मागून घेतले. पण फॉर्मांचें काय करावें, तें सुचेना. मग या खिडकीकडून त्या खिडकीकडे अशा येरझारा घालूं लागलों. मध्येंच थांबून जाहिराती वाचण्याचें सोंग करीं. इकडे कोणाच्या खांद्याआडून, तर केव्हां हाताखालून रेनकोटावर बारक्या नजरेनें लक्ष ठेवीत होतों. परंतु अजून रेनकोट तिथेंच! तिकडे कोणीच ढुंकूनहि पाहीना. मीं मात्र चोरट्या नजरेनें टेहळणी सुरू ठेवली होती! बराच वेळ झाला, पुष्कळ लोक आले-गेले! मोटरवाले आले, डॉक्टर आले, पट्टेवाले आले, फाटके—तुटके आले; पण एकाच्याही मनांत

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

पाप येईना! काय, एवढ्या मोठ्या बँकेला ही लाजिरवाणी गोष्ट नव्हती काय?—कीं इतके धंदेवाले लोक आले, गेले, पण एकहि धंदेवाला चोर घुसूं नये!

शेवटीं निराश होऊन मी हलकेच चोर-पायांनीं माझ्या कोटापाशीं आलों व कोणी बघत नाहीं असें पाहून हळूच कोट उचलला व परतण्याकरतां मागें वळलों.

पाहातों तों खाकी पोषाखाचा, पितळी बकलाचा व रंगी-बेरंगी फिता छातीवर लावलेला असा एक अजस्र पठाण माझ्यासमोर हँड एक्झरसाईजच्या पोझिशन नंबर टू मध्यें पाय फांकून उभा! बँकेचा रखवालदार तो! १०,००० च्या नोटा जरी त्याच्या देखरेखीखालीं बेपत्ता चोरीस गेल्या, तरी दीडदमडीचा रेनकोट चोरणाऱ्या, मला त्यानें मुद्देमालासकट पकडला! माझी चोरटी चाल-चालणूक तो आरंभापासून पाहात होता व माझ्यावर त्याची सारखी नजर होती.

त्याची खात्री करायला मला किती तरी वेळ लागला!

पुढें एके दिवशीं संध्याकाळीं मी चौपाटीच्या वाळूंत मुद्दामच रेनकोट विसरून घरीं आलों. त्या दिवशीं मी पोटभर जेवलों, व पाठीवरचें एक ओझें गेल्यामुळें मला झोंप पण चांगली लागली. दोन दिवस आनंदांत गेले! शेजाऱ्यांना मी चहाला बोलावलें, हपिसांतील पट्टेवाल्याला फार दिवस राहिलेली बक्षिसी दिली आणि कपाटावरची अडगळ काढून टाकली. अखेर जाळ-पोळ न करतां माझ्या आवडत्या कोटाला कायमची विश्रांति मिळाली. "काय करावं, रेनकोट हरवला हो!" असा बभ्रा करण्यास मात्र मी विसरलों नाहीं! इतकेंच नव्हे, पण नवा रेनकोट आणण्याकरतां एका मित्राजवळ १५ रुपये देऊन ठेवले.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

या मित्रानें पाठ वळविली असेल नसेल तोंच एक दाढी केलेला अक्कडबाज मिशांचा, हंटिंग कोट घातलेला व धोतर नेसलेला आणि पायांत पोलिशी वहाणा घातलेला इसम आंत आला. त्यानें मला सलाम केला व म्हटलें, " इनिस्पेक्टरसाहेबांनीं आपल्याला बोलावलं आहे पोलिस स्टेशनवर आतांच बघा ! "

मला शंका आलीच ! माझा आनंद मावळला. माझी भूक पळाली, झोंपमोडीची व्यथा लागणार असें वाटूं लागलें. मी हवालदाराच्या मागोमाग गेलों ! पोलिस स्टेशनवर पोंचल्यावर इन्स्पेक्टरनीं तुमचा कांहीं जिन्नस हरवला आहे काय असें विचारलें.

इतक्यांत माझी मनीबॅग हरवल्याचें मला आठवलें.

" तर ! " मी म्हटलें, " याच स्टेशनवर मीं वर्दी दिली होती. "

" जुना होता का तो जिन्नस ! "

" होय अगदींच जुना ! त्याला एक बटण आहे "—मी खाणाखुणा सांगण्याच्या उद्देशानें म्हटलें.

" बरोबर ! आणि त्याला एक पट्टा आणि बकल होतं ? "

" होतं—एक बकल पण होतं. "

" तो जिन्नस तुम्ही ओळखूं शकाल ? "

" जरूर ! त्यांत दोन रुपये, कांहीं खुर्दा, एक रेल्वे पास, एक खाणावळीचं कूपन वगैरे पण होतं. "

" चला तर ! " असें म्हणून कैद्यांच्या कोठडीकडे त्यांनीं मला नेलें. एक तरुण कैदी पाठमोरा गजाला रेलून उभा होता, त्याकडे बोट करून " हाच का तो इसम ? " असें इन्स्पेक्टरनीं मला विचारलें.

माझी मनीबॅग कोणी चोरली होती तें मला कांहींच ठाऊक नव्हतें. त्याला मी कसा ओळखणार ? तरी दडपून " हाच तो " म्हटलें.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

इन्स्पेक्टरसाहेब म्हणाले, "तोंड तर बघा जरा.-एऽऽव्होऽऽऽ !" कैदी वळला.

"नाहीं तर डाग आधीं बघूं" असें म्हणून इन्स्पेक्टरसाहेब मला कोठींत घेऊन गेले.

एका पेटीवर माझ्या मनीबॅगऐवजीं माझा पुराणा रेनकोट पाहून मला काय झालें असेल याची कल्पनाच करावी !

"हाच ना जिन्नस ? आणि तोच इसम !"

मी आतां जरा शहाणा झालों. उगीच एखाद्यावर भलता आरोप घेण्याचें पाप मीं केलें होतें. मीं कचरत म्हटलें, "नाहीं—मला वाटलं तो नव्हे तो मनुष्य !—अन् खरं म्हणजे हा रेनकोटहि माझा दिसत नाहीं. मला वाटलं माझी मनीबॅग मागं हरवली होती ती तुम्हांला सांपडली वाटतं !"

"पण तुमच्या नांवाचीं आद्याक्षरं आहेत ना त्याच्यावर !"

"असेल, असेल. मी चौपाटीवर विसरलों होतों खरा ! पण कुणीं चोरला असेल असं नाहीं वाटत." मी उत्तरलों.

"हरकत नाहीं !" साहेब म्हणाला, "रेनकोट तुम्ही ओळखतां. तो तुमचा असून तुम्ही चौपाटीवर विसरलां, तो त्या आरोपीच्या कबज्यांत सांपडला. हरकत नाहीं; योग्य वेळीं पोलिसकोर्टांत साक्षीदार म्हणून तुम्हांला बोलावणं येईल."

आमच्या तिनें तिसऱ्या प्रहरीं एक जरीचें लुगडें बाहेर गॅलरींत वाळत घातलें होतें. तेथेंच वाळवण्याकरितां खिळ्याला रेनकोटहि टांगलेला होता. मी पुढच्याच खोलींत पेंगत पडलों होतों. इतक्यांत कांहीं तरी सळसळ वाजल्याचा आवाज ऐकूं आला. मी समजून चुकलों कीं जरीचें लुगडें

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

उचल्यानें लांबविलें! मी तसाच उठलों व चोराचा पाठलाग केला. 'चोर चोर!' अशा आरोळ्या ठोकल्या. सर्व चाळ चोराच्या मागें लागली. रस्त्यावर गर्दी जमली, पोलीस उत्पन्न झाला. एकानें चोर धरला, आणि हातांत काय होतें? जरीचें लुगडें? नाहीं; तें केव्हांच तिनें आंत नेऊन ठेवलें होतें! व रेनकोटच फक्त बाहेर राहिला होता! बायका पुरुषांइतका केव्हांहि हलगर्जीपणा करीत नाहींत! त्या गर्दींत मागल्यामागें पसार होण्याची कल्पना मला आली. पण मींच मारे गडबड उडवून दिली होती, आणि माझ्याकरितां नव्हे, पण लोकांकरतां तो रेनकोट मला घरीं आणावा लागला.

शेवटीं एकदां असें झालें कीं, पुण्याला जाण्यासाठीं स्टेशनावर जातांना ट्रॅममध्यें मी रेनकोट विसरलों. आतां मुद्दाम जाणूनबुजून वस्तु विसरणें निराळें आणि आपल्या गबाळेपणामुळें हरवणें निराळें. यांत हलगर्जीपणाचा दोष येतो; हें मला खपेना! असा कसा विसरला? तो हरप्रयत्न करून परत मिळविलाच पाहिजे. आठ दिवस पुण्यास राहून मी परतलों. थेट ट्रॅम कंपनीच्या मुख्य कचेरींत गेलों. आतां कसचा सांपडणार तो रेनकोट! पण प्रयत्न करणें माझें कर्तव्य होतें! योगायोग असा कीं, चपराशानें ताबड-तोब माझा रेनकोट माझ्या हवालीं केला व सही घेतली. शेजारीं क्लार्क बसले होते, त्यांनीं म्हटलें, "आठ आणे, प्लीज!" रोज एक आण्याप्रमाणें आठ दिवस रेनकोट ठेवल्याबद्दलचा चार्ज!

आठ आणे देऊन नको असलेला रेनकोट घेतला; पावती देत होता तरी घेतली नाहीं. मनांत म्हटलें, "माझी मनीबॅग हरवली, तेव्हां साऱ्या जगाचा धर्म कोठें लोपला होता!"

कॅप्टन गो. गं. लिमये

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

परिचय

कॅप्टन लिमये हे एक यशस्वी असे विनोदी लेखक आहेत. हे शब्दावर विनोदी कसरत व कोट्या करीत नाहींत. पण अशा कांहीं गोष्टी एकापुढें एक सांगतात कीं आपल्याला गंमत वाटते आणि ती कां वाटते तें मात्र सांगतां येत नाहीं. एकादी नकोशी वस्तू टाकूं म्हटलें तरी टाकतां येत नाहीं याची त्यांनीं मोठी मजेदार हकीगत सांगितली आहे. यांत वर्णन केलेला एकादा तरी प्रसंग नेहमींच्या आयुष्यांत आपणांस पाहाण्यास मिळतो. अशा नेहमीं घडणाऱ्या गोष्टींतील विनोद दाखविण्यास मोठें कौशल्य लागतें. लेखांतील तुटक वाक्यरचना तुम्हांला नवीन वाटेल. त्यांनीं लेखांत बरेच इंग्रजी शब्द वापरले असून कांहीं वाक्यें तर इंग्रजी वळणाचीं आहेत. मुंबईच्या हिंदी भाषेचा नमुना पाहा.

अभ्यास

१. नागमोडी खूण केलेल्या वाक्यांत इतके आंकडे कां दिले आहेत ?

२. या लेखांत मुंबईच्या राहणीचे फार उल्लेख आले आहेत. ट्रॅम, बस, चोरबाजार, बँक, चौपाटी वगैरे. हीच गोष्ट तुमच्या गांवांत घडली आहे असें कल्पून दुसरे प्रसंग घाला.

३. अधोरेखित शब्दांचे निरनिराळे अर्थ देऊन ते वाक्यांत योजून दाखवा.

४. गोड, भयंकर या शब्दांचे वास्तविक अर्थ काय ? लेखांत ते शब्द कां योजले आहेत ? 'वाटवून घेणें' हा कसला प्रयोग आहे ?

५. या लेखांत आलेल्या इंग्रजी शब्दांऐवजीं मराठी शब्द द्या. उदाहरणार्थ, रेनकोट = पाणकोट. शेअर = भाग.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

४१

काव्यगायन



चित्रकार : श्री. गोडसे संपादक ' संजीवनी ' यांच्या कृपेनें.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

कवीचें काव्यगायन चाललें आहे ! कवितांची चोपडी हातांत घेऊन स्वारी आवेशानें गाते आहे. शेजारच्या त्या दोन मुलांना आणि त्यांच्या बरोबरच्या मनीला मात्र तो असा कां किंचाळतो आहे याचें गूढच पडलें आहे. मुलगा अर्धवट भीतीनें, अर्धवट आश्चर्यानें त्याच्याकडे पाहातो आहे, तर मुलीनें त्याच्या किंचाळण्यानें कान किटल्यामुळें कानांत बोटें घातलीं आहेत. आणि मनी तर भेदरूनच गेली आहे. पण कवीला त्याची काय दरकार ! तो अगदीं बेहोष होऊन गेला आहे. मशिनगनमधून सुटणाऱ्या गोळ्यांप्रमाणें कवितांचा भडिमार प्रेक्षकांवर करण्याच्या बंदोबस्तानें आली आहे स्वारी. आणि हातांतील व समोरील बाडांतील कविता संपल्या तर नवीन लिहून म्हणण्याची आहेच राजश्रींची तयारी ! कोटाच्या आंतल्या खिशांतून ते पाहा कोरे कागद डोकावताहेत बाहेर ! आणि बाहेरील खिशांत, एक नाहीं तीन पेन्सिली टोकें काढून तयार आहेत. सैनिकाच्या संगिनी-सारख्या दिसताहेत त्या अगदीं ! आणि तो पाहिला का समोर ठेविलेला बहु-तेक खलास केलेला पाण्याचा पेला ? घसा कोरडा झाला तर ओला कर-ण्यासाठीं आहे तो. पाणी प्यायचें आणि कविता म्हणायची ! पाणीदार कविता बाहेर पडायला पाणी प्याल्याशिवाय कसें चालणार ! ! कवीची ही सारी तयारी आणि तो त्याचा अवतार पाहून श्रोत्यांच्या तोंडचें पाणी पळालें असेल बहुधा !

व्यंगचित्र आहे हें ! आवाजांत मार्दव नसतां औचित्य—अनौचि-त्याचा विचार न करतां, गोड गळ्याच्या लोकप्रिय कवींची नक्कल करून लोकांवर आपलें कवित्व लादूं पाहाणाऱ्या अचरट कवींवर चित्रकारानें खवचट टीका केली आहे ! हे कवि स्वतःला कसे हास्यास्पद करून घेतात तें यांत थोड्या पण आवश्यक तेवढ्या रेषांनीं दाखविलें आहे.

गं. दे. खानोलकर

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

४२

आई—!

(चाल–तीरथ कोन फिरे०)

नव लाख दिवे हे तुझ्या घरीं
कां जातिस दुसऱ्यांच्या दारीं ! ध्रु० ॥

हा अनंत पसरला नीलिमा,
शांत गभीर जयाची सुषमा
विभूति ही प्रभुची निःसीमा
नांदतसे तव शिरावरी ? कां जातिस० १

धवल हिमाचल वर विस्तरला
अनंतामध्यें विलीन झाला
उदात्त रस शीकवी कवीला
बुद्धिस्थलिं तव वास करी ! ध्रु० २

सामघोष मुखरित वनराई
मधुनी जाई गंगामाई
कलस्वनें ती गीतें गाई
तव हृदयावरि निरंतरी ! ध्रु० ३

अनंत दुःखें हृदयीं धरिलीं
अनंत गूढें मनीं वाहिलीं
अनंत कन्यारत्नें असलीं
प्रसवलीस तूं धन्य खरी ! ध्रु० ४

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

किति कविंनीं किति काव्यां गावें !
किती तुझें वैभव वर्णावें !
किती तुझे जयघोष करावे !
वंदे त्वां मांगलेश्वरी ! ध्रु० ५

विठ्ठलराव घाटे

परिचय

कवि गच्चीवर झोपला असतांना मध्यरात्रीं त्याला जाग येते व डोळे उघडतांच त्याला पहिलें दृश्य दिसतें तें म्हणजे आकाशांतले नव लाख दिवे. आपल्या आईच्या मातृभूमीच्या घरचें हें वैभव पाहून कवि सद्गदित होऊन तिला म्हणतो, "आई, तुझ्या घरीं काय हें वैभव? कशाला जातेस दुसऱ्यांच्या घरीं दिव्याची भीक मागायला ?" ही कवितेंतील मध्यवर्ति कल्पना ध्यानांत ठेवा. भारतभूमीविषयीं कविता असल्यामुळें पुस्तकाच्या शेवटीं घातली असली तरी ही कविता अगोदर वाचा म्हणजे याच पुस्तकांतील 'जळजळ' या कवितेंतील स्वारस्य तुमच्या लक्षांत येईल.

सुंदर निळसर आकाश, 'नवलाख' तारे, धवल हिमाचल, गंगामाई व उदात्तचरित अशा हिंदकन्यका हीं पांचच भारतभूमीचीं वैभवें कवीनें निवडलीं आहेत.

अभ्यास

१. सुषमा = शोभा; बुद्धिस्थल = डोकें.
२. सामघोष मुखरित : प्राचीन कालच्या आर्यांनीं सामवेदांतील मंत्रघोष केला, त्याचे प्रतिध्वनि ज्या वनराईतून घुमले त्या राईतून गंगामाई वाहत आहे व तेव्हां ऐकलेलीं तीं गाणीं अजूनहि म्हणत जात आहे.
३. मांगलेश्वरी = मंगल पासून विशेषण मांगल. मांगल अशी ईश्वरी म्हणजे देवी. वंदे त्वां मांगलेश्वरी ! हे मंगल देवी, मी तुला नमस्कार करितों.

Printed by M. N. Kulkarni at the Karnatak Printing Press, Chira Bazar, Bombay, and published by him at the Karnatak Publishing House, Chira Bazar, Bombay 2.

LIBRARY
GURUKULA KANGRI.
CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

LIBRARY,
GURUKULA KANGRI.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

विद्यार्थ्यांसाठीं कांहीं वाचनीय पुस्तकें

	कापडी.	कागदी.
दैवलीला (कादंबरी) . ले. सौ. इं. हरिपूरकर .	१-४-०	१—०-०
शिवाजीचा उजवा हात (ऐतिहासिक कादंबरी) ले. प्रभाकर . . .	...	०-१२-०
मातृमूर्ति (कादंबरी)	१-८-०	१—४-०
पूर्व आणि पश्चिम (कादंबरी)	...	१—४-०
ज्ञानदीप	१-४-०	१—०-०
आसुरी माया (गुप्तहेरकथा) ले. वि. त्रि. भावे . .	१-१२-०	१—४-०
नानासाहेब पेशवे (चरित्र) ले. रियासतकार सरदेसाई	२-८-०	२—०-०
सौदामिनी (कादंबरी) ले. शं. बा. शास्त्री . . .	१-४-०	१—०-०
कर्मवीर हेन्री फोर्ड (चरित्र) ले. पेंठे . . .	१-६-०	१—२-०
पहिले बाजीराव पेशवे (चरित्र) ले. प्रो. ना. के. बेहेरे	२-१२-०	२—८-०
डॉ. भाऊ दाजी लाड (चरित्र) ले. श्री. ना. कर्नाटकी	१-४-०	१—०-०
अर्वाचीन मराठी वाङ्मयसेवक (चरित्र) ले. खानोलकर	२-१२-०	...
गडकरी—व्यक्ति व वाङ्मय (चरित्र) ले. वि. स. खांडेकर	...	२—८-०
रघुवंशकथा, ले. मी. शं. नवरे [प्रत्येकांत ३-४ चित्रें घातलीं आहेत.]	...	१—४-०
चक्रवर्ति नेपोलियन (चरित्र) [प्रत्येकांत ३-४ चित्रें घातलीं आहेत.]	१-८-०	१—४-०
हिंदुधर्मावरील कलंक; अनुवादक—गं. भा. निरंतर, एम्.ए.	२-०-०	१-१२-०
आजकालचा महाराष्ट्र (विवेचनात्मक) ले. पाध्ये व टीकेकर	३-८-०	....
संत तुकाराम (चरित्र) ले. ज. र. आजगांवकर .	२-८-०	२—४-०
पराधीन (स्त्रियांची करुण कहाणी) डॉ. बा. वि. जोशी	२-१२-०	२—८-०
कर्मयोग, स्वामी विवेकानंद	...	०-१०-०
खासगी पत्रें, स्वामी विवेकानंद	...	०-१४-०
स्वामी-शिष्य-संवाद, स्वामी विवेकानंद . . .	...	१—४-०
पूर्व आणि पश्चिम व युरोपांतील प्रवासाचीं टिप्पणें (एकत्र) स्वामी विवेकानंद	...	१—४-०
विवेकानंदांचे समग्र ग्रंथ—भाग तेरा . . .	२२-८-०	१९-४-०
महाभारतार्थ—महाभारताचें सुलभ व सुरस मराठी भाषांतर—बारा खंडांत संपूर्ण . .	५०-०-०	...

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar